म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३५६६

# चैतन्याची पावे

REFBK-0027106

प्रा. डॉ. कृष्णा पोतदार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध ३५६६
ग्रा. क्र. २७७०६
८।९।९३
संदर्भ
निबंध
३५६६
२७७०६
८।९।९३

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

( क्रु. मा. पहा )
१००००–११–८९

# चैतन्याची पाने

REFBK-0027106

प्रा. डॉ. कृष्णा पोतदार

चेतश्री प्रकाशन

चेतश्री प्रकाशन, अमळनेर-४२५४०१.

प्रकाशक : सौ. य. वा. सोनार
चेतश्री प्रकाशन, अमळनेर

© प्रा. सौ. अनुराधा पोतदार

प्रथमावृत्ती २२ मे १९९३

मुखपृष्ठ : सुशील जडे, डोंबिवली

रेखाटणे : राजू महाजन

अक्षरजुळणी व मुद्रण :
का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था,
प्रतापनगर, देवपूर, धुळे

मूल्य : रु. ५०/- मात्र

तीर्थरुप आई– तात्या

व

परंपरावादाकडून धर्मनिरपेक्षतेकडे साहित्य समीक्षेची आणि

वैयक्तिक जीवनाची दिशा बदलवणारे

भाई मु. ब. शहा यांना.

# मनोगत

महाविद्यालयाच्या चार भिंतीपलीकडील ज्ञानाच्या तहानेने तडफडणारे अफाट मानवी विश्व मला माझ्या विद्यावर्धिनी या संस्थेच्या सतत चालणाऱ्या ज्ञानप्रक्रियेतून आणि चर्चेतून दिसू लागले. माणसाच्या समग्र कल्याणाच्या संदर्भातच ज्ञानाला महत्व असू शकते म्हणून बुध्दीवंताचे कोरडेपण मला किळसवाणे वाटू लागले! कृतीच्या, सेवेच्या मानव मुक्तीकडे धावणाऱ्या परंपरा माझ्यातल्या अभ्यासकाला आव्हान करीत होत्या. खानदेशचा राजकीय–सामाजिक–सांस्कृतिक चेहरा घडविण्यामध्ये 'विद्यावर्धिनी संस्था', 'चेतश्री प्रकाशन' आणि 'आपला महाराष्ट्र' या तिन्हींचा एक विशेष असा निश्चित स्वरुपाचा वाटा आहे. त्याच पुण्याईने कै. भाई मदाने यांचा क्रांतीवादी लढाऊ वारसा चालविणाऱ्या 'आपला महाराष्ट्र'च्या 'बहर' या साहित्य पुरवणीतील 'पुस्तकांच्या जगात' मी डोळसपणे जाणीवपूर्वक प्रवेश केला. विद्यावर्धिनीच्या ज्ञानवंत प्रेरणेतून 'आपला महाराष्ट्र'च्या कृतीशील परंपरेत मी सहजपणे सामील झालो आणि मला या देशाच्या इतिहासाचे आणि वर्तमानाचे आत्मभान आले. अर्थात् हे एकदम घडले नाही. प्रबोधनाची वाट चालायचे मी निश्चित ठरविले. ही वाट अगोदरच म. फुले, म. गांधी, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, भाऊराव पाटील या महापुरुषांच्या सूर्य किरणाने उजळली होती. या सर्वांचे प्रबोधनाच्या कसोटीवर मूल्यमापन करणारे मान्यवर विचारवंतांचे ग्रंथ महाराष्ट्र शारदेच्या दरबारात रुजू झाले आहेत. आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये ही प्रबोधनासाठी आवश्यक असलेली ज्ञानाची गंगोत्री सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोचणे आवश्यक आहे. त्याशिवाय माणसाच्या मनातला आणि जनातला दाटलेला अंधार दूर होणे शक्य नाही. या जाणिवेने मान्यवर लेखकांच्या विचारकृतींचा सुबोध परिचय करून देण्याचे मी ठरविले. महाराष्ट्राचा वाचक डोळ्यासमोर होताच.

हेतू पुस्तक परिचयाचा असला तरी माझ्यातल्या अभ्यासकाला एवढ्यातच समाधान मानणे शक्य नव्हते. म्हणून माझ्या मूळच्या आस्वादकाच्या भूमिकेमध्ये क्रमाने भर पडत गेली. पुस्तक परिचय करून देणारा, त्याच बरोबर जाता जाता संबंधित पुस्तकाची समीक्षाही करणारा! समीक्षक म्हणून माझी जबाबदारी अपरिहार्यपणे साहित्य पुरवणीतील 'पुस्तकाच्या जगात' या स्तंभामध्ये रुजू होत

गेली. अर्थात ही समीक्षा अत्यंत काटेकोरपणे केलेली नाहीच. कारण ती मुळातली भूमिकाच नव्हती. कठोर चिकित्सा आणि तर्ककर्कश समीक्षा यांचे मूल्य कोणतेही असो, मान्यवरांच्या प्रबोधनात्मक ग्रंथाचा विवेकाधारित परिचय करून देणे याचे मूल्य मला सर्वाधिक श्रेष्ठ वाटले. संबंधित लेखकांच्या प्रबोधन विषयाच्या संदर्भातील भूमिकेचे नेमके वेगळेपण कोणते आणि त्या भूमिकेचे ज्ञान परंपरेतील मूल्य कोणते? या प्रश्नांच्या संदर्भातच मी हे वैचारिक ग्रंथ आस्वादले आणि मराठी वाचकासमोर त्यांचे चित्रही उभे केले. पुस्तक परीक्षणाचा हा प्रकार कोणत्या समीक्षा प्रकारात बसतो याची उठाठेव करण्याची मला गरज नाही. एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावरील भारतीय आणि भारताबाहेरील मानवी जग आणि त्यांच्या क्रांतीचा, कल्याणाचा केंद्रीय प्रश्न डोळ्यासमोर ठेवून ज्या महापुरुषांनी आपले वैचारिक योगदान सिध्द केले त्यांचे आकलन आणि मूल्यमापन आज मान्यवर विचारवंत कसे करतात आणि त्यांचा परिणाम कोणता हा एक अभ्यास आणि उपयुक्ततेचा सुंदर विषय आहे. मान्यवर विचारवंतांच्या समोर मूल्यमापनासाठी थोर महापुरुष होते. त्यांच्यावर एकेरी स्वरुपाची जबाबदारी होती. ग्रंथ परिचय करून देतांना ग्रंथाचा विषय झालेले गांधी-आंबेडकरांसारखे महापुरुष आणि ग्रंथाचे मान्यवर लेखक या दोन्हींचेही परीक्षण करून परिचयात्मक समीक्षा सिध्द करण्याचे अवघड आणि दुहेरी स्वरुपाचे काम मला करावे लागले आहे.

मी विनम्रपणे सांगू इच्छितो की, समीक्षकाची ही दुहेरी भूमिका पार पाडण्यामध्ये एक अभ्यासक म्हणून मी प्रामाणिक राहिलो आहे. या भूमिकेला मी संपूर्णपणे न्याय दिला आहे असा माझा दावा नाही.

वृत्तपत्रीय समीक्षा व्यवहाराला दुय्यम मानण्याची एक हिणकस प्रवृत्ती स्वतःला 'ग्रेट' मानणाऱ्यांच्यामध्ये धुडगुस घालते आहे. हे केवळ त्या ग्रेट लोकांचेच दुर्दैव नसून संपूर्ण विचार वाङ्.मय व्यवहाराची शोकांतिका आहे. सर्वसामान्य वाचकांपर्यंत शंभर-दीडशे रुपयाचे वैचारिक ग्रंथ किंवा पन्नास साठ रुपयांची ललित पुस्तके जाऊन भिडणे आज आर्थिक दुरावस्थेने कठीण झाले आहे. रस्त्यावरच्या हातगाडी वरील पाव-भजी खातांना आणि चालू हाप चहा पितांना नानासाहेब गोरेंची प्रबोधन विषयक भूमिका, डॉ. भोळ्यांच्या शब्दातील म. फुले, जयसिंग पवारांचे राजर्षि शाहू, रा. ना. चव्हाणांचे भाऊराव पाटील, डॉ. सबनिसांचे आंबेडकर 'आपला महाराष्ट्र' सारख्या सामान्यांच्या कैवारी वृत्तपत्रातून सहजपणे वाचकाला भिडत असेल तर ही रस्त्यावरची ज्ञानगंगा मुक्त ग्रंथालय म्हणून का श्रेष्ठ ठरु नये? लोकशाही प्रक्रियेतील ज्ञानाच्या

विकेंद्रीकरणाची संकल्पना वृत्तपत्रीय समीक्षा व्यवहारातून अधिक समर्थपणे सिध्द होत आहे याची जाणीव तथाकथित विद्वानांना नसावी याची खंत नोंदलीच पाहिजे.

वृत्तपत्रीय सदराच्या जागेचे बंधन लक्षात घेऊनच ही परिचयात्मक ग्रंथ परीक्षणे लिहितांना काही उणिवा स्वाभाविकपणे राहू शकतात. पण माझ्या दृष्टीने प्रबोधनात्मक भूमिका सर्वदूर पोचवणे, ही भूमिका समर्थ करणे आणि अशा सर्व भूमिकांमधील संवादी सूर सामान्य वाचकांपर्यंत पोचवणे हेच महत्वाचे आहे.

माझ्या या पुस्तकामध्ये अनेक आत्मकथनांची आस्वादक परीक्षणे समाविष्ट केली आहेत. मुख्यतः दलित आत्मकथनांचीच निवड जाणीवपूर्वक केली आहे. भारतीय लोकशाही क्रांतीसाठी सर्व कनिष्ठ माणसांची अस्मिता प्रतिष्ठित होणे आज गरजेचे आहे. दलित जातींची उपेक्षा खूप झाली. त्या जातीतील माणसांच्या आत्मकथनांची उपेक्षा समीक्षक म्हणून होऊ नये ही माझी धारणा आहे. या जाणिवेच्या प्रवासात मला लक्ष्मण माने, शरणकुमार लिंबाळे, पा. ऊ. जाधव, रुस्तुम अचलखांब ही मंडळी अटळपणे भेटली. त्यांच्या आत्मकथा एका माणसाच्या नसून त्या त्या हीन ठरविलेल्या जातीतील सर्व माणसांच्या त्या आत्मकथा आहेत असे लक्षात आले. वेदनेने लिहिलेले साहित्य काळजाला भिडतेच. या सर्व आत्मकथा माझ्या हृदयाला भिडल्या. हे केवळ साहित्य नाही तर हे क्रांतीचे कोठारच आहे हेही जाणवते. गांधी–फुले–आंबेडकर याच दलित माणसाच्या मुक्तीचा विचार मांडत होते. यांचाच दबलेला आवाज त्यांना मुक्त करून बुलंद करावयाचा होता. सर्व कनिष्ठ जातींच्या या आत्मकथा भारतीय इतिहास आणि संस्कृतीला आव्हान देत उभ्या आहेत. भारतीय समाज क्रांतीची बीजे पेरत–पेरत या दलित आत्मकथा पुढे जात आहेत. असामान्य महात्म्यांचे चरित्रग्रंथ आणि सामान्य दलितांचे आत्मचरित्र या दोन्हीमधील संबंध हेरून त्यांचे एकत्रीकरण एकमेकाच्या सान्निध्यामध्ये मी या ग्रंथात केले आहे.

आदर्श उंचीकडे झेपावण्यासाठी आश्वासक आशिर्वाद देणारे वा. रा. तात्या, नैतिक मूल्यांवरील अविचल निष्ठा सतत तेवत ठेवाव्यात असे आपल्या व्यक्तित्वाच्या उदाहरणातून सांगणारे प्राचार्य नानासाहेब मा. य. वैद्य, सर्व सुख–दुःखात कौतुकाने पाठीवर हात ठेवून दिलासा व प्रोत्साहन देणारे प्राचार्य जे. जी. खैरनार, सत्यनिष्ठेतून डोळसपणे ग्रंथाचे, माणसांचे आणि परिस्थितीचे अचूक आकलन आणि मूल्यमापन करण्याची दृष्टी देणारे डॉ. श्रीपाल सबनीस, आयुष्याच्या वाटेवर उशीरा भेट होऊनही अचानकपणे 'आपला महाराष्ट्र'च्या 'बहर' साहित्य पुरवणीची मोठी जबाबदारी विश्वासाने माझ्यावर सोपवणारे

स्नेहल संपादक मित्र श्री. हेमंत मदाने, प्रेसमधील ज्येष्ठ सहकारी श्री. लिंबाजी मोरे, गुळवे तात्या, श्री. डी. बी. पाटील, शिवाजी साळुंके व 'बहर'च्या बहरण्याचा ध्यास घेतलेला विकास कपोले, प्रकाश देवभानकर या स्नेही सहकार्यांसह विजय अभ्यंकर, गोसावी, दिलीप साळुंके, सुनिल पाटील, किरण पाध्ये, भानुदास खैरनार आणि विद्यावर्धिनी ग्रंथालयातील श्री. परमेश्वर पाटील, सुभद्रा चौधरी, चंद्रकांत वाणी, विलास देवांग, वाघ, सोनवणे या सर्वांचे कर्तव्यापोटी ऋण नोंदवणे अटळ आहे.

पापण्या न मिटता हाताचा पाळणा करून काल आणि आजही ज्यांनी माझी चिंता वाहिली आणि दु:ख हरण केले व उत्कट भावनेसह समर्थ आशिर्वादाची पुण्याई ज्यांनी कायम स्वरूपी मला बहाल केली ती माझी आई सौ. वत्सलाबाई, वडील श्री. काशिनाथ पोतदार, भाऊ श्री. सुरेश पोतदार, वहिनी सौ. मंगला पोतदार, श्री. सुरेश वाघ, बहीण सौ. लता वाघ, मनापासून प्रेम करणारे श्री दगडूकाका जगताप, प्रिय मित्र श्री. जगदीश देवपूरकर यांच्या ऋणाची नोंद करूनही मी कायम ऋणात आहे.

माझ्या खडतर जीवनाची समर्थ साथसंगत करीत असताना माझ्या सुखात न्हालेली आणि दु:खात होरपळूनही समरस झालेली माझ्या जीवनाची आणि पुस्तकाची सहृदय वाचक मुख्यत: प्रेरकशक्ती माझी पत्नी सौ. अनुराधा ही नोंद सर्व औपचारिकतेच्या पलीकडील आहे. कारण 'झेलम', 'कुणाल' आणि 'चैतन्याची पाने' या तिन्ही अपत्यांचा आनंद तिला समान आहे.

▲▲▲▲

# प्रास्ताविक

प्रा. कृष्णा पोतदार यांनी लिहिलेल्या 'चैतन्याची पाने' या पुस्तकासाठी प्रथमच मी त्यांचे रसिक वाचकांच्यावतीने आभार मानतो. आभार यासाठी की एका बाजूला पुस्तके बहुसंख्येने प्रकाशित होत असतांनाही दुसऱ्या बाजूने वाचकांची संख्या मर्यादित होत असल्याचे चमत्कारिक दृश्य साहित्य क्षेत्रात दिसत असतांना या पुस्तकाची उपयुक्तता व महत्व अत्यंत वेगळे आहे.

वृत्तपत्रसृष्टीशी प्रा. कृष्णा पोतदार हे साहित्य पुरवणीच्या संपादकपदाने इकडील चोखंदळ वाचकांना चांगलेच परिचित झालेले आहेत. धुळ्याच्या दै. आपला महाराष्ट्रच्या 'बहर' पुरवणीचे ते संपादक आहेत. अल्पावधीत या पुरवणीच्या संपादनात आपल्या विशेष रसिक दृष्टीचा परिचय वाचकांना त्यांनी घडवून आणला. अनेक विषयांच्या हाताळणीसोबत त्यांच्यातील सुजाण समीक्षक अधिक जागरुक असल्याचा प्रत्यय ते निवडीत असलेल्या साहित्यातून तर येतोच, पण त्यापेक्षा मराठीतील काही लक्षणीय पुस्तकांचा परिचय दर आठवड्याला करुन देण्याच्या त्यांच्या उपक्रमाचे अधिक कौतुक करावेसे वाटते. जिल्हापातळीवर प्रकाशित होणाऱ्या दैनिकाच्या एक स्तंभातून अशा तऱ्हेचा प्रयत्न हा तुरळकच म्हणावा लागेल.

केवळ हाती लागतील त्या पुस्तकांचा वा परीक्षणासाठी येणाऱ्या ढीगभर पुस्तकातून एखाद्या पुस्तकावर परीक्षण करण्याचे सर्वसाधारण संपादकीय धोरण असते. प्रा. पोतदारांना या जुजबी पूर्वअटी मान्य नाहीत. त्यांची साहित्याकडे आणि सामाजिक जाणिवांकडे पहाण्याची एक विशेष दृष्टी आहे. आणि या दृष्टीतूनच ते परिचय करुन द्यावयाच्या एका पुस्तकाची निवड करुन, त्याचा साकल्याने अभ्यास करुन त्या पुस्तकावर समीक्षापर लेखन करतात. 'चैतन्याची पाने' या त्यांच्या पुस्तकातून समाविष्ट झालेली समीक्षणे याची साक्ष होत.

'वृत्तपत्रीय अभिप्राय' हा तसा थोडासा बदनाम झालेला शब्दप्रयोग ठरावा आणि अशी विश्वसार्हता गमावण्याचे श्रेयही वृत्तपत्राकडे बघण्याच्या काही अपरिपक्व संपादकीय दृष्टीकडे जातेही! वृत्तपत्रीय लिखाणाच्या काही मर्यादा जरुर असतात हे निर्विवाद. लोकाभिरुची सांभाळणे; तिची अभिवृध्दी करणे, सर्व सामान्य वाचकांची साहित्य विषयक वा वैचारिक जाण हळुवारपणे विस्तृत करणे ही लक्ष्ये अशा संपादनासाठी आवश्यक असतातच. त्यामुळे सखोल, परिभाषा

संपन्न समीक्षेची वळणे टाळून सामान्य वाचकांना पेलवणारे आणि आनंद देणारे एक साधन म्हणूनही कटाक्ष बाळगावा लागतो. पण त्यामुळे अशा लेखनाचे मोल कमी होण्याचे काहीच कारण नसते. किंबहुना अशा तऱ्हेचा समतोल राखणाऱ्या लेखनाचे आवर्जून स्वागतच झाल्याचे दिसून येते. 'महाराष्ट्र टाईम्स' मधील वाचस्पतींनी करुन दिलेल्या पुस्तक परिचयांचे स्वागत आता आपण सर्वांच्या परिचयाचे झाले आहे.

आपल्या मर्यादेत असाच एखादा प्रयोग निष्ठेने स्वीकारुन पार पाडण्यातही एक आगळा आनंद असतो, आणि नेमका प्रा. पोतदार यांच्या 'चैतन्याची पाने' या संग्रहाने सिध्द होत असल्याचे निश्चित दिसते.

ग्रंथाच्या परिचयासाठी त्यांनी निवडलेली पुस्तके ही त्यांच्यातील प्रबोधनशील वृत्ती प्रकट करणारी आहेत. त्यांच्या भावनाशील आणि संवेदनशील वृत्तीला आवाहन करणारी आहेत हे सहज लक्षात येईल. त्यामुळेच कै. नानासाहेब गोरे यांचे 'येशूचा वधस्तंभ' किंवा प्रा. भास्कर लक्ष्मण भोळे यांचे 'महात्मा फुले : वारसा आणि वसा' यासारखी प्रगल्भ सामाजिक चिंतन असोत, किंवा मुक्ता सर्वगोड यांचे 'मिटलेली कवाडे' सारखे गुणसंपन्न पण क्वचित दुर्लक्षित झालेले आत्मकथन असो, त्यांच्या संपादकीयपेक्षा रसिक-दृष्टीला आवाहन ठरावे असे स्पष्ट जाणवते.

पुष्कळदा लेखनातील अथांग अमर्याद अशा वैचारिक रुपाचा वेध घेतांना वृत्तसृष्टीच्या मर्यादांचेही भान प्रकर्षाने ठेवणे आवश्यक असते. या मर्यादांनी क्वचित कुचंबणा होत असल्याचेही आपणास जाणवते. पण तरीही लोकेषणा ही या सृष्टीची अत्यावश्यक गरजही डोळ्याआड करता येत नसल्याने, असा समतोल सांभाळणे ही थोडी बौध्दीकच नव्हे तर मानसिकही कसरत असते. प्रा. कृष्णा पोतदार यातून यशस्वीपणे मार्ग काढतांना दिसतात.

त्यांनी रसिकांच्या भेटीला आणलेली पुस्तके ही केवळ त्यांच्या साहित्य विषयक दृष्टीची द्योतक नाहीत तर सामाजिक संदर्भातील आता बहुचलनी म्हणून क्वचित हेटाळणीचा वाटावा पण मुळात खरे तर महत्वाच्या 'बांधिलकी'चे मूल्य त्यांना अधिक महत्वाचे वाटते हे विशेष होय. लोकाभिरुचीची कास धरतांना लोकानुययाशी आपल्याही नकळत भिडण्याची शक्यता असते. प्रा. पोतदार यांनी या दोन मर्यादातील अंतर फार तटस्थपणे ठेवले आहे आणि एका दृष्टीने अतिशय आजच्या गतिमान जीवनातही अटळपणे का होईना ज्या ग्रंथाचा परिचय समाजाला होणे आवश्य वाटते त्यांचा परिचय करुन दिला आहे. एकापरीने हे एक सामाजिक कर्तव्य त्यांनी पार पाडले आहे.

नव्हे, सामाजिक ऋण विमोचनाची ही जणू नांदी आहे.

काही निवडक, वेचक अशा वीस बावीस पुस्तकांचे सान्निध्य घडवून दिल्याचे कार्य या संग्रहाने केले आहे. त्यासाठीसुध्दा केवळ प्रा. कृष्णा पोतदार हे अभिनंदनास पात्र आहेत. अपेक्षा एवढीच की हा वसा त्यांनी कटाक्षाने पुढे चालावावा.

**डॉ. भा. ज. कविमंडन**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रबोधनाचे बुद्धी प्रामाण्यवादी विचारमंथन | ०१ |
| २. | महात्मा फुल्यांच्या विचार व कार्याचे साक्षेपी मूल्यमापन | ०६ |
| ३. | निष्काम कर्मयोगाचे अधिष्ठान | १५ |
| ४. | उगवतीचा क्रांतीसूर्य : नव्या निष्कर्षांचा वस्तुनिषठ आलेख | १९ |
| ५. | निष्काम व निर्भय समाज सेविकेची कैफियत | २३ |
| ६. | युग पुरुषाचे विविधांगी मुल्यांकन | २७ |
| ७. | राजर्षीच्या युगप्रवर्तक व उत्तुंग कार्याकडे टाकलेला दृष्टीक्षेप | ३२ |
| ८. | मानव मुक्तीच्या अस्मितेचे हुंकार | ३७ |
| ९. | जातीविहीन अनैतिकतेच्या विळख्यात सापडलेल्या समाजाचा वस्तुनिष्ठ आलेख | ४१ |
| १०. | मनाच्या आणि वर्तमानाच्या दुभंगलेल्या अवस्थेची प्रतीती | ४६ |
| ११. | शोशणग्रस्त धर्मातरितांच्या प्रश्नांना वाचा फोडणारा ग्रंथ | ५१ |
| १२. | जातींमधील अंतर्गत जातीयतेचा संघर्ष | ५५ |
| १३. | विविधांगी मनोकळांनी समृद्ध गावकळा | ५९ |
| १४. | 'गावकी'च्या जाणिवेत चळवळीचे भान | ६३ |
| १५. | अधांतरी जीवन व्यथेचा खोल सुरूंग | ६१ |
| १६. | दलीत स्वकथनांचे पञ्येय | ७२ |
| १७. | अभावग्रस्त समाजाची सामा जिकता | ७६ |
| १८. | सरळ रेषेतील आकर्षक जीवन प्रवास | ८० |
| १९. | नव-आंबेडकरवादी भूमिका मांडणारा धाडसी ग्रंथ | ८५ |
| २०. | जीवनाभूतीचे विदारक वास्तव | ८९ |

# प्रबोधनाचे बुध्दीप्रामाण्यवादी विचारमंथन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध ३५६६
वा. क्र. २७१०६
८११०३
ग्रं. शाखा (स्वाक प्रत)

येशूचा वधस्तंभ
ना. ग. गोरे
चेतश्री प्रकाशन, अमळनेर.
मूल्य रु. ६५/-



आधुनिक युग हे विज्ञानवादी आहे. विज्ञानाचा संबंध माणसाच्या बुध्दीशी आहे. बुध्दी पामाण्यवादी भूमिकेतून आजच्या समाज, धर्म आणि राज्यव्यवस्थेकडे बघितले पाहीजे. मानवी जीवनातील अनिष्ठ पथा, परंपरा, रुढी यांच्याकडे बुध्दीवादी भूमिकेतून पाहिले तरच जीवनातील विसंगती आपल्याला शोधून काढता येतील. मानवी जीवनाच्या इतिहासाचा वेध घेतला असता आपल्याला असे दिसून येईल की वेळोवेळी मानवाने आपल्याला उत्तम समाज जीवन जगण्यासाठी काही नियम आणि परंपरा निर्माण केल्या. परंतु काळ हा कधीच एकसारखा असत नाही. त्यानुसार ते नियम आणि त्या परंपराही बदलायला पाहिजे. मानवी शरीरातील एखादा रोगग्रस्त हिस्सा ज्यापमाणे जगणे असह्य करतो आणि म्हणून आपण शस्त्रकियेद्वारा त्याला

काढून टाकतो आणि निरोगी जीवनाचा आनंद घेतो, त्याचपमाणे समाज जीवन हे कालबाह्य रुढी, परंपरांनी गस्त असेल तर त्या समाजाला आणि राष्ट्राला स्वातंत्र्याचा खरा आनंद हा कधीच उपभोगता येणार नाही. म्हणून सर्वप्रथमं मानवी जीवन दुर्बल करणाऱ्या रुढी–परंपरा नष्ट केल्या पाहिजेत. विज्ञानवादी युगात बुध्दिपामाण्यवादी भूमिकेनेच आपल्याला निकोप समाज जीवन आनंदाने जगता येईल.

महाराष्ट्रात नानासाहेब ना. ग. गोरे हे ज्येष्ठ समाजवादी विचारवंत म्हणून प्रसिध्द आहेत. नानासाहेब जेव्हापासून सामाजिक चळवळीत आहेत तेव्हापासून त्यांनी गेली अनेक वर्ष जे लिखाण केले आहे त्यात त्यांची ही भूमिका पकर्षाने राहीली आहे. 'येशूचा वधस्तभ' हे नानासाहेबांच्या वैचारिक लेखांच्या संगहाचे पुस्तक नुकतेच पकाशित झाले आहे. या पुस्तकात वेळोवेळी त्यांनी लिहीलेले १५ लेख या ठिकाणी संकलित करण्यात आले आहेत. प्रसंगानुरुप केलेले लिखाण असूनही आजही त्या लेखांचा ताजेपणा संपलेला नाही. 'महाराष्ट्राच्या तरुण पिढीस' अर्पण केलेल्या ह्या लेखांसंबंधी आपलं मनोगत व्यक्त करतांना म्हणतात की, या नंतरच्या काळात ज्या विषयांची चर्चा चालूच राहणार आहे. त्या चर्चेत सुध्दा ते उपयुक्त ठरु शकतील आणि विशेष म्हणजे खरोखरच हे लेख विचार आणि कृतीला चालना देणारे आहेत.

'येशूचा वधस्तंभ' या पुस्तकातील लेख वाचत असतांना सातत्याने हे जाणवत राहतं की आपल्या बुध्दीपामाण्याच्या फुटपट्टीवरच नानासाहेबांनी मांडलेल्या प्रत्येक विचारात विद्वत्तेचा, ज्ञानाचा, बुध्दीचा यात्किंचतही अहंकार कोठेही आढळून येत नाही, अत्यंत नम्र परंतु तितक्याच परखड शैलीत ते आपले विचार स्वच्छपणे मांडतात. 'देशकारण आणि मध्यमवर्ग' या लेखात समाजस्थित्यंतराच्या घटनेला वेग यावा असे जर वाटत असेल तर मध्यमवर्ग ही भूमिका अधिक जोमदारपणे करू शकेल असा त्यांना विश्वास वाटतो. जोपर्यंत या देशातील मध्यमवर्गातील तरुणांमध्ये जागरण होणार नाही तो पर्यंत समाज परिवर्तन अशक्य आहे. 'बुध्दम शरणं गच्छामि' या लेखात अन्य कुठल्याही रुढी–परंपरांना शरण जाण्यापेक्षा बुध्दीवादी मार्ग स्विकारण्याचे ते आवाहन करतात. परंतु बुध्दीवाद्यांची भूमिका पाहिजे तितकी सरळ नाही. बुध्दीवाद्यांसमोरील आव्हान फार मोठे

आहे आणि त्याच्यावर मात करतांना स्वजनांशीच दोन हात करावे लागणार आहेत. [ पृ. १० ].

साने गुरुजी हे नानासाहेबांचे प्रेरणा आणि श्रध्दास्थान आहे. 'स्वप्न-भाषण' हा त्यांच्या निधनानंतर त्यांनी लिहीलेला लेख आहे. अत्यंत भावनापूर्ण परंतु वस्तुनिष्ठतेची साथ न सोडलेल्या या लेखात गुरुजींच्या अखंड जीवन यज्ञाचा आढावा ते घेतात आणि म्हणतात की गुरुजींचे सर्व आयुष्य दुःखितांचे दुःख दूर करण्यात गेले. परंतु गुरुजींनी हे कार्य कधी थांबविले नाही. नानासाहेब म्हणतात, 'मार्गावरचे काटे दूर करता करता तुमचे हात रक्त बंबाळ झाले, पण काटे सरत ना आणि तुमच्याने थांबणे होईना...'' [पृ.१५] शहाबानू या वृध्द तलाक मिळालेल्या मुस्लिम स्त्रीने आपल्या न्याय्य हक्कांसाठी जो संघर्ष केला तो सूक्ष्म का होइना पण क्रांतिकारी होता. आज ना उद्या ह्या कांतीचा वणवा झाल्याशिवाय राहणार नाही असा त्यांना विश्वास वाटतो. 'हिंसा युग आणि शास्त्रज्ञ' या लेखात शास्त्रज्ञांच्या महत्वपूर्ण भूमिकेचा ते वस्तुनिष्ठ विचार करतांना दिसतात. शास्त्रज्ञांना ते सवाल करतात की, ''वैज्ञानिक संशोधक विज्ञानाच्या आणि संशोधनाच्या कोणत्या तरी टप्प्यावर असे ठामपणे म्हणणार आहेत का की विज्ञानाच्या या शाखेत या पुढचे आम्ही संशोधन करणार नाही, कारण पुढे गेल्यास सर्वनाश आहे!'' [पृ.२७] त्यांनी हिंसेचे पुजारी म्हणून जगावे. 'काळ आणि काळे बदलत आहेत' या लेखात अमेरिकेतील निग्रोंच्या समाजजीवनाचा आढावा घेतांना ते म्हणतात की गोरे आणि काळे यातला संघर्ष संपतो आहे. 'काळे व गोरे' हे दोन शब्द जरी परस्परविरोधी प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर आणीत असल्या तरी वास्तवात त्यांचे परिघ ऐकमेकांजवळ आलेले आहेत आणि ते टकरीच्या अथवा संघर्षाच्या पवित्र्यात जवळ येत नसून मिलाफाच्या व संगमाच्या स्वरुपात जवळीक साधत आहेत. [पृ. २८] 'कुराण सार' सांगतांना ते म्हणतात की, कुराण वाचतांना ही गोष्ट सहज लक्षात येते की बायबलमधील जुना करार आणि नवा करार पायाभूत धरुन त्यावर कुराणाचे बांधकाम झालेले आहे. [पृ. ३५] फलटण मध्ये दलितांवर हल्ले चढवतांना सवर्णांनी 'जय शिवाजी, जय भवानी' अशा घोषणा दिल्या. नानासाहेब ह्या प्रकारची गंभीर दखल घेतात. जो धर्म आपल्यावर एवढे

अत्याचार करतो तो का बदलू नये असे सर्वसामान्य दलिताला किंवा अबला स्त्रीला वाटण्यात काय गैर आहे असा पश्न ते विचारतात [पृ.४३]

'येशूचा वधस्तंभ' या लेखात नानासाहेब म्हणतात की बायबलमधील 'नवा करार' ही येशूची स्वतंत्र विचाराधारा आहे. जुन्या करारात एखाद्या मागासलेल्या जातीजमातीपमाणे धर्मकल्पना होती. पशुबली, पुरुषपधान संस्कृती, स्त्री म्हणजे केवळ पजोत्पादनाचे साधन, देवाची अनिर्बंध सत्ता, सामाजिक अस्थैर्य, होळीगणिक राज्य अशा मर्यादीत स्वरुपाच्या ज्यू समाजाच्या अवस्थेचे वर्णन आहे. 'नव्या करारात' मात्र येशूची स्वतंत्र परंतु कांतिकारी विचारधारा आहे. येशूने पुरोहितांवर व धनिकावर केलेली घणाघाती टीका, शतकातनुशतके सांभाळलेल्या पथांना आव्हान देऊन पचलित समाजव्यवस्थेला धक्का दिला. परिणाम हा झाला की येशूला आपला सूळ खांद्यावर घेऊन वधस्थळापर्यंत आपल्याच पायांनी चालत जावे लागले. [पृ. ४६] नवी विचारधारा पतिपादन केल्याबदद्ल त्याला सुळावरचे मरण पत्करावे लागले. म्हणून आजच्या कांतिकारकांना संदेश देतांना नानासाहेब म्हणतात की 'कांतिकारकाला, मग तो राजकीय क्षेत्रातला असो, या सुळाचे भान ठेवावेच लागते.' [पृ. ५०] कुठल्याही देशाचा विचार करता धर्म हा राष्ट्राची किंबहुना धर्माला आधारशिला मानून कोणतेही राष्ट्र आधुनिक काळात टिकू शकेल काय? असा पश्न उपस्थित केला आहे.

'तिमिरातून तेजाकडे' या लेखात नानासाहेबांनी आपल्या आयुष्यभरच्या वैचारिक जडणघडणीचा आढावा घेतला आहे. तरुणवयात मार्क्सचा पडलेला पभाव, स्वातंत्र्यलढयातील गांधींच्या विचाराच्या पभावाने आयुष्याने वेगळी वाट निवडली तरी मार्क्सवादी किंवा गांधीवादी अशी भूमिका चिकटवली नाही. स्वतंत्र, बुध्दीवादी विचारसरणीच आदर्श मानली. ते म्हणतात की, 'माझ्या जीवनात मी भावनेपेक्षा विचारांना आणि विचाराहून कृतीला अधिक महत्व देत आलो आहे.' [पृ. १०२] किंबहुना कृतीयुक्त मार्गच तिमिरातून तेजाकडे नेणारा असतो असा विश्वासही व्यक्त केला आहे. तात्पर्य एकूणच नानासाहेबांनी वेळोवळी घडलेल्या घटना. पसंग यांची बुध्दीवादी चिकित्सा करून कृतीला योग्य असा विचार देण्याचा पयत्न केला आहे. आपल्या या उद्देशात ते सफल होतील असा

विश्वास युवकांनी त्यांना देण्यास काही हरकत नाही. त्यासाठी सर्व तरुण-तरुणींनी या विचारांना आत्मसात करायला हवे.

▲▲▲▲

# महात्मा फुल्यांच्या विचार व कार्याचे साक्षेपी मूल्यमापन

मा. ज्योतिराव फुले : वारसा आणि वसा
प्रा. भा. ल. भोळे
साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
मूल्य रु. ८०/-

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात जे समाजसुधारक आणि समाजचिंतक होऊन गेले त्यात महात्मा ज्योतीबा फुल्यांचे स्थान हे अतिशय महत्वाचे आहे. गत वर्ष हे महात्मा फुल्यांचे स्मृती शताब्दी वर्ष होते. या निमित्त म. फुल्यांवर शेकडो गंथ लिहिले गेले असतील. परंतु खऱ्या अर्थाने फुल्यांच्या विचारसरणीला, जीवित कार्याला व प्रबोधनाच्या क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या ग्रंथात ज्याचा आपण अभिमानाने उल्लेख करू शकतो तो ग्रंथ म्हणजे सुप्रसिध्द विचारवंत भास्कर लक्ष्मण भोळे यांचा 'महात्मा ज्योतिराव फुले : वारसा आणि वसा' हा होय. म. फुल्यांनी वर्तमानकालीन समाजाचा अगदी मूलगामी असा विचार केलेला होता. त्यांचा विचार सर्वस्पर्शी होता. मूलगामी समाज परिवर्तनाचा होता. ब्राम्हणी वर्चस्वाने आवळल्या गेलेल्या



भारतीय समाजाची समग्र पुनर्रचना झाली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. ज्योतिराव फुले यांना शूद्रादि-शूद्र समाजाची गरज कळालेली होती. किंबहुना सर्वसामान्य कष्ट करणाऱ्या समाजाबद्दलची अपार तळमळ त्यांच्या साऱ्या विचारातलं जिवंत सत्य आहे. म. फुल्यांनी आपलं सबंध आयुष्य असहाय्य, अगतिक, दुर्बल पीडित शुद्रांसाठी वेचले आणि त्यांच्या कार्याची खरी ओळख जर समाजाला होणार नसेल तर त्या समारंभांना काही किंमत नाही. डॉ. भालचंद्र फडके म्हणतात की, 'ज्योतिरावांना जयजयकार, पुतळे-उत्सवादी देव्हारे किंवा भंपक भाषणबाजी एवढेच जर शताब्दी निमित्ताने आपण करीत बसलो तर २१ व्या शतकात पुन्हा फुले अज्ञातवासात जातील.'' [पृ. १०] म्हणून त्यांच्या विचार कार्याबद्दल ज्यांना आस्था असेल त्यांना हा धोका ओळखायला पाहिजे. प्रस्तुत ग्रंथाचे लेखकही 'स्मृतिशताब्दी' निमित्त सत्यशोधक या लेखात या धोक्याची आठवण करून देतात. फुले विचारांच्या मुलस्त्रोताचा आढावा घेतांना म्हणतात की, फुल्यांनी उभी केलेली सत्यशोधक चळवळ ही सामाजिक व धार्मिक पुनर्रचनेची चळवळ होती. राजकारणाचे तिला वावडे होते. बुध्दिप्रामाण्य, इहवाद, उदारमतवाद आणि समतावाद ही त्यांच्या चळवळीची चतुःसूत्री होती. ती सर्वांनी लक्षात घेणे महत्वाचे आहे. हेही लक्षात घेणे आवश्यक आहे की, ब्राम्हणशाहीला विरोध हा त्यांच्या सत्यशोधक चळवळीचा फक्त एक भाग होता. ब्राम्हणशाहीविरोधा इतकाच फुल्यांच्या विचारकार्याचा दुसरा महत्वाचा भाग होता तो म्हणजे स्त्री-शूद्रातिशूद्रांना संघटीत करण्याचा. ब्राम्हणांवर ज्योतिरावांनी केलेली टीका जेवढी सर्वमान्य होती तेवढी एकवाक्यता सत्यशोधकांमध्ये स्त्री शिक्षणाच्या प्रश्नावर नव्हती. काहींनी तर अगदी उघडउघड विरोध केला होता. थोडक्यात सत्यशोधक समाज ही चळवळ बंदिस्त स्वरुपाची नव्हती. परंतु त्यावेळी तिची बांधणी बरीच शिथील आणि वैचारिक भूमिका लवचिक होती. सोबत काम करणारे सभासद हे ज्योतिरावांचे अनुयायी असण्यापेक्षा सहकारी होते. त्यांनी आपली निर्णयक्षमता चळवळीपुढे गहाण टाकली नव्हती. [प्र. १५] आज विविध प्रकारच्या चळवळी सुरु आहेत. पण त्यांच्यात संघटितपणा नाही. त्यांना दुभंगण्यासाठी काही शक्ती निरंतर प्रयत्नशील आहेत. ज्योतिरावांचा क्रांतिगर्भ सत्यशोधक विचार त्यांना

एकत्र आणण्यास समर्थ आहे. म्हणून जे नवसमाज रचनेचे पुरस्कर्ते आहेत त्यांनी अशा वेळी गाफील राहून चालणार नाही. जात-जमातवादीच्या व धार्मिक पुनरुज्जीवनवादाच्या आजच्या काळात फुल्यांचा समतावाद आणि सत्यधर्म विचार या संकल्पना समाजात प्रयत्नपूर्वक राबवण्याची शिकस्त त्यांनी केली पाहिजे. तद्वतच लोकप्रश्नांच्या सोडवणुकीचा जो एक आदर्श नमुना फुल्यांनी त्यांच्या हयातीत समाजासमोर ठेवला होता त्यापासूनही आजच्या परिवर्तनवाद्यांनी शिकण्यासारखे बरेच काही आहे. [पृ. २३]

म. फुले 'समाजसुधारक की क्रांतिकारक' या लेखात ज्योतिबांनी केलेल्या समाज सुधारणांचा आढावा घेतला आहे. ज्योतिबांचे विचारच इतके अभिनव आणि सामर्थ्यशाली आहेत की, विरोधकांनी त्यांना गाडून टाकण्याचे कितीही प्रयत्न केले तरी त्यांना ते पुरून उरले आहेत. फुल्यांनी सामाजिक जीवनातील विकृतीवर तर जोरदार हल्ला केलाच. पण या विकृतींना प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या सर्व बाबींवर प्रहार केला. समाजमनात पक्के घर करून बसलेल्या मिथ्या कथांची त्यांनी तर्कशुध्द पध्दतीने चिकित्सा केली. जात्याभिमान, धर्माभिमान, पंथनिष्ठा यांना छेद देणाऱ्या मानवनिष्ठेचा पुरस्कार केला. जुन्या रुढी, कर्मकांडे, जपजाप्य यांचा पोकळपणा सिध्द केला. स्त्री-शूद्रादिकांना पशुतुल्य जीवन जगायला भाग पाडणारी सर्व पारंपारिक तत्वेच धिक्कारली आणि स्वातंत्र्य, समता व बंधुता या नव्या मूल्यांची रुजवात करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यांचे दुसरे क्रांतीकारी वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा संपूर्ण विचार हा मुख्यतः मानवकेंद्री होता. माणसाला माणूस म्हणून ओळखणे आणि जाती, धर्म, पंथ, यांना इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष ईश्वराला सुध्दा माणसापेक्षा गौण ठरवणे या बाबीवर शंभर वर्षापूर्वी निश्चित कुणाचाच विश्वास बसला नसता. समाजाची रचना, कार्यपध्दती व नीतिनियम या सर्व गोष्टींच्या दृष्टनिष्ठेचा एकमेव निकष ज्योतिरावांना अभिप्रेत होता आणि तो म्हणजे मानवी जीवनाच्या संदर्भात त्यांची उपयुक्तता. परंपरेच्या जोखडातून मानव्याची मुक्ती करणे हे जोतिराव फुले यांचे अवतार कार्य होते. [पृ. ३०] 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' हा म. फुल्यांचा ग्रंथ म्हणजे मानवमुक्तीचा महान संदेश देणारा ज्ञानकोश आहे. मानवी मनाला बंदिस्त करणाऱ्याला प्रत्येक सामाजिक संस्थेवर त्यात त्यांनी टीकास्त्र सोडले असून

त्यांच्या जागी अंमलात आणावयाच्या पर्यायी सामाजिक संस्थांची तरफदारी केली आहे. बुध्दी प्रामाण्यवादाच्या, विवेकाच्या निकषावर रूढी–परंपरांपासून धर्म–आचरणांपर्यंत पत्येक गोष्ट माणसाने घासून तपासून पाहावी, अशी त्यांची अपेक्षा होती. धर्म आणि ईश्वराबद्दल त्यांचे निदान होते की, सामाजिक दास्य, गुलामगिरी व शोषणाची ही प्रमुख आश्रयस्थाने आहेत. त्यांचा हा पक्का विश्वास होता की जगातील कोणताच धर्म आधुनिक विज्ञान युगातील माणसाला मार्गदर्शन करण्यास समर्थ नाही. त्यांच्या मते माणसाचा खरा धर्म एकच संभवतो तो म्हणजे सत्यधर्म इतर धर्मापमाणेच याही धर्मात ईश्वर आहे. पण त्यांचे स्वरूप मात्र इतर कोणत्याही धर्मापेक्षा निराळे आहे. जोतीराव त्याच्यासाठी निर्मिक किंवा निर्माता अशी संज्ञा वापरतात. या निर्मात्याने अनंत सूर्यमंडळासह एकंदर सर्व प्राणिमात्रास या विश्वाच्या अमर्याद विस्तीर्ण पोकळीत निर्माण केले आहे. विशेष म्हणजे हा धर्म सार्वजनिक आहे. ''ईश्वर, अल्ला,गॉड, ब्रम्ह या सर्वाच्या विशिष्ट अनुयायांना सुध्दा आचरता येणारा हा धर्म सार्वजनिक आहे. किंबहूना, निर्मिक ही संज्ञा इतर सर्व ईश्वरवाचक संज्ञाना सामावून घेणारी आहे. ''[पृ.क. ३५] म. फुल्यांचे क्रांतिकार्य अन्य सुधारकांपेक्षा प्रभावी ठरले आहे. याचे एक कारण ज्या शुदातिशूद्रांच्या अभ्युदयासाठी ते धडपडत होते त्यांच्या व्यथावेदनांचा साक्षात अनुभव त्यांनी घेतला होता. अन्य सुधारकांचा दलित कळवळा कितीही प्रामाणिक असला तरी परिवर्तनाची प्रेरकशक्ती निर्माण करण्यास तो पुरेसा नव्हता. फुल्यांचे विचार पिळवटणाऱ्या अंतःकरणाच्या हुकारातून आलेले असल्यामुळे स्वाभाविकच अधिक क्रांतिकारक होते. फुल्यांच्या क्रांतिकारक विचारांचा गौरव करतांना भोळे म्हणतात की, फुल्यांचे विचार युगपवर्तक काल मार्क्सशी जुळणारे आहेत. मार्क्सने ते विचार अत्यंत शास्त्रीय व ग्रांथिक परिभाषेत मांडले असल्यामुळे त्यांना जगन्मान्यता मिळाली या उलट, फुल्यांनी ते आपल्या रांगडया व मराठमोळ्या भाषेत मांडल्यामुळे ते उपेक्षित राहिले पण अनेकदा असे वाटते की फुल्यांना मार्क्सवादी म्हणण्यापेक्षा मार्क्सलाच फुलेवादी म्हणणे अनेक अर्थानी अधिक यथोचित ठरेल ''[पृ. क. ३६] थोडक्यात फुल्यांच्या विचारांना मखरात बसवून त्यांना शेंदूर फासला जात आहे. तो खरडून काढल्याशिवाय त्यांच्या

विचारातील मूळचे क्रांतिकारकत्व समाजासमोर येणार नाही.

अंधश्रध्दा निर्मूलनाचे व्यापक कार्य महात्मा फुल्यांनी नवसमाजाच्या निर्मितीसाठी सुरू केलेले होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा, सामाजिक व आर्थिक न्याय आणि शोषणरहितता या मूल्यांवर आधारित नवी समाजव्यवस्था जर निर्माण करायची तर जुन्या, विषम व शोषण प्रधान व्यवस्थेला तिच्या पायाभूत मूल्यांसह उखडून टाकले पाहिजे अशी त्यांची ठाम धारणा होती. त्यांना नेहमी असे वाटे की जोपर्यंत ग्रंथप्रामाण्य व शब्दप्रामाण्य यांच्या मगरमिठीतून सोडवून सर्वसामान्यांना बुध्दिप्रामाण्यांची व विवेक निष्ठेची महती समजणार नाही तो पर्यंत नवसमाजानिर्मिती होणे अशक्य आहे. बुध्दिप्रामाण्याची महती पटवून देतांना ते खंत व्यक्त करतात की, माणसाने या अमोल पवित्र बुध्दीचे पुरेसे सार्थक केलेले नाही. वस्तुतः मानसिक दास्यातून मानवाची मुक्ती करण्याचे अगाध सामर्थ्य बुध्दीच्या ठायी आहे. पण बुध्दीचा वापर न करता माणूस असंभवनीय पुराण कथांवर तसेच ईश्वराच्या नावावर पुरोहित वर्गाने मारलेल्या भूलथापांवर आंधळा विश्वास ठेवू लागला आणि परिणामी त्याला मानसिक गुलामगिरी सहन करावी लागली.

माणूस बुध्दीवान असूनही अंधश्रध्देच्या आहारी जात असतो ईश्वर आणि कर्मकांडाच्या रूपाने अनेक अंधश्रध्दा जोपासल्या गेल्या आहेत. माणसाने पारब्ध, पाप, पुण्य, स्वर्ग-नरक, सद्गती-दुर्गती, कर्मविपाक वगैरे कल्पनांमधील फोलपणा पटवून देताना मानवाच्या ऐहिक जीवनाचे प्राधान्य त्यांनी अधोरेखित केले आहे. ''माणसाला इथेच आणि याच आयुष्यात आपल्या पाप-पुण्याचा झाडा द्यावा लागतो. गेल्या जन्मीच्या पाप-पुण्याच्या आधारे, इहलोकीच्या सामाजिक-आर्थिक विषमतेचे स्पष्टीकरण, समर्थन करणाऱ्या कर्मविपाकाच्या सिध्दांताचा जोतिबा निषेध करतात. पुनर्जन्मावर त्यांचा विश्वास नव्हता जन्मसिध्द जातीय उच्च-नीचता गुणाधिष्ठित असू शकत नाही. कारण ''सद्गुण-दुर्गुण पिढीजात स्वभाव नाहीत.'' अशी शास्त्रीय भूमिका त्यांनी घेतली आहे. ॥ प्राक्तनात होते तैसेची घडले । बह्माने लिहिले खोटे नाही ॥ प्रारब्धवादी मानसिकतेला सोडचिठ्ठी दिली आणि स्वतःच्या बळावर आपले ऐहिक जीवन अधिक सुखदायी करण्याचे आवाहन त्यांनी स्त्री शूद्रातिशूद्रांना केले

आहे. [पृ. ४६] त्यांच्या मते निर्मिकाने हे जग मानवाच्या उपभोगासाठी केले आहे. विवेक जागा ठेऊन माणसाने त्याचा अवश्य उपभोग घ्यावा. याचबरोबर जन्म, विवाह, ऋतूशांती, वास्तुशांती, प्रेतसंस्कार, श्राध्द वगैरे विधीतली निरर्थकता आणि भिक्षुकांचे पोटार्थी हेतू जोतिरावांनी वारंवार स्पष्ट केले आहेत. त्याचप्रमाणे फल ज्योतिष, बुवाबाजी ह्याही कशा फसव्या अंधश्रध्दा आहेत हे त्यांनी पटवून दिले आहे. सत्यशोधक चळवळीने अंधश्रध्दा निर्मुलनाचे काम करताना सर्व प्रथम ज्या व्यवस्थेमुळे अंधश्रध्दा उदयास आल्या त्यावर घाव घालणे, शिवाय शास्त्रीय मार्गाचाच अवलंब केल्यास अंधश्रध्देमुळे होणारे शोषण दूर होईल. उपदेश शिक्षण व पर्यायी आचार विचार एवढ्या गोष्टी देऊनही जर भोवतालची विषम आर्थिक चौकट जशीच्या तशीच राहिली तर अंधश्रध्दांचा कायमचा नायनाट कधीच होणार नाही. याचे सतत भान ठेवून अंधश्रध्दा निर्मूलनाच्या जोडीलाच दारिद्यनिवारण व शोषणमुक्ती यांच्याही चळवळी पूर्वी सुरू होत्या आणि आता अधिक गतिमान व्हाव्यात.

म. फुल्यांनी वापरलेल्या बोलीभाषेवर अनेक समीक्षकांनी आक्षेप घेतले आहेत. परंतु तीच भाषा त्यांना सर्वसामान्यांपर्यंत पोचण्यास उपयुक्त वाटत होती. त्यावेळेच्या मराठी पत्रकारांना आचारसंहितेबद्दल सांगताना ते लिहितात की, आडमार्गी, आडमुठे, असमंजस, पोटभरू, धंदेवाईक इ. विशेषणांचा आहेर मराठी पत्रकारांना करीत करीत त्यांनी त्या पत्रकर्त्यांच्या चुकांवर नेमके बोट ठेवले आहे. स्वतःच्या आचरणात काळेबेरे असलेल्या या पत्रकारांनी इतरांवर चिखलफेक करण्यापूर्वी आत्मपरीक्षण करावे, स्वतःला व स्वतःच्या पुरूषार्थाला गैरसोयीची असलेली वस्तुस्थितीही प्रामाणिकपणे मान्य करून लेखनांद्वारे मांडावी. समाजहिताचे भान कधीही सुट्‌दू देऊ नये, पुरावे देऊनच कोणतीही विधाने करावीत. [पृ. ६३]

‘राव जोतीचे । मार फुलांचे।।’ या लेखात म. फुल्यांच्या कवितेविषयी वस्तुनिष्ठ विवेचन आहे. फुल्यांची कविता ही पददलितांच्या दुःखाचा आर्त हुंकार देणारी कविता होती. तसेच ती काही वेळा पराकोटीची धारदार होऊन दंभावर व ढोंगावर सपासप वार करते. कधी ती गोऱ्या राणीची आर्जवे करते, तर कधी ती शिरजोर झालेल्या भटब्राम्हणांकडे क्रोधांच्या

तिसऱ्या डोळ्यांनी पाहाते, तर कधी ती शत्रू ओळखून 'मार फुलाचे' देते.

म. फुल्यांच्या समता तत्वाचा मूलगामी ऊहापोह अतिशय सखोलपणे लेखकाने केलेला आहे. ब्राम्हणशाहीचा विरोध करून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे हे मानवतावादी आंदोलन त्यांनी सुरू केले. यात जातीपाती व धर्म–वर्ण रहित समतावादी समाजाची रचना त्यांनी गृहित धरली. सारी माणसे एकाच निर्मात्याची लेकरे म्हणून परस्परांशी बहीण भावंड भावाने समतेच्या नात्याने जोडली गेलेली आहेत असे त्यांचे मत होते. अर्थातच या मूळ ख्रिस्ती कल्पनेचे फुल्यांना आकर्षण होते व वाटणे साहजिकच होते. परंतु त्यांच्या विचारातला कच्चा दुवाही लेखकाने अतिशय समर्पक पध्दतीने मांडला आहे. तो म्हणजे पाश्चात्य राजकर्त्यांच्या अंतस्थ शोषणावर कानाडोळा करणे. "आपल्या इंग्रजी राजकर्त्यांना ते माणूस–समतावादाचे प्रतीक मानतात. त्यांनी जगात अन्यत्र घातलेला अन्याय्य धुडगूस ते नजरेआड करतात. इंग्रजांची सत्ता ही साम्राज्यशाही होती ती केवळ राज्यसत्ता नव्हती, तर तिची स्वतःची स्वार्थी विचारप्रणाली होती. मूल्ये व प्रतीके होती आणि जातिव्यवस्थेइतकीच उतरंडरुपी प्रतीके ब्रिटिश राजवटीनेही या देशात खच्चून सोबत आणली होती. माणूस समतावादाचा हा दुसरा कुरूप चेहरा इतर अनेकाप्रमाणेच जोतिरावांना कधी दिसलाच नाही. समता स्वातंत्र्याची परकीय राज्यकर्त्यांकडून अपेक्षा बाळगणारे ब्राम्हण पुढारी स्वतः मात्र अस्पृश्यता आचरतात त्यावर आक्षेप घेणारे जोतिराव यामुळे लोकशाही मूल्यांची घोकंपट्टी करणारे राज्यकर्ते प्रत्यक्षात मात्र साम्राज्यशाहीच आचरतात, इकडे चक्क दुर्लक्ष करतात. [पृ. १३३] महात्मा फुले गौरवग्रंथात म. ज्योतिबा फुले यांचा सार्वजनिक सत्यधर्म या लेखात प्रा. मे. पु. रेगे म्हणतात त्याप्रमाणे, चातुर्वर्ण्याच्या सामाजिक रचनेला धार्मिक प्रामाण्य देण्यामागील ब्राम्हणांचा स्वार्थ आणि 'कावा' ज्योतिबांनी बरोबर हेरला. पण आधुनिक पाश्चात्य साम्राज्यशाहीमध्ये वांशिक उद्दामपणा आणि अरेरावी निर्घृण स्वार्थ आणि दुटप्पीपणा होता याची कल्पनाच त्यांना आली नाही. विशेष म्हणजे फुल्यांच्या वारसदारांनी ही विचारसरणी निष्ठेने पुढे चालविली. राज्यकर्त्यांनीही राष्ट्रीय सभेच्या विरोधात ब्राम्हणेतरांच्या व अस्पृश्यांच्या 'निष्ठावंत' चळवळींना वापरून 'फोडा आणि झोडा' चे

राजकारण काही काळ यशस्वी केले. पुढे स्वातंत्र्य जसजसे दृष्टीक्षेपात येऊ लागले तसतसे ब्राम्हणेत्तर चळवळीतील संरजामी व सधन नेत्यांनी राष्ट्रीय भांडवलदार वर्गाशी हातमिळवणी केली आणि पुढे यथावकाश शहरी ब्राम्हणी राजकीय श्रेष्ठींना शह देण्यासाठी त्यांनी ग्रामीण व जातीय हितसंबंध प्रभावीपणे वापरून घेतले. ज्योतिरावांच्या समतावादाचा पुरता पराभव करण्यात या राजकारणाचा फार मोठा वाटा होता आणि एका परीने जोतिरावांच्या वैचारिक मांडणीतले काही कच्चे दुवेच या राजकारणाला साधनीभूत ठरले होते. [पृ. १३४]

म. फुल्यांचा सार्वजनिक धर्म हा मनुष्यकेंद्री धर्मविचार करणारा होता. आपल्या या धर्माच्या आधाराने त्यांनी सांप्रदायिकतेवर कडाडून प्रहार केला. त्यांचा धर्म विश्वधर्म आहे. हा धर्म कोणत्याच एका समूहाची मिरासदारी नाही. काहींना विशेषाधिकारी आणि इतरांची नागवणूक ही विषमता त्याला मान्य नाही. दुराग्रह, मत्सर, हेवेदावे, खोट्या अहंता वा न्यूनगंड, वर्चस्व वा गुलामी यापैकी कशालाच तो थारा देत नाही. माणसामाणसात लिंग, जात, धर्म, वर्ण वगैरे आधारांवर पक्षपात करणे तो निषेधार्ह मानतो. श्रम प्रतिष्ठेला अनन्यसाधारण महत्व देतो. हीच त्यांची संकल्पना आहे. परंतु त्यांच्या निधनानंतर हा धर्म संपला. त्याचे एक स्पष्टीकरण असे दिले जाते की, भौतिक परिस्थिती व संस्कृती यांच्यातील अंतरसंबंध ज्योतिरावांनी पुरते लक्षात घेतले नव्हते. शिवाय ज्या शिक्षणाकडे ज्योतिरावांनी सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून पाहिले होते त्यातून प्रत्यक्षात जो शूद्रातिशूद्र तरुण शिक्षित वर्ग पुढे आला तो वृत्तीप्रवृत्तीने जैसे थे वादीच राहिला. त्यामुळे शूदातिशूद वर्ग आर्थिक, सामाजिक दृष्ट्या जिथल्या तिथेच राहिले. त्यांचे पुढारी मात्र जातीयतेच्या बळावर राजकीय स्पर्धेत यशस्वी होण्यातच इति कर्तव्यता मानू लागले. त्यांना सार्वजनिक सत्यधर्माची मूलतत्वे समजणे, पटणे, पेलणे केवळ अशक्यच होते. तळपातळीवरून त्या धर्माला आधारभूत ठरु शकेल असा मानसिकतेच्या अभावी तो धर्म ज्योतिरावांच्या पुस्तकात आणि निष्ठावंतांच्या मनात अधांतरीच राहिला. [पृ. १५१] खरं म्हणजे त्यांची सार्वजनिक सत्यधर्म ही संकल्पना काळाच्या खूप पुढे जाणारी होते. एकविसाव्या शतकातील तरुणाला ती आजही पुढे जाणारी वाटली तरी

काही नवल नाही ही वस्तुस्थिती आहे.

'सत्तेचे समाजलक्ष्यी अन्वेषण' या लेखात आपल्याला असे दिसून येते की, ज्योतिबांच्या काळात लोकशाही पध्दती अस्तित्वात नव्हती. परंतु तरीही लोकसत्ताक शासनव्यवस्थेचे पक्के समर्थक होते. खरेखुरे लोकसत्तात्मक राज्य निर्माण व्हायचे असेल तर सत्ता ही रयतेला सर्वप्रकारच्या दास्यातून मुक्त करणारी असली पाहिजे. परंतु ती पेलण्याची बौध्दिक आर्थिक क्षमता ही सामान्य नागरिकांच्या अंगी आली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. ज्योतिरावांना अभिप्रेत असलेल्या निकोप व विवेकी मानव सत्तेची कक्षा विशिष्ट राज्यापुरतीही मर्यादित नव्हती. तर ती त्याच्या पलीकडे जाऊन थेट विश्व मानवतावादापर्यंत जाणारी होती. [पृ. १६९] सर्व जगातील लोकांनी मुलामुलींना सत्यज्ञान दिल्यास सगळेच सद्‌गुणी होतील, कुणीच कोणावर स्वारी करणार नाही आणि निरर्थक फौजफाटे अनावश्यक होतील असे आदर्श चिंतन त्यांनी करून ठेवले आहे.

म. ज्योतिबा फुल्यांच्या विचारांचा आणि प्रत्यक्ष कार्याचा आढावा घेणाऱ्या या गंथातून फुल्यांची विश्वमानवातावादापर्यंत पोहोचणाऱ्या दृष्टीचा परिचय लेखकाने अतिशय सखोल विवेचनाद्वारे आपल्यासमोर मांडला आहे. म. फुल्यांच्या स्मृतीशताब्दी निमित्ताने प्रसिध्द होणाऱ्या या ग्रंथाचे स्वरूप सामान्यतः जुजबी, एकतर्फी, गुणगौरवी किंवा केवळ प्रासंगिक स्वरूपाचे राहू नये तर म. फुल्यांचे विचार आणि कार्य याचा वारसा चालविण्याचा वसा सर्वांनी घ्यावा अशी तळमळ लेखकाची आहे आणि त्यात त्यांना सफलता मिळालेली आहे, मिळणार आहे यात काही शंका नाही.

▲▲▲▲

# निष्काम कर्मयोगाचे अधिष्ठान

कर्मवीर भाऊराव पाटील : शोध आणि बोध
रा. ना. चव्हाण
संपादक : प्रा. मो. नि. ठोके
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
मूल्य रु. ४/-

आपल्या समाजाचे विचार आपण भाषण व जलसे याद्वारे जनतेपर्यंत पोहोचविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहोत, परंतु आपल्या विचाराप्रमाणे जनता सुधारत असल्याचे आढळून येत नाही. शिक्षण प्रसाराशिवाय याला परिणामकारक तोडगा मला तरी दिसत नाही. म्हणून बहुजन समाजाच्या मुलांना शिक्षण देण्याकरिता एक शिक्षणसंस्था स्थापन करणे आवश्यक आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांनी १९१९ मध्ये पुणे येथे श्री. केशवराव बागडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्यशोधक समाजाच्या परिषदेत उपयुक्त विचार मांडले होते. त्यांच्यावर म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा व शाहू महाराजांच्या कार्याचा प्रभाव अगदी खोलवर पडला होता.



'कर्मवीर भाऊराव पाटील शोध आणि बोध' हे श्री. रा. ना.

चव्हाणांच्या लेखसंग्रहाचे प्रा. मो. नि. ठोके यांनी संपादित केलेले पुस्तक. यात श्री. चव्हाणांनी कर्मवीरांवर १९७१ ते ८४ पर्यंतच्या काळात लिहिलेल्या लेखांचे संकलन आहे. ज्यातून कर्मवीर पाटलांच्या व्यक्तित्वाची आणि कार्याची ओळख आपल्याला होते. कर्मवीरांची कर्मभूमी जिल्हा सातारा ही आहे. येथूनच त्यांनी आपल्या लक्षवेधी कार्याला सुरुवात केली. आपल्या कार्यात आणि जीवनात त्यांनी सर्व धर्मांना समान मानून एक आदर्श असे आचरण केले. जे माणुसकीला दिलासा देणारे होते. आज कर्मवीर भाऊरावांचे नाव घेताच आपल्या डोळ्यांसमोर एखाद्या वटवृक्षाप्रमाणे पसरलेली, महाराष्ट्रात विख्यात असलेली 'रयत शिक्षण संस्था' उभी राहते. या विराट संस्थेच्या कार्याला बघूनच कर्मवीरांच्या कर्तबगार असामान्य व्यक्तित्वाची आपल्याला ओळख होते. भाऊरावांनी ही संस्था काढतांना एक व्यापक ध्येय आपल्या डोळ्यासमोर ठेवले होते. ते म्हणजे की केवळ उच्चवर्गच नाही तर समाजातील सर्व बहुजनसमाज हा शिक्षणसंपन्न व्हावा. त्यांना जनतेचे राज्य हवे होते. इतकेच नाही तर शेतकऱ्यांचे स्वराज्यही हवे होते. शेतकरी तर गरीब, कर्जबाजारी, अंधश्रध्दाळू व पिळला जाणारा असा विस्तृत वर्ग होता. संख्याबळ होते पण विद्याबळ नव्हते. शिकणे-सवरणे व लेखणी पाटी-पुस्तक हातात धरून लिहिणे वाचणे आपले काम नाही अशी शेतकऱ्यांची दृढ धारणा होती. भाऊरावांनी 'रयत शिक्षण संस्था' काढून आपल्या ध्येयाची मुहूर्तमेढ केली. 'रयत' म्हणजे सर्व प्रजा. ज्यात सर्वसामान्य लोक, दलित वर्ग या सर्वांचा समावेश असेल ती रयत. या शिक्षण संस्थेंच्या समाजातल्या तळा गाळातल्यांची मुले शिकू लागली आणि सर्व प्रकारचा जाती-धर्म भेदभाव विसरून एकोप्याने राहून मोठी होऊ लागली. तेव्हा लोकांना शिक्षणाची लालसा आणि किंमत कळू लागली, तेव्हा ते भाऊरावांना स्वतःहून मदत करू लागले व आपली मुले त्या शिक्षण संस्थेत पाठवू लागली. हे सर्व कार्य करताना भाऊरावांना सत्तेची लालसा नव्हती तर विद्येची तीव्र तहान होती. जेथे जेथे त्यांना विद्येचा अभाव जाणवला तेथे तेथे त्यांनी विद्येचे पेय उपलब्ध करून दिले.

कर्मवीर भाऊराव पाटील हे आपल्या गुणाधिक्य, कार्याधिक्य, निश्चय, एकतानता आणि विद्याप्रसाराच्या प्रबल महत्वाकांक्षेमुळे अमर झाले आहेत.

या अमरत्वाचे मूळ संस्थेच्या ध्येय व बीदवाक्यात आहे. 'स्वावलंबन' हे रयत शिक्षणसंस्थेचे एक प्रमुख बीद आहे. हे ब्रीद केवळ ध्येयवाक्यच नाही तर ते तत्वज्ञानही आहे. कारण स्वावलंबनात कुणीही मध्यस्थ किंवा त्रयस्थ नसतो. असतो फक्त 'स्व' ही अदैतावस्थेची स्थिती भारतीय चिंतन परंपरेचा एक महत्वपूर्ण टप्पा आहे. अद्वैतस्थितीत मध्यस्थ नसतो. आत्मा हा स्वोध्दारार्थपरमात्म्याशी सख्य करतो. परमार्थात व अध्यात्मात जे स्वावलंबन अत्यंत श्रेष्ठ व परमोच्च मानिले जाते. ते स्वावलंबनाचे परम तत्व ऐहिक व संसारिक उन्नतीसाठी, भाऊरावांनी पत्करले व ते सार्वजनिक केले. रयत शिक्षण संस्थेच्या मागे ही तत्वे आहेत. व्यक्ती या नात्याने भाऊरावांनी जो जीवनमार्ग अवलंबिलेला होता, ती जीवितसरणी संस्थेच्या मागे त्यांनी सार्वजनिक हितार्थ उभी केली. स्वावलंबन नसेल तर आत्मपरीक्षण व आत्मोध्दार अशक्य आहे. विधायक कार्याचा विस्तारही अशक्य होय. इतकेच नाही तर प्रपंचातील जरूर ती काटकसर स्वावलंबनाशिवाय अशक्य होते. ह्याप्रमाणे हे ब्रीदवाक्य जीवनाच्या अंगोपांगांना लागू पडते व इष्ट फलदायी होऊ शकते. कर्मवीरांच्या तत्वज्ञानाचा हा पाया आहे. माणूस तात्विक व तत्वनिष्ठ असल्याखेरीज, कर्मवीर होत नाही. निष्काम कर्ममार्गाला तात्विक अधिष्ठान नसेल तर त्या मार्गाचा काहीच उपयोग होत नाही. त्यांचे क्रियाहीन पांडित्य भारभूत व जड ठरते. कर्मवीर मात्र या सत्व परिक्षेत पूर्णपणे उतरले. कारण त्यांचे कार्यच त्यांच्या तत्वज्ञानाचा व कर्तृत्वाचा परिचय करून देते. भाऊराव हे म. फुल्यांप्रमाणे प्रवृत्तीवादी होते. त्यांचे तत्वज्ञान हे इहवादी उन्नतीचे होते. त्यांच्या शिक्षण संस्थेच्या कार्याकडे लक्ष वेधतांना लेखक म्हणतो की, 'रयत शिक्षण संस्था ही एक लोहचुंबक बनली होती. ज्यांनी ज्यांनी तिचा हात धरून आपापल्या गावात शैक्षणिक केंद्रे काढली ती माणसे फक्त विद्याप्रसाराच्या लालसेने भारावली होती. त्यांची तहान भागविली गेली. ती तहान सामुदायिक होती. तिच्यामध्ये सत्तेचे राजकारण नव्हते. आकुंचित महत्वाकांक्षा नव्हती. ही संस्था केवळ साताऱ्यालाच नाही तर महाराष्ट्राला भूषणभूत ठरली आहे.' हे व्यासपीठ पुष्कळांना उपयोगी पडले-पडत आहे. शिडीप्रमाणे भाऊरावांच्या रयत शिक्षणसंस्थेच्या कार्याचा उपयोग, वरती चढून जाण्यास पुष्कळांना झाला. सातारा जिल्ह्यात ग्रामीण

भागात एवढ्या प्रमाणात दुसरी मोठी भक्कम शिडी प्रथम नव्हती. दलितांना चढून जाण्यास इथे मोकळा वाव होता. शिरकाव करण्याचा एक उपलब्ध रस्ता मिळाला. शिक्षणप्रसार सर्व थरात एकसारखा समान संधीच्याद्वारे होण्यामुळे अखिल समाज पालटतो व समाजव्यवस्था देखील ठराविक प्रमाणात तरी परिवर्तनशील होते. याची साक्ष निर्माण झाली. मध्यम शिकलेला वर्ग हरएक जाती-जमातीत तयार झाला. भाऊरावांच्या कार्याचा व तत्कालीन चळवळींचे समालोचन करताना लेखक म्हणतो की, 'फुले, शाहु, शिंदे, भाऊराव यांचा दलित विषयक दृष्टिकोन ग्रामीण बहुजन समाजाला क्वचित पचविता आला नाही. म्हणूनही दलित प्रश्न खेड्यापाड्यात दबा धरून राहिला आहे व बऱ्यावाईट परिणामाला तो कारणीभूत होत असतो व होईल. त्याकडे पाठ झाल्यास फार वाईट व अनिष्ट परिणाम शक्य होतील. हे जर ग्रामीण व सर्वच बहुसंख्य समाजाला सक्रिय समजले नाही, तर ते राष्ट्रीय दुर्दैव ठरेल. आज मंडल आयोग सारख्या प्रश्नाला होणारा विरोध, दलितांना मारण्याचे व जाळण्याचे प्रकार राष्ट्रीय दुर्दैवाचेच प्रश्न आहेत. हे दूर करण्यासाठी भाऊरावांच्या विशाल कार्याचे महत्व जाणून घेणे आवश्यक आहे. पुनरावृत्तीचे दोष सोडल्यास भाऊरावांच्या विराट कार्याचे दर्शन करून देण्यात लेखक श्री. चव्हाण व संपादक प्रा. ठोके यशस्वी झालेले आहेत.

▲▲▲▲

# उगवतीचा क्रांतिसूर्य : नव्या निष्कर्षांचा वस्तुनिष्ठ आलेख

उगवतीचा क्रांतीसूर्य
प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर.
मूल्य रु. ५०



गतवर्ष आणि हे वर्ष डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी म्हणून साजरे होत आहे. आणि या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांवर भरपूर पुस्तके लिहिली गेलीत. त्यात परिचयात्मक आणि चरित्रात्मक पुस्तके अधिक. परंतु आंबेडकरी विचार खऱ्या अर्थाने जनमानसापर्यंत पोहचविण्याचे काम करणारी पुस्तके कमीच आहेत. अगदी बोटावर मोजता येतील इतक्याच लेखकांच्या पुस्तकांचा उल्लेख करता येतो. यात डॉ. श्रीपाल सबनीसांचे 'उगवतीचा क्रांतीसूर्य' हे पुस्तक या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण आहे. आपल्या ग्रंथाच्या भूमिकेबद्दल लिहितांना डॉ. सबनीस म्हणतात की, ''सर्व काळातील दलित शोषित गुलामांच्या मुक्तीचा समर्थ प्रतिनिधी म्हणून मला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल नेहमीच आदर वाटत आला आहे. महापुरुषांना वंदनीय ठरवून अनुकरण टाळण्याचा प्रसंग

त्यांच्या नावाचा सौदाही करण्याचा अलिकडे प्रयत्न होतोय ही अत्यंत गंभीर व घातक बाब आहे.'' या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांचा विचार सर्वदूर पोहचवून परिवर्तनवादी चळवळीचे सामर्थ्य वाढविणे हे अनुयायांचे, नेत्यांचे, विचावंतांचे सर्वांचे कर्तव्य ठरते, ही भूमिका डोळ्यासमोर ठेवून त्यांनी मानवी वेदनेचे आव्हान पेलणाऱ्या महापुरुषांच्या जीवनात आणि त्यांच्या विश्वकल्याणाच्या प्रेरणेत आपल्या आविष्काराचे सिध्दांत अत्यंत डोळसपणे मांडले आहेत.

२० व्या शतकातील राजकीय आणि सामाजिक आंदोलनांच्या प्रवाहामध्ये विलक्षण सुसंगती आणि विरोध असणारी वास्तवता आहे. त्यामुळे या शतकातील राजकीय स्वातंत्र्य लढ्याचे आणि समता आंदोलनाचे मूल्यमापन करतांना फार मोठ्या विद्वानांच्या तेवढ्याच मोठ्या मुका झालेल्या दिसतात. या शतकातील भारताचा इतिहास तुकड्या तुकड्याने अनेकांनी लिहिलेला आहे. ठळक ऐतिहासिक घटनांचे विश्लेषण करण्याचेही प्रयत्न झाले आहेत, परंतु वास्तवातील अंतःप्रवाहाचा शोध घेऊन त्यांचा अनुबंध स्पष्ट करण्याचे काम अभ्यासकाकडून फारसे झालेले नाही. या पार्श्वभूमीवर डॉ. श्रीपाल सबनीसांचा 'उगवतीचा क्रांतीसूर्य' हा नवा वैचारिक ग्रंथ निश्चितच महत्वपूर्ण ठरेल असे वाटते.

पुस्तकाच्या शीर्षकावरून क्रांतीसूर्याची उगवती अर्थातच प्रातःकाळाचा सूर्य लेखकाला अभिप्रेत असावा. डॉ. आंबेडकरांच्या पूर्वार्धातील पर्वाचे हे अन्वर्थक नाव दिसते. पण खऱ्या अर्थाने या पुस्तकातील आशय समजून घेतला तर त्यात भारतीय समाजजीवनातील राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक ज्वलंत प्रश्नांचे विविध प्रवाहातील संघर्ष लेखकाने तर्कशुध्द पध्दतीने टिपले आहेत. मुख्य म्हणजे या प्रवाहांच्या मूल्यमापनात डॉ. सबनीस यांनी निर्भयताही दाखविली आहे. त्यामुळे ग्रंथाच्या प्रस्तावनेत नानासाहेब ना. ग. गोरे यांनी लेखकाच्या अभ्यासपूर्ण निर्भीडतेचे जे कौतुक केले आहे ते सार्थच म्हटले पाहिजे.

खरे म्हणजे हे पुस्तक केवळ आंबेडकर विषयक नाही. २० व्या शतकातील पूर्वार्धाचे समग्र चित्रच इथे साकारले आहे. या शतकातील महात्मा मोहनचंद करमचंद गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यातील मतभेदावर हजारो पाने आजवर लिहिली गेली. परंतु या दोन नेत्यांचे

कर्तृत्व एकमेकांना कसे पूरक ठरले याचा सुंदर आलेख लेखकाने काढलेला आहे आणि असे करतांना गांधी असोत की आंबेडकर असोत त्यांच्या तत्कालीन चुकांना धाडसाने पुराव्यासह मांडण्याचा सत्यशोधकी बाणा लेखकाने दाखविला आहे. हिंदू महासभा आणि आंबेडकरी चळवळ यांच्यामधील तत्कालीन विरोध का व कसा पेरला गेला? डॉ. आंबेडकर हेच उगवतीच्या काळी हिंदू पुर्नज्जीवनवादी कसे होते? नंतर त्यांनी धर्म का बदलला? धर्मांतराची जबाबदारी हिंदूची किती, आंबेडकरांची किती? या अशा अनेक प्रश्नाच्या उत्तराच्या दिशा या ग्रंथात स्पष्ट झाल्या आहेत. यावरून हिंदुत्ववाद्यांनी गेल्या वर्षी दाखविलेले आंबेडकर प्रेम किती खरे आणि किती खोटे आहे, तसेच भाजपाला आंबेडकर पचवता येईल काय आणि आंबेडकर पचलेच तर भाजपाचा हिंदू तत्वावर कसा आणि किती क्रांतीकारक परिणाम होईल या आजच्या अशा प्रश्नांची उत्तरे वाचकाला सापडू शकतात. हिंदू महासभा आणि आंबेडकर यांच्यातील संबंधावर अधिक तपशीलाने या ग्रंथात प्रतिपादन आलेले नाही मला ही उणीव वाटते.

कम्युनिस्टांची चळवळ आणि आंबेडकरी चळवळ यांच्यामधील सुप्त संघर्ष का निर्माण झाला. तो योग्य की अयोग्य या प्रश्नांची उत्तरे डॉ. सबनीस यांनी सडेतोड दिली असली तरी त्या उत्तरात मार्क्सवादाकडे त्यांचा झुकता कल दिसतो. मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद यांच्यामध्ये मूलभूत विसंगती आहे की नाही, हा आजही विवाद्य प्रश्न बनलेला आहे. डॉ. आंबेडकर हे मार्क्सच्या ध्येयवादाशी विरुध्द नव्हते पण त्याच्या पध्दतीशी विरोधी होते. तरीही त्यांनी मार्क्सला विरोध करायला नको होता. हा लेखकाचा निष्कर्ष निश्चितच चिंतनीय आहे. परंपरेने चालत आलेल्या आंबेडकरी चळवळीतील मार्क्सविरोध हा क्रांतीवादाशी विरोधी ठरणार आहे. हे डॉ. सबनीसांचे भान आज आणि उद्याच्या परिवर्तनवाद्यांना उपयोगाचे आहे.

या ग्रंथात ब्राम्हणेतर चळवळ आणि आंबेडकरी चळवळ यांच्या आपसातील संबंधावरही लेखकाने प्रकाश टाकलेला आहे. या प्रकरणात ब्राम्हणेतर चळवळींच्या सर्व अंतः प्रवाहाचे समग्र मूल्यमापन आलेले नाही. पण जेधे आणि जवळकर यांच्या नेतृत्वाच्या अनुषंगाने विवेचन आलेले

आहे. शाहू आणि आंबेडकर असा एक कोन इथे आवश्यक होता.

ग्रंथाच्या पहिल्या भागामध्ये अस्पृश्यता निवारणाचे सवर्ण आणि इतरांचे प्रयत्न कसे महत्वपूर्ण ठरले याचे विवेचन सविस्तर आलेले आहे. मुख्य म्हणजे प्रत्येकाच्या भूमिकेतील प्रामाणिकपणा आणि शक्ती यांचा परिणाम समतेचा प्रवाह समृध्द होण्यात कसा झाला यावर लेखकाचा भर आहे. सावरकर आणि आंबेडकर या संबंधानेही डॉ. सबनीस यांनी केलेले विवेचन तर्कशुध्द आहे. आंबेडकरांचा केंद्रबिंदू लक्षात घेऊन सर्व क्रांतीवादी आणि प्रतिगामी ठरविलेल्या परंपरेतील शक्तीस्थाने लेखकाने वस्तुनिष्ठपणे तपासले आहेत. आणि अशा तपासणीतूनच त्यांचे परखड निष्कर्ष स्वागतार्ह ठरतील यात शंका नाही.

कोल्हापूरच्या प्रचार प्रकाशनाने या विचार प्रदर्शक ग्रंथाची सिध्दता करून मोलाचे कार्य केले आहे. श्री. प्रसाद मराठे यांनी पुस्तकाला सुबक मुखपृष्ठ देऊन पुस्तकाची आशय संपन्नता कायम ठेवली आहे.

▲▲▲▲

# निष्काम व निर्भय समाजसेविकेची कैफियत

मिटलेली कवाडे
मुक्ता सर्वगोड
चेतश्री प्रकाशन, अमळनेर.
मूल्य रु. २०/-



अस्मितादर्शनाच्या एका अंकात दलित साहित्यविषयी मत मांडतांना श्री. ताराचंद्र खांडेकर लिहितात की, 'दलित साहित्य हे केवळ महार वा बौध्दांचे साहित्य नाही. दलितपणा विश्वात्मक प्रेरणा आहे. दलित साहित्याला आर्थिकच नव्हे तर सामाजिक अधिष्ठानही आहे. दलित साहित्य हे सामाजिक जाणिवेचाच प्रत्यय आणून देणारे साहित्य आहे.' याच सामाजिक जाणिवेतून लिहिले गेलेले मुक्ताबाई सर्वगोड यांचे 'मिटलेली कवाडे' हे आत्मकथन होय. या आत्मकथनाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक चळवळीत प्रत्यक्ष काम करतांना सर्व चांगले वाईट अनुभव त्यांनी अत्यंत ओघवत्या शैलीत आपल्यासमोर मांडले आहेत. मुक्ताबाई सर्वगोड ह्या दलित म्हणून जन्माला आल्या. परंतु संस्काराने त्या कधीही दलित नव्हत्या. विशेष म्हणजे त्यांनी आपली जातच

त्यागली आणि निष्काम समाजसेविकेचे व्रत पत्करले. त्यांच्याच शब्दात 'मला दलित लेखिका' म्हणू नये. मी जन्मले ते वातावरण दलित नव्हतं. कारण ते रेल्वेचं जग होतं. माझ्यावर दलित संस्कार झालेले नाहीत. मी दलित शब्दाचा उपयोग करून काही सौदे केलेले नाहीत. फक्त दलित समाजाची सेवा करणारी समाजसेविका आहे. वडिलांपासून जात्याच गरीबांकडे आपुलकीने बघण्याची दृष्टी माझ्याकडे आली. त्याचा तो परिपाक आहे. आपल्या या भावनेने त्यांनी अतिशय मोकळेपणाने समाजसेवाकार्यात आलेले अनुभव लिहिले आहेत.

अलीकडे समाजसेवेच्या नावाने विविध लोक विविध प्रकारचे भले-बरे उद्योग करीत असतात. काही वेळा तर समाजसेवा निव्वळ एक ढोंग म्हणूनही करणारे समाज सेवक आहेत. प्रसंगी समाजसेवकाच्या रुपात अशी खूपशी सोंगे आपल्याला पाहायला मिळतात. माणसाने माणसाकडे माणूस म्हणून पाहण्याऐवजी वरलिया सोंगा भुलावे हे अनिष्टच आहे. परंतु असं वागणं आपल्या अंगवळणी इतके पडले आहे की, भलीभली माणसेही त्या जाळ्यात गुरफटून जातात. मुक्ताबाई सर्वगोडांना हे सर्व, सर्व टाळायचे होते. म्हणून आपल्या समाजकार्याची भूमिका स्पष्ट करतांना त्या म्हणतात, 'मी समाजकार्य केलं ते पुढारीपण मिळविण्यासाठी किंवा प्रदर्शनासाठी केलं नाही. मला कुणाकडे जाऊन गप्पागोष्टी करणं, नटणं-मुरडणं याची आवड नव्हती. त्यामुळे मधला रिकामा वेळ आपण या गलिच्छ वस्तीत घालवू, त्यांना सरकारी योजना समजावून सांगू असं खूप वाटे. केवळ या सरकारी सवलतीचा प्रचार करण्याच्या जिवापाड ओढीमुळे या समाजसेवेत मी गुंतत गेले. मुक्ताबाईंना जे जे अन्यायकारक वाटले त्याचा त्यांनी कडाडून निषेध केला. जे जिव्हाळ्याचे आणि आत्मियतेचे प्रश्न होते त्याचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आणि हे करतांना त्यांच्या हे लक्षात आले की या गरीब-दलित जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी स्वीकारलेला समाजसेवेचा दृष्टीकोण चुकीचा आहे. तो त्यांना समजावून सांगणे महत्वाचे आहे. अशा तऱ्हेने विचार करणाऱ्या मुक्ताबाईंचे वैयक्तिक खाजगी जीवन कसे असेल यासंबंधी उत्सुकता निर्माण होते. परंतु मुक्ताबाईंना आपल्या लिखाणाबाबत असली जिज्ञासा निर्माण होणे इष्ट वाटत नव्हते. यदुनाथ थत्तेंना पाठविलेल्या पत्रात त्या आपली ही भूमिका

अधिक स्पष्टपणे मांडतात व म्हणतात की, 'मी दलितांचं जीवन, त्यांच्यात होणारी चुकीची समाजसेवा, हानीकारक दृष्टीकोण, खऱ्या गरजा आणि उणिवा याचं दर्शन घडविलंच आहे आणि त्यासाठी माझ्या आयुष्यात अनुभवलेले प्रसंग गोवले आहेत.' यातून समाजदर्शन घडावं हा माझा हेतू आहे. माझ्या आयुष्याचं दर्शन मांडण्याचा नाही. गलिच्छ वस्त्यांमध्ये आणि दलितांमध्ये चुकीचं समाजकार्य चालतं. कधी अज्ञान, कधी स्वार्थ ! तेव्हा या समाजसेवेतील उणिवा आणि गरजा व दलितांचं दयनीय जीवन वाचकांपुढे मांडणं हाच फक्त हेतू आहे. आपल्या या हेतूनं लिहिलेल्या या आत्मकथनात त्यांनी केलेल्या समाजकार्याचे अनेक दाखले मांडले आहेत. गांधी वधानंतर या देशामध्ये जे हत्याकांड झाले आणि ज्या पध्दतीची जाळपोळ झाली त्यात मोठमोठ्या मिलाही जाळल्या गेल्या. हजारो मजुरांची रोजी-रोटी हिरावली गेली. सांगली मिल जाळल्यानंतर त्यांनी असाच एक प्रश्न संबंधितांना विचारला, ''आज तुम्ही सांगलीची मील जाळली. धनी वेलणकरांची चूल लगेच बंद होणार आहे काय? पण त्या मीलमध्ये काम करणारे गोरगरीब कुठे जातील? त्यांना लगेच कुठे मिळेल रोजी? रात्री पोरं 'आई, भाकर' म्हणून रडतील, तेव्हा हे पेटवणारे धावणार आहेत का या सर्वांना तुकडा वाढायला? [पृ. ६४] आजही जेव्हा अन्याय आणि शोषणाच्या नावावर अशी जाळपोळ करवली जाते त्याही वेळी असा प्रश्न मनात निर्माण होतो. मुक्ताबाईचं चिंतन हे असं मानवतेला मानणारं आहे.

आज समाजातील गरीब शोषीतांची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली आहे. शासनाने केलेल्या, दिलेल्या सवलती त्यांच्या दृष्टीने पुरेश्या नाहीत. काही समाजधुरीणांचं मत आहे की हे सर्व सुधारायला काही काळ जावा लागेल. मुक्ताबाईंचा सात्विक क्रोध पराकोटीला पोचतो. त्या म्हणतात, या रामराज्यात लव-अंकुश गल्ली गल्लीतून गुंडगिरी करताहेत. दारुभट्या चालवताहेत. अन् या रामराज्यातील सीता? ती तळपता सूर्य डोक्यावर घेऊन, निर्वस्त्र होऊन सैरभैर धावत आहे. लाज राखायला, त्या मायबाप सरकारमागे, मृगजळासारख्या! आणि वर म्हणायचं 'हजारो वर्षापासून चालत आलं आहे, हे सुधारायला थोडा वेळ लागेल.' [पृ. ६८] अशा या समाजासाठी झटतांना मुक्ताबाईंना काही वाईट अनुभवही आले

आहेत. म्हणून त्यांची वेदना अधिक बोलकी होते आणि ज्या समाजासाठी एवढी खटपट मी करीत होते त्यालाही कुठे पर्वा होती? [पृ. १३०] परंतु त्या निराश न होता तन-मनाने आपले कार्य करीत राहिल्या. कारण त्यांच्यासमोर आदर्श होते. समाजाची मिटलेली कवाडं तोडण्याचा प्रयत्न करण्यात महात्मा फुले श्रमून गेले, महर्षि कर्वे थकून गेले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमर होऊन गेले आणि पूज्य बाबा आमटे? बाबा तर येशू ख्रिस्त म्हणून प्रकाशत आहेत!.... या सर्वांच्या प्रयत्नांना व मिटलेली कवाडं उघडण्यात यश येईल, येत आहे. [पृ. १६१] अशा या निरपेक्ष समाज सेविकेला बाबा आमटे यासारख्या समाज सेवकाचे दर्शन घडणे म्हणजे त्यांच्या समाजसेवी वृत्तीला मागासलेल्या व दलित समाजासाठी मिटलेल्या कवाडांना उघडण्याची प्रेरणा प्राप्त होण्यासारखेच होते. मुक्ताबाईंनी आपल्या या आत्मकथनात जीवनाचा व्यापक विस्तार कवेत घेण्याचा प्रयत्न केला आहे. समाजसेविका म्हणून त्यांनी या ठिकाणी नोंद करून वास्तवातलं समाजदर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. समाजसेविका म्हणून त्यांना आलेले कटू गोड अनुभवांची त्यांनी या ठिकाणी नोंद करून वास्तवातलं समाजदर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. आणि त्यांना त्यात अपेक्षित सफलता प्राप्त झाली आहे असे म्हणता येईल. कारण दलित सामाजिक जीवनाचे दर्शन घडवितांना, समाजसेवा करताना होणाऱ्या चुका, चुकीचे दृष्टीकोण, समाजसेवेच्या खऱ्या गरजा आणि उणिवा वाचकांसमोर मांडायचा त्यांचा हेतू आहे. आपल्या लेखनात लेखिकेने फक्त टीकेचाच सूर लावला नाही, तर समाजसेवेसाठी लागणारे पर्यायही सुचविले आहेत. परिवर्तनाच्या लढाईत असणाऱ्या समाजसेवकांना आत्मचिंतन करायला लावणारे हे पुस्तक आहे.

▲▲▲▲

# युगपुरुषाचे विविधांगी मूल्यांकन

निबंध ३५६६
२७७०६
८५८०३

गांधी दर्शन
प. रा. रा. दामले
शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे.
मूल्य रु. २०/–



देशाच्या स्वातंत्र्यासाठी, समाज मुक्तीच्या लढ्यासाठी आणि मानवाच्या कल्याणासाठी ज्यांनी ज्यांनी आपले आयुष्य समर्पित केले त्या सर्वांना काळाच्या प्रवाहात विसरणे कोणालाही शक्य नाही. ते सर्व महापुरुष होत व आपल्याला वंदनीयही आहेत. परंतु महापुरुषांना वंदनीय ठरवून अनुकरण टाळण्याच्या प्रसंगी त्यांच्या नावाचा सौदाही करण्याचा अलिकडे प्रयत्न होतोय ही अत्यंत गंभीर व घातक बाब आहे. महापुरुषांचा विचार तळागाळातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवून सुदृढ व सशक्त समाज व देश बनविण्याच्या दृष्टीने विचार झाला पाहिजे. संपूर्ण मानवी समाजाच्याच कल्याणाचा गहिवर ज्या महापुरुषांनी त्यांच्या कृतीतून व विचारातून सिध्द केला त्या सर्वात विश्वकल्याणाच्या प्रेरणेचे भिन्न भिन्न अविष्कार असतात व दिसतात. मानवतेच्या या

कैवाऱ्यांचे राष्ट्राच्या समाज जीवनामध्ये अत्यंत महत्वपूर्ण स्थान असते. परंतु जेव्हा काही थोर पत्रकार, समीक्षक, लेखक त्यांच्या जीवनातील अवास्तवावर महत्व देऊन आपल्यासमोर मांडतात तेव्हा संभमाच्या अवस्थेत सर्वसामान्य असतो. नेमका ज्याच्या जीवन विचारांचा आदर्श राष्ट्राने घेतला आहे त्याच्या वैयक्तिक जीवनातील सदर प्रसंगातील संभम वाढवत नेऊन एक वेगळ्याच प्रकारची कटुता मनुष्याच्या मनात निर्माण होते. हा असा संभ्रम राष्ट्रांच्या दृष्टीने विघातक असून राष्ट्रीय ऐक्याला, अखंडतेला सर्वात मोठा धोका आहे. म्हणून महापुरुषांवर लिहितांना राष्ट्राचा विचार अधिक व्हायला हवा.

राष्ट्रपिता म. गांधी हे युग पुरुष होते. जगातील गेल्या दोनशे वर्षांच्या कालखंडात अनेक लहान मोठी राष्ट्रे मुक्त झालीत. हे सर्व लढे साम्राज्यशाही विरुध्द होते. या साम्राज्यशाहीच्या पराभवास कारण झालेल्या ऐतिहासिक शक्तींचा भव्य प्रतिके म्हणून अनेक शूर, विचारी व मुत्सद्दी नेते या कालखंडात होऊन गेले. त्या सर्वांच्यामध्ये महात्मा गांधींचे स्थान अद्वितीय आहे. कारण म. गांधींनी लढ्यासाठी जी रणनीती शोधून काढली ती सर्वांना अज्ञात व आश्चर्यकारक होती. ती म्हणजे सत्याग्रह. जागतिक पातळीवर जेव्हा हा लढा या अशा प्रकारच्या आंदोलनाने सुरु झाला तेव्हाच सर्वांचे लक्ष वेधले गेले. म्हणून गांधींसारख्या महापुरुषांच्या वैयक्तिक जीवनातील मर्यादाना ओलांडून त्यांनी सुरू केलेल्या राष्ट्रांच्या जीवन-मरणाच्या झगड्याचा विचार प्रामुख्याने झाला पाहिजे. कारण त्यांच्या जीवनातील अंतिम नैतिक मूल्य हे श्रेष्ठ होते. व्यक्तीच्या जीवनातील अंतिम नैतिक मूल्ये जर विसरली गेली तर मानव समाजाचा ऐतिहासिक विकासच त्यामुळे कुंठित होईल. हे म. गांधी सारख्या युगपुरुषांच्या रणनीतीने सिध्द केले आहे. त्यांच्या ह्या लोकोत्तर कार्यापुढे ह्या सर्व वैयक्तिक मर्यादा अगदी थिट्या पडतात.

श्री. प्र. रा. दामले यांच्या 'गांधी दर्शन' या पुस्तकात या युगपुरुषाच्या कर्तुत्वाची गंभीर मीमांसा भिन्न भिन्न संदर्भात आणि भिन्न भिन्न कालखंडातील प्रसंगाच्या संदर्भात अनेक बाजूंनी केला आहे. स्वातंत्र्य मिळालेल्या भारताच्या निवडणूकरुपी वजनकाट्यात गांधीरुपी वजनाने अनेकवेळा पारडी वजनदार झालेली आपल्याला माहिती आहेत. या देशात

पक्षीय अंध राजकारण अधिक प्रभावी बनत चालले आहे. नागरिकांच्या समानतेवर आणि बंधुभावावर मात करणारा पक्षीय सत्तेच्या राजकारणाचा अंमल होऊ लागला आहे. नीतिमूल्यांची कदर न करण्यात पुरुषार्थ मानणारा, सताधाऱ्यांचा आणि सत्ताभिलाष्यांचा विविध राजकीय पक्षांच्या स्वरुपात उदय झालेला आहे. या संपूर्ण पार्श्वभूमीवर हे पुस्तक अतिशय महत्वाचे आहे. यातील वैचारिक वातावरण आपल्याला एक वेगळ्याच समाजस्थितीची जाणीव करून देण्याच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे.

गांधीजींच्या व्यक्ती आणि कार्याचा आदरयुक्त उल्लेख करतांना लेखक म्हणतो की ते युगपुरुष आहेत. जसजसा जीवनातील गौण भाग विसरले जातील तसतसे त्यांचे माहात्म्य उठावदार होईल. त्यांनी हिंदुस्थानाची केलेली सेवा मोठी असली तरी इतिहासातील त्यांचे स्थान त्या सेवेपेक्षा त्यांच्या नैतिक, सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक कामगिरीवरून ठरेल. गांधीजी मोठे असले तरी मानवच होते व आमच्यातलेच होते. म्हणून त्यांच्या कार्यात अनेक दोष आले. या सामान्यत्वाकडे न बघता डोळसपणे त्यांच्या कार्याकडे बघितले पाहिजे. एवढेच नाही तर गांधीचे कार्य पुढे चालवायचे तर प्रतिकाराची व त्यातून उद्‌भवणाऱ्या हालांची तयारी पाहिजे. गांधी सौम्य होते. पण मवाळ नव्हते. निष्क्रिय नव्हते. जन्मभर ते लढत राहिले. आफ्रिकेत काय किंवा हिंदुस्थानात काय त्यांचे प्रतिस्पर्धी फार प्रबळ होते म्हणून ते कधी निराश झाले नाहीत. आजचे गांधीवादीच जर असे म्हणू लागले की सरकारी यंत्रणा आम्हाला पायाखाली तुडविते किंवा जनतेचे पाठबळ नाही तर तो गांधीवादाचा गांधी विचाराचा सरळ सरळ पराभव आहे.

गांधीजींनी व्यक्ती म्हणून जे गुण अंगी बाणविले होते ते अतिशय महत्वाचे आहेत. उत्कट प्रामाणिकपणा, साधेपणा, आत्मविश्वास, सतत उद्योग, व्यवहारी दृष्टी, हिशोबीपणा, सौजन्य, चिकाटी, स्नेहभाव, संयम असे हे साधे परंतु अमोल गुण आहेत. गांधींनी यांच्या साह्याने अलौकिक कामगिरी केली. इतिहासात अढळ स्थान मिळविले. गीतेत म्हटल्याप्रमाणे 'स्वल्पमप्यस्य धर्मस्य जायते महतो भयात' असे हे गुण आहेत. त्यांचे आचरण कोणी जितके करील तितक्या प्रमाणात त्यांचे जीवन समृध्द, समाधानी, परोपकारी होईल यात संशय नाही. गांधींची तत्वे, त्यांचे

सार्वजनिक कार्यातील मार्ग पसंत नाहीत अशा अनेक हिंदी व अहिंदी व्यक्तींकडून प्रसंगी गांधी कामे करून घेत.

गांधींची ईश्वरनिष्ठाही अशाच प्रकारे वेगळी होती. ईश्वरनिष्ठा मुख्यतः इतर माणसांच्या उपयोगी पडण्यात, त्यांचे दुःख घालविण्यात, त्यांचेवर होणारा अन्याय दूर करण्यात दिसून येते. मनुष्य धर्मनिष्ठा आहे, ईश्वरनिष्ठा आहे. परंतु तो सामाजिक अन्याय किंवा दलितांचे दुःख निवारण करण्याकरिता काही करत नाही असे होऊ शकत नाही गांधीच्या मते खरी ईश्वर, सत्य व प्रेम ते एकच मानीत ईश्वराचे अस्तित्व वैयक्तिक स्वरूपाचे नसून ईश्वर 'विश्वाचा मूलभूत नियम आहे' असे ते म्हणत. वैज्ञानिक दृष्ट्या ईश्वराचे अस्तित्व सिध्द करता येईल काय या बद्दल साशंक होते परंतु पुढे पुढे त्यांची भूमिका बदलत गेली व ते 'ईश्वर म्हणजेच सत्य' या ऐवजी 'सत्य म्हणजेच ईश्वर' ही भूमिका मांडू लागले.

गांधीजींना बुध्दिवाद्यांचा पूर्ण पाठिंबा कधी मिळालाच नाही. कारण आपली भूमिका बुध्दिवाद्यांना पटवून देण्यास त्याना पूर्णपणे यश आले नाही. गांधी परंपरागत हिंदु धर्मातील उणीव मान्य करीत. पण तरीही माझा धर्म हिंदु व गीता हेच माझे मोक्षसाधन आहे असेही म्हणत. ही भूमिका बुध्दिवाद्यांची नसून अंतःकरणाचे प्रामाण्य मानणाऱ्याची आहे. माणसे न समजता रॅशनल असत नाहीत. जगात चांगली माणसे नक्की आहेत. शहाणी आहेत की नाहीत कुणास ठाऊक? जर गांधींचा बुध्दीवर विश्वास असता तर त्यांनी सर्वांसाठी सर्वसामान्य धर्माचे प्रतिपादन केले असते असेही काहींना वाटते. परंतु माझी आई, माझी मुले ही जशी व ज्या अर्थी माझी, त्या अर्थी 'माझा धर्म माझा' असे गांधी म्हणत म्हणूनच इतर धर्मही मला तितकेच पूज्य आहेत. ही व्यापक भूमिका घेऊन त्यांनी रोजच्या प्रार्थनेत सर्व धर्मीयांचे वेचे घेतले होते.

खरं म्हणजे गांधींची देशभक्ती ही त्यांच्या मानवतेवर अधिष्ठित होती. मनुष्य हा सगळीकडे सारखाच असतो व मूलतः तो सत्प्रवृत्त आहे असा त्यांचा विश्वास होता. आफ्रिकेत हिंदी नागरिकांवर होणारा जुलूम त्यांनी प्रत्यक्ष पाहिला व त्याचा प्रतिकार केलाच पाहिजे असे ठरविले. पण त्याच वेळी त्यांनी असाही निश्चय केला की, ब्रिटिश लोक हे मूलतः दुष्ट व राक्षसी प्रवृत्तीचे नाहीत व त्यांच्या सदसद्विवेक बुध्दीला चिकाटीने आवाहन

केले तर ते निष्फळ ठरणार नाही. ही लेखकाची दृष्टी गांधीकडे वेगळ्या दृष्टीने पाहायला शिकवते. या व अशा अनेक पैलूतून सामांन्याकडून असामान्याकडे प्रवास करणारे युगपुरुष गांधींची एक वेगळी प्रतिमा आपल्या समोर साकारण्यातच या पुस्तकाचे यश सामावलेले आहे.

▲▲▲▲

# राजर्षीच्या युगप्रवर्तक व उत्तुंग कार्याकडे टाकलेला दृष्टिक्षेप

राजर्षी शाहू : एक दृष्टीक्षेप
प्रा. डॉ. जयसिंगराव पवार
मंजुश्री प्रकाशन, कोल्हापूर.
मूल्य रु. २५/-

भारतीय समाज हा प्राचीन काळापासून रूढी, परंपरा, वर्णव्यवस्था यामुळे पोखरला गेला असून विविध प्रकारची सामाजिक विषमता त्यामुळे निर्माण झाली. वर्णव्यवस्थेमुळे तर समाजातील मनुष्याचा एक गट इतका उपेक्षित राहिला की त्याला आपण जीवन नेमके कसे जगावे हा प्रश्न पडलेला असायचा. शिक्षण, नोकरी, अधिकारी या साऱ्या गोष्टींपासून वंचित राहीला. या देशात मोगलांच्या आक्रमणानंतर धर्मासबंधी जो प्रश्न निर्माण झाला आणि धर्मांधतेने मानवाचा जो संहार सुरू झाला त्यातून नेमका धर्म कोणता हा प्रश्न येथल्या लोकांमध्ये सुरू झाला. मध्ययुगातील हिंदू आणि सुफी संतानी 'मानवता हाच खरा धर्म' असे पतिप्रादन केले. त्यातून तत्कालीन रूढी-परंपरा, वर्णव्यवस्थेच्या जोखडात अडकलेल्या



अडकलेल्या मानवाच्या मुक्तीचा पयत्न सुरू झाला. वर्णव्यवस्था जर काढून टाकली तर सामाजिक समता निर्माण होईल असा पयत्न सुरू झाला. आधुनिक काळात महाराष्ट्रात म. फुले, गोखले, रानडे, आगरकर लोकहितवादी डॉ. आंबेडकर यांनी ही विषमता निपटून काढण्यासाठी विविध पकारची सामाजिक आंदोलने उभारली.

या सर्व समाज सुधारकांपमाणे राजर्षी शाहू महाराज हे एक असेच थोर राष्ट्रपरुष होते. म. फुल्यांनी सुरू केलेल्या सामाजिक विषमतेच्या चळवळीने महाराज खूपच पभावित होते. आयुष्यभर त्यांनी समाजातील ही विषमता दूर करण्यासाठी खूप पयत्न केलेत. डॉ. जयसिंगराव पवार यांचे 'राजर्षी शाहू : एक दृष्टीक्षेप' हे पुस्तक म्हणजे त्यांच्या उत्तुंग आणि युगप्रवर्तक कार्याकडे टाकलेला एक दृष्टीक्षेप आहे. मराठवाडा विद्यापीठामध्ये राजर्षी शाहू व्याख्यानमालेची तीन पुष्पे गुंफण्याचा मान डॉ. पवार यांना मिळाला होता. त्यावेळी त्यांनी जे विचार मांडलेत ते सर्व या पुस्तकात संगहित करण्यात आले आहेत. व्याख्यानाच्या निमित्ताने का होईना परंतु राजर्षीसंबंधी असलेले विचार हे अत्यंत वस्तुनिष्ठ आणि त्यांचे उचित असे मूल्यमापन करणारे आहेत. यात डॉ. पवारांनी 'राजर्षीचे वेदोक्त पकरण : एक सामाजिक संगर','राजर्षी शाहू-एक समाज कांतीकारक' अशा तीन वेगवेगळ्या दृष्टीकोनातून विचार केला आहे. जो अतिशय समर्पक आणि शाहू महाराजांच्या जीवनकार्याला न्याय देणारा आहे.

राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनात वेदोक्त पकरणाचे अतिशय महत्व आहे कारण या एका घटनेने मराठ्यांच्या गादीवरून हा राजा बघता बघता समाजकांतिकारक बनला. वेदोक्ताचा चटका बसेपर्यंत शाहू महाराज पुराणमताभिमानी होते. अस्पृश्य वर्गाकडे समतेच्या दृष्टीने पहातांना त्यांचेही मन इतर उच्चवर्णीयांपमाणे मागेपुढे पाहायचे. परंतु पंचगंगा नदीवरील पयाग क्षेत्री तीर्थस्थानास गेलेल्या महाराजांना ज्यावेळी त्यांच्या बरोबर असलेला भटजी वैदिक मंत्रा ऐवजी पुराणोक्त मंत्र सांगतो आहे हे कळल्यावर विचारणा केल्यानंतर मिळालेले उत्तर महाराजांना पुढील आयुष्यात समाज कांतिकारक बनवून गेले. भटजी म्हणाला होता– "शुदाला पुराणोक्त मंत्र सांगावे लागतात. वैदिक मंत्र म्हणजे वेळीच स्नानाची आवश्यकता असते. परंतु शुदांना पुराणोक्त पध्दतीचा अनुग्रह

करावयाचा असल्याने मला स्नान करण्याची आवश्यकता नाही.'' इतकेच नाही तर पुढे तो म्हणतो की, ''जोपर्यंत सर्वशक्तीमान बाम्हण, तुम्ही क्षत्रिय आहात असे जाहीर करीत नाहीत तो पर्यंत तुमची किंमत शुदापेक्षा अधिक आहे असे मी मान्य करणार नाही.'' आणि येथूनच बाम्हणेतरांना वेदोक्ताचा अधिकार का नसावा? या प्रश्नावर जो संघर्ष करीत राहिले तो शोषित जनांच्या दृष्टीने अतिशय भाग्याचा ठरला. छत्रपती शाहू महाराजांचा वेदोक्ताचा अधिकार म्हणजे एका राजाचा हट्टवाद नव्हता, तो एक सामाजिक न्यायासाठी दिलेला लढा होता. आपण सर्व आर्य संस्कृतीचे घटक आहोत, तिचा वारसाही सर्वांना सारखाच मिळाला पाहिजे, असा त्यांचा आगह होता. पण धार्मिक हक्क जेव्हा नाकारले जातात तेव्हा त्यास सामाजिक हक्काचे स्वरूप पाप्त होते. शाहू छत्रपतींचा संघर्ष अशा सामाजिक हक्कांसाठी होता. वैदिकमंत्र म्हटल्याने मराठे हे मराठेच रहाणार आहेत हा लो. टिळकांचा युक्तीवाद त्यांना मान्य होता. पण त्यांचे म्हणणे एवढेच की, हिंदू संस्कृतीचा बाम्हणांबरोबरीचा घटक म्हणून मराठ्यांसही [क्षत्रियांस] वेदांचा हक्क मिळाला पाहिजे. येथे जात बदलण्याचा प्रश्नच नव्हता. येथे बाम्हणेतर वर्गाकडे बघण्याची दृष्टी बदलण्याचा प्रश्न होता. पुढे जाऊन तर राजर्षींनी क्षात्र जगद्‌गुरूंची निर्मिती केली. धर्माच्या क्षेत्रातील भोंदूपणा व दलाली नष्ट करण्याच्या दृष्टीने छत्रपतींनी टाकलेले अभिनव पाऊल होते. छत्रपतींचा जगद्‌गुरू हा देव माणूस यांच्यामधील मध्यस्थ नव्हता, अथवा दलालांचा पुढारीही नव्हता. शाहू महाराजांनी क्षात्र जगद्‌गुरूंना लिहिले आहे की, ''.... आपण आपल्या कामास जलदीने सुरूवात करा. परमेश्वर आणि मनुष्य यांच्यामधील सर्व दलाल नाहीसे करणे हे आपले ध्येय असले पाहिजे. इतर स्वामीपमाणें आपण वागू नका. देशसेवा व जनसेवा हेच आपल्या जीविताचे मुख्य कार्य असले पाहिजे.'' शाहू महाराजांनी निर्माण केलेली ही नवी वाट त्यांच्या कार्याला आणि काळाला साजेशी होती.

ब्राम्हणेतर चळवळीत मुख्यतः मराठ्यांचा सहभाग अधिक होता. हा सहभाग आणि संघर्ष ब्राम्हणांनी मराठ्यांचे क्षत्रियत्व नाकारल्याने ते क्षत्रियत्व सिध्द करण्यासाठी होता, ब्राम्हणेतर म्हणजे केवळ मराठा समाज नव्हता. त्यात मोठ्या संख्येने अस्पृश्य अथवा दलित समाज मोडत होता.

दलित हा समाज शतकानुशतके गुलामीत थिजून गेला होता. या दलितांच्या मुक्तीसाठी शाहू महाराजांनी जो संघर्ष केला तो केवळ बाम्हणांशीच नव्हता तर तो त्यांना स्वज्ञाती बांधवाशीही करावा लागला होता. दलितोध्दारासाठी सर्वात पहिले पाऊल महाराजांनी उचलले ते म्हणजे आपल्या संस्थानातील सर्व खात्यातील नोकरीच्या जागांपैकी पन्नास टक्के जागा मागासलेल्या वर्गासाठी राखीव केल्या. त्यानंतर त्यांनी अस्पृश्यांसाठी आपल्या संस्थानाच्या शाळेमध्ये शिक्षण मोफत केले. वसतिगृहे काढली. तसेच त्यांच्यासाठी जाचक ठरणारी बैते-बलुते पध्दत बंद केली. विशेष म्हणजे १८ सप्टेंबर १९१८ ला महार वतन खालसा केले. हे चाकरी वतन असूनही त्यांनी त्या जमिनी त्यांच्याकडे राहू दिल्या. आता महार केवळ महार राहिले नव्हते तर ते सरकारी पगारी नोकर होते. यावेळी त्यांच्या खजिन्यावर अतिशय ताण पडला तरी राजर्षीचं मत होतं की, माझा खजिना या बाबतीत रिता झाला तरी त्याची मला पर्वा नाही. पण माणसाला माणुसकीपासून वंचित करणारी ही रूढी मला मोडायची आहे. अस्पृश्यांच्या गळ्यात गुलामगिरीच्या ज्या असंख्य शृंखला अडकलेल्या होत्या. त्यापैकी हजेरीची सक्ती ही एक होती. शाहूनी अस्पृश्यता हजेरी माफ केली. एवढंच नाही तर त्यांना सभ्य गृहस्थापमाणे वागविले जावे यासाठी कायदेही केले. कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी त्यांचा विटाळ न मानण्याची सक्त ताकीदही केली. त्यांना बढतीचा पहिला चान्स दिला. एवढंच नव्हे तर कुलकर्णी वतने खालसा करून अस्पृश्यांना तलाठी आणि वकील सुध्दा बनविले. अस्पृश्यांना वकीलांची सनद देण्यामागे त्यांचा हेतू हाच होता की, जे धंदे अस्पृश्य वर्गास रूढीने, कायद्याने अगर दडपशाहीने बंद झालेले आहेत ते त्यास मोकळे करून द्यावे, त्यांची स्थिती सुधारुन त्यांच्यात आपण इतर माणसांच्या बरोबरीचे आहोत असा आत्मविश्वास उत्पन्न करावा. ते स्वतः राजे होते, सर्व जनतेचे पालक होते. ज्याप्रमाणे पालक लहान मुलाचे बोट धरुन चालणे शिकवितो त्याचप्रमाणे अस्पृश्यांची अवस्था आहे. अस्पृश्यांना चिखलातून बाहेर काढणे यालाच ते त्यांचे जीवितकार्य मानीत. अस्पृश्योव्दाराच्या त्यांच्या या कार्याला सवर्णांकडून खूप विरोध होत राहिला. इतकेच नव्हे तर शाहू महाराज 'धेंडोका राजा' असा अप्रचारही केला गेला. परंतु स्वतः महाराजांनी मात्र तो आपला

गौरवच मानला. खऱ्या अर्थाने ते दलितोध्दारक होते. नव्हे 'दलितांचे राजे' होते.

एक समाज क्रांतिकारक म्हणूनही राजर्षी शाहू महाराजांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. अज्ञानी आणि शोषित समाजाला जर माणूस म्हणून जगण्याची संधी द्यावयाची असेल तर ती शिक्षणानेच दिली जाऊ शकते. समाजक्रांतीचे तत्व सांगणाऱ्या ज्योतिबाप्रमाणे त्यांनाही वाटे की शिक्षणाशिवाय मती नाही, शिक्षणाशिवाय गती नाही. ते म्हणत की, "शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही. असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणून सक्तीच्या मोफत शिक्षणाची, हिंदुस्थानला आवश्यकता आहे" म्हणून त्यांनी २८ जून १९१३ मध्ये हूकूम काढला. की, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार बहुजन समाजात झपाट्याने होण्यासाठी प्रत्येक गावी प्राथमिक शाळा काढली जाईल. १९१७ ला त्यांनी आपल्या राज्यात सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा जारी केला. देवस्थानच्या इमारती सार्वजनिक ठरवून त्यांचा उपयोग शाळेसाठी करावा असाही हुकूम काढला. कोल्हापूरात त्यांनी १९०१ ते १९२१ पर्यंत एकूण बावीस वसतिगृहे स्थापन केली. जातिभेदासंबंधी त्यांचे परखड मत होते. "जातिभेद असू द्या, पण जातिव्देष नको" असे म्हणणारे पुष्कळ आहेत. हे मत प्रामाणिकपणाचे असल्यास त्यांच्या अज्ञानाची कीव केली पाहिजे. कारण जातिभेदाचे कार्य जातीव्देष हेच आहे. तेव्हा कार्य नाहीसे करण्याचे कारणही काढून टाकले पाहिजे. अशा एक ना अनेक सुधारणांचा पाठपुरावा राजर्षी शाहू महाराजांनी केला. परंतु प्रस्तुत पुस्तकांत डॉ. जयसिंगराव पवारांनी आपल्या दृष्टीक्षेपात मांडलेल्या राजर्षीच्या युगपवर्तक कार्याचा आढावा उपेयुक्त ठरेल यात शंका नाही.

▲▲▲▲

# मानव मुक्तीच्या अस्मितेचे हुंकार

नामांतर कविता
संपा. दामोदर मोरे
पंचशील प्रकाशन, ठाणे
मूल्य रु. ३०/-



"राख सांभाळून ठेवा
राख झालेल्या घराची..........
संपली नाही लढाई
यार हो नामांतराची !"

२७ जुलै १९७८ रोजी मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचा ठराव विधानसभेत संमत करण्यात आला आणि लगेचच मराठवाड्यात भीषण दंगल सुरू झाली. शेकडो निरपराध दलितांच्या घरांची राख रांगोळी करण्यात आली. खरं म्हणजे डॉ. आंबेडकरांनी महात्मा ज्योतिबा फुल्यांनी जी शिक्षणाची महती सांगितली होती ती लक्षात घेऊन मराठवाडा विभागात अविद्येचा अंधकार दूर करण्यासाठी विद्येचं जाळ निर्माण केलं होतं. त्याचाच परिणाम म्हणून मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. त्यांच्या विचारांच्या स्फुलींगातून प्रेरणा घेऊन मोठे झालेले त्यांचे पाईक ह्या विद्यापीठाचे नाव 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ'

करा अशी मागणी करू लागले. ती रास्तच होती. परंतु माणसा माणसातील संकुचित वृत्ती पुन्हा उफाळून आली आणि सवर्ण व दलित असा लढा जोमाने सुरू झाला. शासन दरबारी मान्यता मिळूनही अजूनही विद्यापीठाचे नामांतर झालेले नाही. म्हणून कविवर्य सुरेश भटांनी दिलेला संदेश आपल्याला विसरता येणार नाही.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा लढा हा या पुढे इतिहासातील सुवर्णाक्षराच्या रूपानेच ओळखला जाणार आहे. कारण या लढ्याच्या वेळी महाराष्ट्रातील सर्व सामान्यांपासून तर प्रतिभावंत कवींनी आपल्या शब्द शस्त्रांच्या आधाराने रणधुमाळी वाढवली होती. या सर्व कविता म्हणजे मराठी सारस्वतेच्या दरबारी नेहमी अक्षय लेणी म्हणूनच वाचल्या जाणार आहेत. या सर्व अक्षर अक्षय लेण्यांना संपादित करण्याचे परिश्रम आंबेडकरवादी चळवळींचे पाईक आमचे मित्र प्राध्यापक श्री. दामोदर मोरे यांना जाते. अत्यंत परिश्रम घेऊन त्यांनी या सर्व कविता संग्रहित केल्या आहेत. एवढंच नव्हे तर या सर्व कविताचं वाङ्.मयीन दृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या काय स्थान आहे याचा अतिशय सुंदर आढावा घेतला आहे. 'नामांतर कविते'चे महत्व विशद करतांना ते म्हणतात, ''नामांतर कविता'' हा उध्वस्त झालेल्या अस्वस्थ घरांचा व्याकुळ करणारा हुंकार आहे. नामांतर लढ्यात जळालेल्या, जाळलेल्या काळजाची ती ठणक आहे. जेव्हा जेव्हा समाजात जातीयतेचा वणवा पेटतो आणि दलितांना जिवंत जाळलं जातं तेव्हा त्या भीषण घटना दलित कवीच्या काळजाला डंख करतात आणि त्या काळजातून शब्दांचा वणवा भडकतो. हे ज्वालाग्राही शब्द जातीयवाद्यांना जाळणारे असतात. सनातन्यांना सोलणारे असतात. फॅसिस्ट प्रवृत्तीचे वर्तन करणाऱ्यांना फटके देणारे असतात..... 'नामांतर कविते'तील जाणिवा म्हणजे नामांतर दंगलीत जळल्या गेलेल्या झोपड्यांच्या राखेतील धगधगते निखारे आहेत. नामांतर कविता ही नामांतर लढ्यात सांडलेल्या रक्त आणि अश्रूंची हाक आहे.

'नामांतर कविता' या संग्रहात एकूण ६५ कविता संग्रहित करण्यात आल्या आहेत. कविवर्य कुसुमाग्रजांपासून ते विश्वेन्दू जयभीम सारख्या युवा कवींच्या कविता या संग्रहात आहेत. या कविता वाचल्यानंतर त्यांची परिणामकारकता आणि धारदारपणा लक्षात येतो. आपल्या वर्णव्यवस्थेने

दलितांना शिक्षणापासून पध्दतशीरपणे दूर ठेवण्यात आले. ज्ञानापासून दूर ठेवल्यामुळे अविद्या आणि अज्ञानाच्या अंधकारात हजारो वर्ष हा समाज गटांगळ्या खात राहिला. परंतु प्रज्ञासूर्य बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजाला शब्दशस्त्राची जाणीव करून दिली आणि बघता बघता ही सर्व स्वयंतेजाने उजळून निघाली. संत तुकाराम महाराजांनी सांगून ठेवले आहे.

**''आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने**
**शब्दांचीच शस्त्रे, यत्ने करु''**

शब्द शस्त्र ठरु शकतात याची जाणीव सर्वप्रथम महात्मा फुल्यांना झाली. त्याचा प्रत्यय डॉ. आंबेडकरांना आला आणि त्याची प्रचिती म्हणजे 'दलित कविता' होय. 'नामांतर कविता' म्हणजे शब्दांचीच शस्त्रे झाल्याचा प्रत्यय येतो. प्रा. दामोदर मोरे लिहितात की, 'नामांतर कविता' वाचायला लागल्यानंतर या कवींच्या कवितेतील शब्दांचा धारदारपणा किती परिणामकारक आहे याची जाणीव होते. शब्दांना अनेक अर्थछटा असतात, अनेक रंगछटा असतात. शब्दात तलवारीचं तेजही असतं आणि तिचा धारदारपणाही असतो. म्हणजे शब्द संगीनही असतात आणि ते संगीतही बनतात. शब्द सोबतीही असतात, शब्दांची सोबत ही शस्त्रांची सोबत असते. शब्द जेव्हा उपरोधाचं शस्त्र बनून कवितेत येतात तेव्हा कवितेची उंची वाढत जाते. अशा विविधांगी कवितेचं वेगळेपण संपादकांनी घडविलेले दिसते. नामांतर कवितेत असलेलं रसदर्शनही अतिशय वेधक आहे. संपादकाने सर्व रसांची यथासांग परिणामकारकताही समजाविली आहे. सर्व कवितांप्रमाणे नामांतर कवितेतही शृंगार रस आहे. कारण या लढ्यातील कवी हे युवा होते म्हणून शृंगार रसाबरोबर वीररसाचं अधिष्ठानही आहे. या लढ्यातील युवा कवींच्या तारुण्य सुलभ भावना असल्या तरी हा कवि आपल्या वैयक्तिक अभिलाषेच्या तृप्तीपेक्षाही नामांतराचा लढा महत्वाचा मानतो. मोरेश्वर पेन्दाम सारखा कवी चांदण्यारात्री प्रेयसीशी गप्पा करताना आपले पुरुषत्व फुलणार नाही आणि गावकुसाबाहेरील मातेच्या अपमानाचा बदलाही घेता येणार नाही म्हणून तो कठोरपणे प्रेयसीला म्हणतो,

**''कदाचित**
**प्रस्थापितांच्या लढ्यात**

**मी शिकार झालो तरी**
**सौभाग्य हरवले म्हणून संबोधू नकोस**
**कारण –**
**ह्या मुक्तीच्या लढ्याच्या**
**इतिहासाच्या पानापानावर**
**पुनः मी क्रांतिसूर्य होऊन भेटेन.''**

खरं म्हणजे 'नामांतर कविता' ह्या मानव–मुक्तीच्या कविता आहेत. नामांतराचा लढा म्हणजे केवळ एका विद्यापीठीय नाव बदलविण्याचा लढा नव्हता तर तो समग्र रुढी परंपरा व वर्ण व्यवस्थेत जखडलेल्या शोषित मानवाच्या मुक्तीचा लढा होता. डॉ. आंबेडकरांचाही संदेशही हाच होता. ते म्हणतात, 'माझा संदेश आहे संघर्ष आणि अधिक संघर्ष, बलिदान आणि अधिक बलिदान' बलिदान आणि कष्ट यांची मोजदाद न करता केलेला संघर्षच देऊ शकतो त्यांना मुक्ती. धन्य आहेत ते लोक जे आपल्या कर्तव्याविषयी जागृत आहेत. ते लोक जे गुलामीचा अंत करण्यासाठी आपलं तारुण्य, आपलं शरीर व मन यांची सर्व शक्ती पणाला लावण्याची प्रतिज्ञा करतात. धन्य आहेत ते लोक जे निश्चय करतात की, चांगले घडो अथवा वाईट, धगधगते ऊन असो अथवा वादळ, यश मिळो अथवा अपयश, आम्ही तोपर्यंत थांबणार नाही जोपर्यंत आम्हाला मानवपद प्राप्त होणार नाही. जोपर्यंत रुढींच्या, वर्णाच्या आणि धर्माच्या दास्यश्रृंखलेतून शोषितांची मुक्ती होणार नाही तोपर्यंत नामांतरासारखे लढे सुरूच राहणार आहेत. किंबहुना यापुढे असे लढेही जेव्हा एका विद्यापीठाचं नाव बदललं जाऊ शकत नाही तेव्हा वर्णव्यवस्थेत श्रृंखलेत जखडलेल्या मानवाच्या मुक्तीची काय स्थिती असेल? म्हणून मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर होणे आवश्यक आहे. हा लढा असा अर्धवट सोडून चालणार नाही. कारण तो मानव मुक्तीचा लढा आहे. कवी फ. मु. शिंदे म्हणतात–

**आता फुटेल शब्द**
**नसणार शांत बुध्द**
**म्हणेल थांबलेले**
**पेटवा पुन्हा युध्द.**

▲▲▲▲

# जातीविहीन अनैतिकतेच्या विळख्यात सापडलेल्या समाजाचा वस्तुनिष्ठ आलेख

अक्करमाशी
शरणकुमार लिंबाळे
श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
मूल्य रु. ३५/–

भारतीय समाज जीवन हे विषमतेने भरलेले आहे. जाती आणि धर्माच्या नावावर देशाच्या विघटनाचे पध्दतशीर प्रयत्न चालले आहेत. धर्माच्या नावावर माणसांना माणसापासून अलग करून जातियतेच्या प्रश्नाचं विष पेरलं गेलं आहे. यापूर्वीची समाज व्यवस्थाही सदोष होती. स्वतःच्या स्वार्थासाठी काही धर्ममार्तंडानी अशी समाज रचना केली की तेच काय त्यांच्या पिढ्याही पुढील जीवन सुखाने जगू शकतील. म. फुले आणि डॉ आंबेडकर यांनी या विषम समाजरचनेविरुध्द प्रखर आंदोलन उभारले. समाजातील शतकानुशतके ज्यांच्यावर अपमानास्पर जीवन जगण्याची पाळी आली होती त्यांना सुस्थिर व मानाचे जीवन जगावयास मिळू लागले. तळागाळातील शोषित समाजाला हा फायदा काही प्रमाणात मिळाला. तो पूर्णपणे मिळविण्यासाठी



शिक्षणाचा प्रसार हा अधिक गतिमान व्हायला हवा. आज तर राखीव जागांबरोबर आर्थिक निकष अशी एक वेगळीच टूम निघाली आहे. या निकषाने खरोखरच कुणाला फायदा होईल काय हे अद्याप सिध्द व्हायचे आहे. असे जरी असले तरी समाजातील सर्वांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रखर आंदोलने होऊ लागली आहेत. काही प्रमाणात न्याय देण्याची मानसिक तयारी शासन व्यवस्थाही करू लागली आहे. परंतु ज्यांची कोणतीच जात नाही, धर्म नाही त्यांनी काय करावे हा प्रश्न शेवटी उरतोच.

श्री. शरणकुमार लिंबाळे 'अक्करमाशी' या आत्मकथनातून अशीच एका मानव समूहाची व्यथा घेऊन आपल्या समोर आले आहेत. 'रांडेचा पोर' म्हणून आणि दुसऱ्या बाजूला 'अस्पृश्य महार' म्हणून दुहेरी कुचंबणा त्यांच्या वाटेला आली आहे. त्यांचं दुःख हे अगदीच वेगळे आहे. इतरांना निदान स्वतःच्या जातीची सुखदुखे आहेत. विषमता झुगारून देण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. परंतु ज्या सवर्ण समाजाने ज्या लोकांची उपेक्षा केली त्या उपेक्षितांनी लेखकाची उपेक्षा केली. त्यामुळे त्यांच्या मनाची प्रचंड घुसमट सुरू झाली आहे. अन्यांच्या जीवनात सामाजिक विषमतेचे चटके तरी आहेत. पण इथे मानवनिर्मित वंशशुध्दीच्या भ्रामक समजुतीतून मनुष्य गटावर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण आहे. अन्याय चित्रणाचे सर्व प्रश्न अक्करमाशीतून आपल्यापुढे आलेले आहे. अक्करमाशी म्हणजे अनैतिक संबंधातून जन्मलेला. लेखकाची तर सवर्ण व अस्पृश्य मंडळी सुध्दा 'अक्करमाशी' म्हणून हेटाळणी करीत असत. अस्पृश्यही अस्पृश्य ठरवित असत. लेखक स्वतःच म्हणतो, 'अक्करमाशी' म्हणजे अकरा मासे. बारा माशाचा एक तोळा होतो. अकरा माशाचा तोळा होऊ शकत नाही. कारण एक मासा कमी असतो. 'अक्करमाशी' माणसाचंही असंच आहे. त्याचा जन्म विवाह बाह्य संबंधातून झालेला असतो. लेखकाची ही वेदना काही त्यांच्या एकट्याची नाही तर अशा असंख्य वेदनांनी त्याचं आयुष्य भरलेले आहे. त्याचं असं म्हणणं आहे की, हे जीवन माझे नाही. माझ्यावर लादलेली ही गुलामी आहे. आणि म्हणून त्यांचा संघर्ष या सनातन प्राचीन व्यवस्थेविरुध्द सुरू होतो.

दलितांची म्हणून जी जी आत्मकथने आपल्या समोर आलीत ती ती सर्व त्यांच्या आपल्या समाजाची, जातीची किती घोर विटंबना आजपर्यंत

होत राहिली आहे, याचा सरळ सरळ पुरावा आहेत. या सर्व आत्मकथनकारांचा कुठेतरी एका जाति-धर्मात जन्म तरी झाला आहे. पण 'अक्करमाशी'च्या लेखकाचा जन्मच अनैतिक ठरविला गेला आहे. रांडेच्या मुलांची एक वेगळीच 'अक्करमाशी' जमात निर्माण झाली आहे. आई महार अन् बाप लिंगायत असणाऱ्या लेखकाला महार 'सवर्ण' म्हणून जवळ करीत नाहीत तर लिंगायत त्यांना 'महार' म्हणून जवळ करीत नाहीत. अशा व्यक्तीच्या कुटुंबाला काय काय सोसावे लागले असेल ह्याचा विचार केला तरी समाजातील माणसांच्या उपेक्षेची कहाणी डोळ्यासमोर साकार व्हायला लागते.

खरं म्हणजे 'अक्करमाशी' वाचतांना असं सतत जाणवत राहतं की ही काही केवळ लिंबाळेंच्या जीवनाची कथा नाही, तर एका विशिष्ट प्रकारच्या स्त्रियांचं जीवन चित्रित झालेलं दिसतं. संतामाय, मसामाय, चंद्रामाय ह्या स्त्रियांचं जीवन त्या जीवन म्हणून जगताहेत की नरक म्हणून. पुरुषांनी त्यांना रांड म्हणून जवळ करावी, भोग घेत राहावा, त्यांना पोरं होत राहावी आणि केव्हातरी त्यांना पुन्हा वाऱ्यावर सोडून द्यावं. पुन्हा या स्त्रिया कुठल्यातरी पुरुषाला जवळ करून काही काळ त्यांच्याबरोबर कंठतात. यातील मसामाय नावाच्या स्त्रीचं जीवन तर वाऱ्यावरचेच वाटावे इतके अस्थिर आहे. ती विठ्ठल कांबळे नावाच्या पुरुषाची पत्नी व दोन मुलांची आई आहे. परंतु हणमंतराव नावाच्या इसमाच्या संशयावरून पंचायतीचा आसरा घेऊन पती व सासू तिला पतित ठरवितात. ही संधी साधून दादूऱ्या गोंधळी तिला गाणे म्हणायला बोलवितो. परंतु तेथे न जाता हणमंता लिंबाळे बरोबर राहू लागते. परंतु तिला मूल होणार हे कळताच तो तिला सोडतो. काही दिवसांनी ती 'जनी' नावाच्या रांड ठेवलेल्या यशवंत पाटलाशी संबंध ठेवते आणि आठ मुलांना जन्म देते. तिची ही कथा वाचून प्रश्न पडतो की असं वागून या मसामायने काय मिळविले, कुठले प्रश्न सोडविले. प्रश्न पोटाच्या भुकेचा होता की शारीरिक भुकेचा. अशा स्त्री विषयी लिहितांना लेखक लिहितो की, 'अशी मसामाय येकटीच न्हाय. अशी संतामाय येकटी नाही. यांनी विकलंय स्वतःला कुणाच्या तरी मर्जीसाठी. यांनी पोटासाठी शरीर विकलं न्हाय. पोटासाठी काय जगायचं असतं? पोटापलिकडं एक विराट आयुष्य असतं! भाकरी पल्याड एक

जीवन असतं ते जीवन गावकुसांच्या वाट्याला कधी आलं नाही. भाकरही त्येंच्याच हाती हुती अन् इथल्या अब्रुची निरीही त्येंच्याच हाती हुती. एका हातानं भूक भागवली तर दुसऱ्या हातानं भोग घेतला.' लेखक जरी अशा प्रकारे आपलं मत व्यक्त करीत असला तरी या स्त्रियांची अशी घसरण का झाली? हा प्रश्न मात्र सतावतो. खरं म्हणजे अशा स्त्रियाकडे समाज चांगल्या दृष्टीने पाहात नाही. एक भोग्य वस्तू म्हणून पाहतात. काही वेळा स्वतःच्या पोटाच्या भुकेपोटी त्या स्वतःला विकतात किंवा वासनेच्या आहारी तरी जातात. थोडक्यात असं म्हणता येईल की, या स्त्रियांचं जीवन हे अनैतिकतेच्या खोल गर्तेत पडलेले दिसते. लेखक तर अत्यंत भावुक होऊन म्हणतो की, जगात कुठेही स्त्रीवर झालेल्या अन्यायाबद्दल वाचलं की वाटतं आपल्याच आईवर हा अन्याय होतोय. स्त्रीच्या या अत्यंत हलाखीच्या जीवनातून मुक्तता होऊन तिला मानाचं जीवन जगायला मिळणार नाही का? असाही प्रश्न त्यांना सतत सतावत राहातो.

'अक्करमाशी'त अनेक समस्या आहेत. या समस्या सोडविण्यासाठी हा समाज सतत संघर्ष करताना दिसतो. त्या समस्या म्हणजे सदासर्वकाळ असणारे दैन्य, दुःख, हलाखी, लाचारी, व अस्थैर्य. परंतु या सर्वात सतत सतावणारी समस्या आहे माणसाचं पोट, त्याला लागणारी भूक. या भुकेचे चिंतन आपलं लक्ष वेधून घेते. भाकर माणसाएवढी, भाकर भाकर आभाळाएवढी, भाकर सूर्याएवढी प्रखर. भूक माणसापेक्षाही मोठी, भूक सात पाताळापेक्षाही दांडगी, माणूस भाकरीएवढा, भुके एवढा, पोट माणसापेक्षाही दांडगं, एक पोट म्हंजी पृथ्वी, पोट असतं इतभर पर सारं जग गिळून ढेकर देतं. पोट नसतं तर कशा झाल्या असत्या लढाया, चोरी, मारामाऱ्या? पोट नसतं तर कसे झाले असते पाप-पुण्य, स्वर्ग-नरक आणि ईश्वराची निर्मिती? पोट नसते तर झालाच कसा असता देश, सीमा, नागरीक आणि संसद, घटना वगैरे? पोटातून तर जन्मले जग. जगाचे संबंध आई-बाप, भाऊ-बहिण वगैरे वगैरे.

अशा प्रकारचं चिंतन करणाऱ्या लेखकाला आणखी एक प्रश्न सतावतो आणि तो म्हणजे या अस्पृश्यतेच्या विळख्यात शतकानुशतके सापडलेल्या महार समाजाबद्दल. ज्या प्रमाणे सवर्णात जातीयता पाळली जायची त्या प्रमाणे ह्यांच्यातही पाळली जाते. कारण नदीवर लेखकाला महार व

मांगाचा वेगवेगळा पाणवठा दिसतो. खेळतांना मांगाच्या भिम्याला पाणी देणार एवढ्यात संतामाय स्वतःला बाटवशील म्हणून दूर व्हायला सांगते. लेखक अंतर्मुख होत म्हणतो. 'दोस्तापेक्षा जात दांडगी असत्यात का? तहानेपेक्षा जात दांडगी असताय का? भिम्या मानूस न्हवं का? मग त्येच्या स्पर्शानं या पाण्याला कसा इटाळ व्हनार? नदीवर जावं तर नदीतही महाराचा येगळा गुंड्या व्हता अन् मांगाचा येगळा. आमी आता कुन्या गुडग्यात पानी पिवावं? इथं पानीच पान्याला वैरी हुतं.' लेखकाच हे अशा प्रकारचे चिंतन आंबेडकरी प्रेरणेतून आपल्याला आलेलं दिसतं. सामाजिक विषमतेच्या ह्या भिंतीमुळे मनुष्यच मनुष्याची उपेक्षा करताना दिसतो. लेखक याचमुळे फार अस्वस्थ झालेला दिसतो. म्हणून त्याचा संघर्ष वेगवेगळ्या पातळ्यांवरून सुरु होतांना दिसतो. एका बाजूने त्यांना जात्यंतर्गतच संघर्ष आहे. हा संघर्ष नोंदवतांना लेखकाजवळ अत्यंध साधी-सरळ निवदेन शैली आहे आणि ती बघता बघता मानवी मनाचा ठाव घेते.

▲▲▲▲

# मनाच्या आणि वर्तनाच्या दुभंगलेल्या अवस्थेची प्रतीती

बारामाशी
शरणकुमार लिंबाळे
श्रीविद्या प्रकाशन, पुणे- ३०
मूल्य रु. ३०/-



कार्ल मार्क्स एके ठिकाणी लिहितो की, ''कोणत्याही क्षेत्रात स्वतःच्या अस्तित्वाच्या जुन्या स्वरुपांचा नाश केल्याखेरीज विकास होणेच शक्य नसते. विरोध विकासाचा हा नियम म्हणजे 'विनाशाच्या विनाशाचा' [निगेशन ऑफ दि निगेशन] नियम होय. परंतु आपल्याला या ठिकाणी रुढार्थाने नाश अपेक्षित नसून डॉ. वि. स. जोग म्हणतात त्याप्रमाणे अधिक उच्चतर अवस्थेकडे जाणाऱ्या गतीचं ते वैशिष्ट्य आहे. आत्मकथन लिहिणाऱ्या दलित लेखकांना एका बाजूने आर्थिक संघर्षाला तोंड देत नव्या अस्तित्वाचा शोध घ्यायचा आहे आणि जुन्या अन्यायांना संपवायचे आहे.

परंतु या विचाराप्रमाणे 'बारामाशी' हे आत्मकथन लिहिणाऱ्या लेखकाची अवस्था मात्र दुभंगलेली झाली आहे. एकीकडे हजारो वर्षे आपला समाज जो

अन्याय आणि जे जीवन जगतो आहे ते झुगारले पाहिजे. हे जीवन झुगारणे म्हणजे त्या बकाल वस्तीत न राहता, ते निकृष्ट अन्न न खाता सर्वसाधारणपणे मध्यम वर्ग जे जीवन जगतो त्याप्रमाणे जगणं आणि तेथेच मनाचा आणि आपल्या वर्तनाचा संघर्ष सुरू होतो. लिंबाळे ज्या समाजात जन्मले, वाढले, जो जीवन संघर्ष केला तो पार करून एका मध्यमवर्गीय माणसासारखं जीवन जगू लागले तेव्हा सुखाच्या क्षणाची प्रतीती होण्यापेक्षा त्यांच्या मनाची कुतरओढच अधिक वाढली. शरदच्चंद्र मुक्तिबोधांनी एके ठिकाणी असे लिहिले आहे की, दलित जाणीव ही मानवमूल्याधिष्ठितच आहे. परंतु भारतातील एका वर्गाच्या जाणिवेचा अविष्कार आहे. व्यक्तीस्वातंत्र्य वादाच्या आधारावर आधुनिक मध्यम वर्गात सुधारणावादी जाणीव आहे आणि या जाणिवेचे स्वरुप सामाजिक व सांस्कृतिक असते. दुभंगलेली जरी असली तरी लिंबाळेच्या आत्मकथनातील जाणीव ही आधुनिक मध्यम वर्गात पदार्पण करणाऱ्या वर्गाची सुधारणावादी जाणीव आहे. श्री. शरणकुमार लिंबाळे यांनी 'अक्करमाशी' मधून आपल्या भीषण आयुष्याची नोंद केली होती, तर 'बारामाशी' मधून स्तर बदलानंतर त्यांच्या मनात जी प्रचंड खळबळ चाललेली होती त्याची अस्वस्थ कबुली दिली आहे. त्यांच्या मते प्रत्येक कलावंत आणि कलाकृती या कमी अधिक फरकाने एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मन आणि जीवन म्हणून त्यांनी आपल्या मनातील तमाम आंदोलनांना हारीवर मांडले आहे. सुरवातीला असणारा 'शरण्या' जेव्हा शरणकुमार लिंबाळे झाला तेव्हा जगण्यातला स्तर बदललेला होता. मी माझ्यातील 'दलित ब्राम्हण' कार्यकर्ता आणि कलावंत या परिघात 'स्व' आणि 'स्वेतराचा' शोध श्री. लिंबाळे घेत राहातात.

अतिशय फटीचर जीवन जगणारे लिंबाळे जेव्हा पांढरपेशीय जीवन जगू लागतात ते तेव्हाचे अनुभव लेखकांच्या मनाला वेदना करून जातात. शहरात ज्या वस्तीत लेखक राहतो त्या वस्तीत राहतांना लेखकाला ही जाणीव सतत होत राहते की तो या ठिकाणी 'उपरा' आहे आणि मधून मधून ज्या वेळी तो आपल्या गावी जातो, आपल्या त्या बकाल वस्तीतील घरी जातो तेव्हा तिथले पाणी, अन्न घशाखाली उतरविणे त्याला कठीण होते. आपल्या ऑफिसमधील मैत्रीण स्वाती जेव्हा टेबलावर त्याला भाकरी

वाढते तेव्हा लेखकाची वेदना ही मुखर होते. लेखक निवेदन करतो – "मी एकेक घास झोपडीगत डोळ्याआड करीत होतो. या चंद्र चांदण्याच्या जगातही मला माझ्या मातीचा दाह असह्य व्हायचा. चैन-महालात वावरत असलो तरी भूतकाळ मनावर थयथया नाचायचा. आज मी सुटाबुटात आहे. रोज स्नो पावडर लावतो. अगदी सवर्णासारखा दिसतो. मला या वागण्या बोलण्यात 'दलित' म्हणणे शक्य नाही. माझ्या या पांढऱ्या कॉलरखाली किती वेदना गाडल्या आहेत. माझ्या हसण्यावर जाऊ नका. माझी खूप दमछाक होतेय. परवा मी गावी गेलो, तेव्हा झोपडीत राहणे किती जिवावर आले. मला माझ्या आईची किळस वाटली. जे अन्न खाऊन लहानाचा थोर झालो, ते गिळवत नव्हतं. काल मी स्वातीच्या घरी गेलो, तेव्हा किती परकं वाटलं. आपण या बंगल्याचे कुणी लागत नाही. इथल्या सुखःदुखाची जातकुळी वेगळी आहे, मी उपरा आहे इथ. पकडून आणिला पाहुणा. लेखकाची ही जी अवस्था आहे तोच 'बारामाशी' आत्मकथनाचा विषय आहे. लेखकाला वाटतं की, आपण निव्वळ ढोंगी जीवन जगतो, त्यात कसलीही सुसंगती नाही. आपली विविध रुपं आहेत. ते म्हणतात, 'शरण' म्हणून मी बायकोला बागेत फिरायला घेऊन जातो. 'शरणकुमार' म्हणून आंबेडकर जयंतीला बाबासाहेबांवर बोलतो. 'लिंबाळेसाहेब' म्हणून कलगीच्या घरी सत्यनारायणाच्या पूजेला जातो. बाबासाहेबांनी पिण्याच्या पाण्यासाठी चवदार तळ्याचा सत्यागह केला. आता आमच्या घरी नळ आहे. पण गावी आजही माझ्या आईला वेगळ्या पाणवठ्यावर पाणी भरावं लागतं. एवढंच नाही तर उच्च वर्णियांप्रमाणे आपल्यामध्येही सामाजिक हीनतेची भावना निर्माण झाली आहे. कारण उच्चवर्णीय मित्र आल्यानंतर आपलं वागणं आणि आपण त्याच्या घरी गेल्यानंतर त्यांचं वागणं यात महद्अंतर आहे. लेखक लिहितात, 'जोशा, जोशाची बायको घरी आली की मी खूपच काळजी घेतो. पण तोच एखादा दलित मित्र आला की त्याचं येणं कॅज्युअली घेतो.' हे असे का व्हावं? गावातल्या सवर्णाच्या शेंबड्या पोरांनी 'महार धोंड्या' म्हणून मारलेल्या हाका, सवर्णाची लहान पोरं माझ्या वडिलांच्या वयाचा विचार न करता शिव्या द्यायची आणि वडिल मात्र शेंबड्या पोराला सुध्दा 'धाकले मालक' म्हणायचे. लेखकाच्या मनातले हे द्वंद स्तर बदलल्यानंतरचे आहे. दोन्ही बाजू स्पष्ट दिसत असूनही

मनाची कोंडी झाल्यासारखी वाटते आहे.

आपल्या समाजाला या हीनतेच्या भावनेतून डॉ. आंबेडकर या महामानवाने बाहेर काढले. म्हणून ते म्हणतात, ''हजारो वेळा चंद्र सूर्य उगवले, पण प्रकाशाचा अर्थ कळला नव्हता. डॉ. आंबेडकर जन्मले नसते तर आम्ही खरंच काळोखात चिरडलो असतो.'' ही जाणीव तर मनाच्या गाभ्याशी एकरुप झालेली आहेच पण स्तरबदलांमुळे मनात निर्माण झालेली खंत ही तितकीच व्यापक आहे. आणि म्हणून तो म्हणतो, 'लहान मुलानं आईला बिलगावं तसं मी माझ्या मातीला बिलगतो. माझी मुळे अधिक घट्ट होतात. मी ज्या मातीत जन्मलो, त्या मातीला विसरु शकत नाही. माझे पाय त्या मातीनं रंगले आहेत. मातीचे पाय, मेंदीचे पाय.' लेखक आंबेडकरी चळवळीचा एक खंदा कार्यकर्ता. पण स्तर बदलामुळे काहीच करता येत नाही याची जाणीव आणि खंत ही की, चळवळीपासून दूर राहून सर्व फायदे मात्र आपण प्राप्त करून घेत आहोत. लेखकाची ही भावना म्हणजे त्यांच्या मनाचा सच्चेपणा आहे. अशा सच्चेपणाच्या अनेक गोष्टी लेखक लिहीतो आणि म्हणतो की, दिनेश कांबळे मोर्चासाठी बोलावयाला आला तर मी त्याला म्हटलं की, माझ्या काही मर्यादा आहेत. मी चळवळीत नसतो तरी चळवळीविषयी बोलतो, लिहितो ही एक प्रकारची बांधीलकी आहे. चळवळ एकांगी नसते. कार्यकर्त्यांनी लढायचं असतं. आम्ही विचारांची शिदोरी पोहचवू. त्यावर मित्राचं उत्तर महत्वाचं आणि यथार्थतेचं भान करून देणार आहे. तो म्हणतो, 'तू या पॉश कॉलनीत राहून आम्हाला कसले विचार देणार. या कॉलनीचा गंज चढतोय तुझ्या अंगावर. तू संपला आहेस. तू दलित ब्राम्हण आहेस.' लेखकाचं हे मन आणि वर्तनातील दुभंगलेपण वारंवार जाणवत राहतं. आर. एस. एस. वाल्यांनी आयोजिलेल्या कार्यक्रमाचं निमंत्रण मिळाल्यानंतर त्याचं समर्थन करताना तो म्हणतो की काय विचार आहेत आपले. विचार कुठल्याही व्यासपीठावरून मांडायला आपण आपल्या विचारांशी प्रामाणिक असलो म्हणजे झालं. पूर्वी एका विशिष्ट वर्गासाठी बोलायचो. आता मला ऐकायला अनेक वर्गातली माणसं येतात, चाहतात. पण या मताला तटकन तडा जातो तेव्हा दिनेश कांबळे म्हणतो की, 'ही माणसं तुला पचवतील, तुमच्यातला तिखटपणा नष्ट होईल.' अशा एक ना अनेक दुभंगलेल्या

अवस्थांचा लेखाजोखा बारामाशीत आहेत. लेखकाच्या मनातील ही तमाम आंदोलनं आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांप्रमाणे कुठल्याही प्रश्नावर चळवळ करणाऱ्या कुठल्याही जाती, धर्म, राष्ट्राच्या कार्यकर्त्यांना विचारप्रवण करणारे आहेत.

प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनात स्तर बदलानंतर वेळोवेळी हा प्रश्न निर्माण होतो. विशेष म्हणजे आपली परिस्थिती बदलली म्हणजे आपण बदलतो अशी भावना त्याने व इतरांनी कधीही करून घेऊ नये. ज्या स्थितीतून मनुष्य उभा राहात असतो ती परिस्थिती तो कधीही विसरत नसतो. श्री. शरणकुमार लिंबाळेंनी आपल्याच मनाची दुविधावस्था अत्यंत प्रामाणिकपणे मांडून जणू स्तर बदलानंतर बदललेल्या समाज मनाचाच आढावा घेतला आहे.

▲▲▲▲

# शोषणग्रस्त धर्मांतरितांच्या प्रश्नांना वाचा फोडणारा ग्रंथ

खिस्ती महार
बाळासाहेब गायकवाड
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर.
रु. ७०/-



१३ ऑक्टोबर १९३५ ला येवल्याच्या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली. 'मी जरी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही.' म. गांधीची यावर प्रतिक्रिया अशी होती की, हा ''दुर्दैवी निर्णय'' आहे. ते म्हणतात की, धर्म म्हणजे घर नव्हे की वस्त्र नव्हे. इच्छेप्रमाणे बदलता येत नाही. धर्म व्यक्तीला ईश्वराशी बांधून टाकतो. माणसाचे शरीर मर्त्य आहे. पण धर्म सनातन आहे. जर डॉ. आंबेडकरांचा ईश्वरावर विश्वास असेल तर त्यांनी आपला क्रोध आवरावा आणि पुनर्विचार करावा. धर्मांतराने मूळ हेतू साध्य होणार नाही. त्यांचे म्हणणे गरीब अशिक्षित हरिजन ऐकणार नाहीत. डॉ. आंबेडकरांची या संदर्भातील भूमिका अशी होती की, हिंदू धर्मातील वर्ण व्यवस्थेने हजारो वर्षापासून अस्पृश्यांवर अन्याय केलेला आहे.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची भावना त्या धर्मात अभावानेच आढळते. यासाठी धर्मांतर आवश्यक आहे. म. गांधी आपल्या धर्माला न त्यागता त्यातच आमूलाग्र परिवर्तन घडवून आणू इच्छित होते. त्यांची ईश्वरावर अतूट श्रध्दा होती. म्हणून धर्मातील मानव मानवाची होणारी उपेक्षा दूर होईल असे त्यांना वाटे. परंतु प्रथम देश स्वतंत्र झाला पाहिजे. मग जाती-जातीमधील विषमता दूर करता येईल. गांधी आणि आंबेडकर दोघेही चैतन्यवादी. धर्मातील उदात्त आध्यात्मिक तत्वांना मान्यता देणारे. १९५६ मध्ये खूप विचारांती बाबासाहेबांनी आपल्या हजारो अनुयायांसह बौध्द धर्मात प्रवेश केला. या धर्मांतराचा एक उचित परिणाम झाला तो म्हणजे हिंदू धर्माला एक मोठा हादरा बसला. आपण आपल्या धर्मव्यवस्थेबद्दल विचार केला पाहिजे. याबद्दल विचारमंथन सुरु झाले. दुसरे म्हणजे हजारो वर्षापासून आपली गमावलेली अस्मिता अस्पृश्यांना परत मिळवता आली. परंतु धर्मांतरित झाल्याने सर्व प्रश्न सुटले असे नाही. आजही धर्मांतरितांना 'नवबौध्द' म्हणून गणले जाते आणि त्यांच्या असंख्य समस्यांना सोडविण्याचा प्रयत्न शासनाकडून होताना मात्र दिसत नाही. अशा वेळी आपण धर्मांतर केले आहे, म्हणजे नेमके काय केले आहे हा प्रश्न काही धर्मांतरीत बांधवाना पडला असल्याची शक्यता आहे.

इंग्रजांनीसुध्दा भारतात ख्रिस्ती धर्माचा प्रसार व्हावा म्हणून समाजामध्ये जे जे आर्थिकदृष्ट्या अतिशय दुर्बल होते त्या सर्वांना धनाचे आमिष दाखवून आपल्या धर्माची दिक्षा दिली. सर्वसाधारणपणे बाकी समाजाची हीच धारणा की, खिस्ती धर्मात जे धर्मांतरीत झाले त्यांना आता कसलीही चिंता नसून आर्थिक सुबत्ता त्यांच्या जीवनात आली असावी. परंतु आपण समजतो तशी स्थिती नाही तर त्याच्या समस्या ह्या अनाकलनीय अशा आहेत, अशा सर्व बांधवांची कैफियत मांडताहेत बाळासाहेब गायकवाड आपल्या 'ख्रिस्ती महार' या आत्मकथनातून. आपल्या मनोगतात ते म्हणतात, मी बाळासाहेब गायकवाड, 'ख्रिस्ती महार' धर्मांतरीत बनलेला तरुण. या परिसरात नि संपूर्ण देशातच मिशन यांनी गोरगरीब दलित शोषितांचे त्यांच्या आर्थिक लाचारीचा फायदा घेऊन स्वर्गप्राप्तीचे आमिष दाखवून धर्मांतर केलेले. या त्यांच्या चालीला आम्ही बळी पडलेलो. मिशन यांच्या या धर्मांतराने समाजाचे लग्नाचे, मरणाचे नि सांस्कृतिक जीवनाचे

नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत. समाज तर सोडाच, पण नातेवाईक माणूस देखील जवळ करीत नाही. अशी परिस्थिती धर्मांतरीत ख्रिस्ती संस्कृतीने 'उपरा'च ठरतो आहे. लेखक निर्माण झालेल्या या परिस्थितीने जवळपास या निष्कर्षाला आला आहे की, धर्माने मानवी जीवनाचे प्रश्न सुटत नाहीत. स्वर्ग, मोक्ष, पाप, पुण्य या सर्व कल्पना म्हणजे निव्वळ ढोंग आहे. या आत्मकथनात आलेले ख्रिस्ती धर्मगुरू हे किती ढोंगी असून त्यांचं जीवन हे व्यभिचार आणि भ्रष्टाचाराने बरबटलेलं आहे. त्यांच्यासाठी अशा कृत्यासाठी धर्म हे एक साधन आहे. म्हणून धर्मांतराने प्रश्न सुटत नाही हा लेखकाचा सर्वांना सवाल आहे. त्यांच्या मते धर्मांतराने प्रश्न सुटले नाहीत. उलट या धर्मांतरीत बांधवांच्या नावावर चर्च वाढतात. प्रार्थनेने कोणतेच प्रश्न सुटत नाहीत. माणसांना प्रार्थनेच्या अधीन लावून त्यांचे अधिकाधिक शोषण करण्याचे काम मिशनरी या परिसरात करीत आहेत. नवीन बांडगुळे या मिशनऱ्यांच्या रुपाने उभी राहिली आहेत. कोणत्याच चळवळीशी नाते नसणारा समाज असा 'ख्रिस्ती महार' समाज इथे निर्माण झाला आहे. हिंदू संस्कृती अव्हेरण्यापासून ख्रिस्ताच्या मार्गाच्या प्रवाहापर्यंत येऊनही त्याचे प्रश्न 'जैसे थे' याच अवस्थेत आहेत.

दलित आत्मकथनांमुळे तळागाळातील दलित शोषित समाजाचे वास्तव चित्र आपल्यासमोर आले. डॉ. आंबेडकर आणि आंबेडकरी चळवळ यामुळे प्रत्येक शोषिताचा आवाज बुलंद होऊ लागला. बाबासाहेबांनी केलेल्या धर्मांतराने त्या समाजाला काय मिळाले किंवा काय नाही हा प्रश्न वादाचा आहे. परंतु त्यांच्या प्रेरणेतून सुरू झालेले 'आंबेडकरी चळवळ' मात्र 'मानवमुक्ती'चा ध्यास घेणारी होती. याच आंबेडकरी प्रेरणेने लेखक भारावलेला आहे. तसेच शोषित समाजाची शोषणातून मुक्ती करणारे व आर्थिक क्रांती अपेक्षिणाऱ्या मार्क्सवाद्यांच्या संपर्कात आल्यामुळे आपल्या धर्मांतरीत समाजाकडे ते डोळसपणे पाहात आहेत. त्यांच्या असं लक्षात आलं की जवळपास हा सर्व समाज अशिक्षित आहे. पूर्वीच्या हिंदू धर्मातील सर्व रुढ्यांचे पालन करणारा व नवीन धर्मातील सर्व अंधश्रध्दांना मानणारा आहे. धर्मांतरीत होऊनही नव्या धर्मात ही वेगळ्या प्रकारच्या जातीयतेत जगणारा आहे. खिस्ती धर्मगुरू यांच्या अज्ञात व अंधश्रध्दांचा फायदा घेऊन त्याचं पध्दतशीर शोषणही करतो आहे. धर्मप्रसाराच्या नावाने येणारे

लक्षावधी रुपये हे हडपताहेत आणि त्या धनाचा उपयोग अनिती आणि अनाचाराच्या कामी आणताहेत. लेखकाने जेव्हा या विरुध्द बंड केले तेव्हा ते बंडही पध्दतशीरपणे दाबले गेले. परिवर्तनवादी चळवळीतले इतर घटकही अशा वेळी काही मदत करीत नाहीत. त्यामुळे अशा धर्मांतरीतांचा प्रश्न हा अधिक बिकट बनला आहे. हे आत्मकथन लिहितांना लेखकाने काही वेळा असभ्य प्रसंगाचं चित्रण जरी केलेलं असलं तरी ते त्यांच्या समाजाचे वास्तव आहे आणि ते नाकारुन चालणार नाही. केवळ वैयक्तिकच नाही तर समाजामध्ये भेटणारी माणसं मग ते दलित चळवळीचे नेते असोत, नाहीतर साखर कारखान्यांचे पदाधिकारी असोत अथवा शासकीय अधिकारी असोत. त्यांच्या सर्व प्रकारच्या कर्तृत्वाचा भंडाफोड लेखकांनी केला आहे. समाज कसा नेतृत्वहीन होत चालला आहे, त्याचा मार्ग विकासाचा की अधोगतीचा की पतनाचा त्याचाही वस्तुनिष्ठ आलेख वाचावयास मिळतो. अशा 'ख्रिस्ती महार' या धर्मांतरीत समाजाची ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केलेली फसवणूक, अन्यायाविरुध्द लेखक बाबासाहेबांची आठवण करतो आणि म्हणतो बाबासाहेब तुम्ही जिवंत व्हा. धर्मांच्या आधीन चाललेला समाज स्वकर्तृत्वावर प्रचंड क्रांती करण्यासाठी सिध्द करा. धर्मांतर, बाप्तिस्मा वगैरेंचे स्तोम माजवून गरिबीचा, लाचारीचा फायदा स्वतःच्या भोगासाठी घेणाऱ्या या नीच धर्माचे नी धर्मगुरुंचे खरे रूप दाखवून द्या. पुनश्च त्याला एकदा सत्याची जाणीव द्या! खरंतर मानवी जीवनात धर्मांची काही गरज नसल्याचेच लेखक मांडतो आहे. स्वकर्तृत्वावर त्याचा भर आहे. म्हणून या समाजाची चळवळ त्याने उभारली आहे. आणि प्रामाणिक इच्छा आहे की, मार्क्स–आंबेडकरांची चळवळ या समाजाला स्पर्शून जावी आणि या शोषणाविरुध्द त्याने पेटून उठावे असा हेतू या मागे आहे. त्याचबरोबर सर्व चळवळींच्यापासून अलिप्त राहून प्रार्थनेवरच विसंबून राहणारा हा समाज चळवळमय झाला पाहिजे. तसेच शोषणाविरोधी कार्यरत असणाऱ्या चळवळीचेही या समाजाकडे लक्ष गेले पाहिजे, ही सद्‌भावना यामागे आहे. लेखक आपल्या उद्देशात सफल होणार यात तिळमात्र शंका नाही.

▲▲▲▲

# जातींमधील अंतर्गत जातीयतेचा संघर्ष

जातीला जात वैरी
ना. म. शिंदे
प्रॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

भारतीय समाज जीवन जाती व्यवस्थेने पोखरले गेले आहे. किडलेले आहे असं म्हटलं तरी काही वावगं होणार नाही. या देशातील धर्मकारण आणि राजकारण हे सुध्दा जाती व्यवस्थेवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. ही जाती व्यवस्थेतील संघर्ष सवर्णा-सवर्णातच नाही, तर ती दलितांमध्ये सुध्दा तेवढ्या व तीव्र प्रमाणात आढळून येतो.

श्री. ना. म. शिंदे यांनी लिहिलेले 'जातीला जात वैरी' हे अलीकडेच प्रसिध्द झालेले दलित आत्मकथन आहे. विशेष म्हणजे वीर, शैव, कंक्कच्या, ढोर या जातीतील लेखकाने लिहिलेले हे आत्मकथन आहे. सवर्णांची अनेक आत्मकथने आपण वाचलीत. त्यांच्यातील सर्व प्रकारच्या जीवन संघर्षाकडे आपण आकर्षितही झालो. परंतु ना. मं. शिंद्यांनी मांडलेला जाती जातीमधील तेही दलित जातीमधील अंतर्गत



जातीयतेचा संघर्ष विलक्षण असा आहे. लेखक या आत्मकथनात 'ढोर' जातीचं चित्रण करतात. ढोर ही जमात महारांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजणारी जमात आहे. आपल्या जुन्या नावाच्या महार मित्रांशी बोलताना लेखक हा अंतर्गत संघर्ष अधिक स्पष्ट करून दाखवितांना म्हणतात की, ''तसं नाही बे, तुमी दहा नंबरचं खाता. आमच्या जातीला चालत नाही ते. आम्ही ढोरं, चांभाराचंबीं खात नाही. तुम्हा म्हारा-मांगाचं खाल्ल्यावर आम्हाला आमच्या जातीनं वाळीत टाकलं तर तुम्ही घेणार हाय का?'' जातीयतेचा एवढा प्रचंड लढा डॉ. आंबेडकरांनी लढल्यानंतरही ढोर चांभार, महार, मांग सारख्या जातीमध्ये श्रेष्ठ कनिष्ठता कशी शिल्लक आहे या वास्तवावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. यापूर्वीच्या दलित आत्मकथनामध्ये सवर्ण आणि दलित यांचा संघर्ष चित्रीत केलेला असायचा. त्याचबरोबर त्यांच्या शोषणाविरुध्दच्या विद्रोहाचेही चित्रण वेगवेगळ्या प्रकारांनी केलेले आढळायचे. परंतु दलितांमधील अंतर्गत जातीयतेचा संघर्ष मात्र कुठेही चित्रित केला गेला नव्हता. त्या दृष्टीने 'जातीला जात वैरी' हे आत्मकथन दलितांच्या आत्मसंघर्षाची गाथा आहे. यामुळे पहिल्यांदा या पुस्तकाच्या निमित्ताने दलितांचे आंतरविश्व लख्खपणे व्यक्त झाले आहे. वेगवेगळ्या जातींचे अंतरंग, त्यांचा अहंकार, अस्तित्व, स्वयंप्रकाश, परप्रकाश, गंड, द्वेष, आत्मप्रौढी या व अशा गुणदोषांसह प्रगट झालेले हे आत्मकथन आहे.

लेखकाने हे पुस्तक लिहिल्यानंतर आपली भूमिका अगदी स्वच्छपणे स्पष्ट केली आहे. त्यांच्यामते हे त्यांचे आत्मचरित्र नाही तर फक्त आठवणी आहेत. ह्या आठवणी लिहित असतांना कुणाच्याही व्यक्तीचित्रणाचा आवर्जून आग्रह नाही तर ह्या सगळ्या आठवणी, प्रसंग सत्य आहेत आणि त्या १९५६ ते १९८६ या कालखंडातल्या आहेत. लेखकाची अर्पण-पत्रिका अतिशय सूचक आहे. ते म्हणतात, 'ज्यांना अजूनही म. बसवेश्वर, म. ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कळले नाही आणि कळले आहे त्या सर्वांना त्यांनी हे पुस्तक अर्पण केले आहे.' त्यांचं दुःख हे आहे कीं ज्यासाठी डॉ. आंबेडकरांनी लढा दिला ते दलित अजूनही जातिव्यवस्थेच्या चक्रात अडकलेले आहेत. ढोर ही दलितातील एक जात आहे. ती स्वतःला सर्वश्रेष्ठ व उच्च मानते व इतरांना कमी लेखते.

त्यांच्यात व्यवहार संस्कार आणि राहणीमानानुसार श्रेष्ठत्वाचा एक गंड जोपासला गेला आहे. शिंदे आपली व्यथा मांडतांना म्हणतात की, 'सवर्णात काय किंवा पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यात काय, सगळीकडे जातीव्यवस्थेचा, पोटजातीचा भुईकोट, त्यात सवर्ण ते अस्पृश्य ही एक भीषण जाती व्यवस्था मी जाणीवपूर्वक इथे मांडलेली. जाती व्यवस्था, अस्पृश्यातील अस्पृश्यतेचे अंतस्थ भीषण रुप ही अस्पृशांमधील अस्पृश्यता रुद्रभीषण व जीवघेणी आहे. सवर्णांनी अस्पृश्यांनी केलेली अस्पृश्यता देखील इथे लाजावी.'

व्यवहारात जातीयवाद नको, जातीभेद नको असे म्हणत असताना तो किती बळकट होत चालला आहे, किंबहुना झालेला आहे त्याचं उत्तम उदाहरण म्हणजे 'जातीला जात वैरी' हे पुस्तक होय. ढोर, चांभार, महार आणि मांग या अस्पृश्य जातींमध्ये जातीय तणाव मोठ्या प्रमाणात आहे. त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार बंद आहेत. ढोर हे स्वतंत्र व्यवसाय करणारे असून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबीही आहेत. व त्यामुळेच ते चांभार, महार, मांगापेक्षा आपल्याला वेगळे समजतात. या चारही जाती सुध्दा आपल्यापुरत्या कमालीच्या आग्रही व असहिष्णू आढळतात. त्यामुळे चौदा बुलाकातील ढोर गल्लीमध्ये शिवजयंती तर महारगल्ली मध्ये आंबेडकर जयंती साजरी केली जाते, त्यातून दंगली होतात. दोन्ही समाजात सामंजस्याचा अभाव दिसून येतो. अंतस्थ जातीयवादाची ही कीड सर्वच जमातींना पोखरतांना दिसते. ही कीड इतकी भयंकर पसरली आहे की, डॉ. आंबेडकर हे फक्त महार जातीचे नेते आहेत, आमचे नाहीत असं ढोर जमातीला वाटते. इतकेच नाही तर स्वतः शिकाचा अनुभवही मोठा गंमतीचा आहे. ते ढोर जमातीचे असल्यामुळे त्यांना दलित चळवळीतून जाणीवपूर्वक दूर ठेवण्याचा उपक्रम केला जातो. काही तर म्हणतात की, मी महार असल्याने माझ्या निष्ठेबद्दलच लोकांना शंका असे. हा आपल्यातला बाम्हण चळवळीमध्ये आला आहे. अशी त्यांची धारणा आहे. हे तर काहीच नाही, परंतु दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद कुठल्या जाती-जमातीकडे जावे यावरूनही मोठ्या प्रमाणात तीव्र मतभेद होत राहतात.

'जातीला जात वैरी' हे पुस्तक जाती जातींच्या भेदाच्या इतिहासाचा,

त्यांच्या संस्कृतीचा एक कोश आहे. किंबहुना दलित आत्मकथने ही सामाजिक व सांस्कृतिक दस्तावेज आहेतच. त्यादृष्टीनेही सर्व दलित जाती जमातींना तसेच सर्व प्रकारच्या सामाजिक साहित्यिक चळवळींना आत्मशोध घ्यायला लावणारे हे पुस्तक आहे.

▲▲▲▲

# विविधांगी मनोकळांनी समृध्द 'गांवकळा'

गावकळा
बळवंत कांबळे
प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर.
मूल्य रु. ५०/-




सामाजिकतेचे अधिष्ठान लाभलेली एक वाङ्.मयीन चळवळ म्हणून आपण दलित साहित्याकडे बघतो. आधुनिक मराठी वाङ्.मयात एक अत्यंत प्रभावी व जोमदार चळवळ म्हणून तिचा उल्लेख करावा लागेल. दलित आत्मकथने, कथा, कादंबरी व कविता अशा अनेक प्रकारांनी ही चळवळ फोफावली आहे. त्यात दलित कथेचे स्थान अत्यंत महत्वपूर्ण आहे. दलित आत्मकथन व कवितांनी दलित साहित्यिकांनी आपल्या मनातील संताप, कटुता अत्यंत आक्रमकतेने मांडली. अशा प्रकारचे जीवनानुभव समोर आल्यामुळे दलित साहित्याकडे लक्ष वेधले गेले. परंतु तेच तेच अनुभव जेव्हा वेगवेगळ्या आत्मकथनातून समोर येऊ लागले तेव्हा त्यांच्यातल्या आक्रमकतेची धार बोथट होऊ लागली. तेव्हा या आक्रमकतेची धुरा दलित कथालेखकांनी सांभाळली.

दलित कथालेखकांच्या कालखंडाचा विचार केल्यानंतर असे दिसून येते की, बाबूराव बागुलापर्यंतची पिढी व त्यानंतरची पिढी यात खूपच अंतर पडत गेले आहे. पूर्वीचे कथालेखक हे मानवजातीच्या अन्याय, अत्याचाराचे, दुःखाचे प्रभावी चित्रण करतात. अन्याय्य समाज व्यवस्थेमुळे दलितांच्या वाट्याला आलेले दुःख हा त्यांच्या कथेचा प्राण होता. जन्मजात अस्पृश्य नसलेल्या शहराने दूर लोटलेल्या व म्हणून एक प्रकारे दलित ठरलेल्या झोपडपट्टीत वास्तव्य करणाऱ्या विविध जातीतील, धर्मातील, प्रांतातील व्यक्तीचे जीवन ते चित्रित करतात. संपूर्ण मानवजातीच्या दुःखाकडे ते व्यापकपणाने ते बघतात. परंतु बाबुराव बागुलांच्या नंतर उदयाला आलेली कथाकारांची जी पिढी आहे तिला आधुनिक उच्चस्तरीय शिक्षणाचा लाभ झालेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा उत्कट स्वरुपाचा परिणाम या कथाकारांवर झालेला आहे. अनेक कथाकार शहरामध्ये पांढरपेशा व्यवसाय करणारे आहेत. मात्र त्यांचे बालपण ग्रामीण भागात गेलेले असल्याने ग्रामीण जीवनाचाही त्यांनी जवळून अनुभव घेतलेला आहे. त्यांच्या पाठीशी अस्पृश्यतेचा अवमानकारक अनुभव आहे. तसेच शहरी जीवनातील वेदनादायक अनुभवही आहेत. झोपडपट्टीत निकृष्ट जिणे कसे आहे हेही त्यांनी बघितलेले आहे. या प्रकारचा अनुभव असलेल्या उदयीमान कथाकारांनी ग्रामीण भागातील दलितांच्या समकालीन सामाजिक जीवनाचा वेध घेणाऱ्या कथा लिहिल्या आहेत, तशाच झोपडपट्टीतील विदारक वास्तव अनुभवावर कथा लिहिल्या आहेत.

अशा नवोदित कथाकारांमध्ये बळवंत कांबळे हे नाव महत्वाचे ठरणार आहे. कारण त्यांची कथा वास्तवाचे ठाम अधिष्ठान घेऊन उभी राहणारी तर आहेच परंतु जिवंत माणसांच्या मनाची स्पंदने आणि त्यांच्यातील अंतर संबंध चित्रित करणारीही आहे. कांबळेंच्या कथा ह्या गावात राहणाऱ्या दलितांच्या कथा आहेत. गावातल्या दलितांच्या प्रश्नाचे विविधांगी चित्रण गावकथेत आहे. केवळ प्रश्नच नाही तर त्यांनी केलेला संघर्षही यात चित्रित झालेला आहे. पूर्वीच्या कथाप्रमाणे या कथा व्यक्तिचित्रणात रमतच नाहीत. तर सांस्कृतिक संघर्षाच्या पातळीवरुनही त्या रंगवित असतात. कारण कांबळे यांची पात्रे ही विचारांची वाहक म्हणूनही काम करताना दिसतात. या कथा सहानुभूतीपेक्षा आपल्या अनुभूतीवर जास्त भर देतात.

परंतु ही अनुभूती साचेबंद नाही तर ती तोडणारी आहे. किंबहुना मनस्वी मुक्त आहे. नितळ आहे. केवळ मानवी भावनेला हात घालणारीही नाही तर ती वास्तव जीवनवादी आहे. ग्रामीण जीवनात आजही अंधश्रध्दा, परंपरा, देवधर्म यांचे असलेले स्थान टिकून राहिलेले आहे. परंतु कांबळे 'नस्टावा' सारख्या कथेत या अंधश्रध्देविरुध्द उभे राहिलेले दिसतात. 'नस्टावा' असलेल्या घरात राहणारा 'गणबा' अंधश्रध्देला बळी न जाता अफवा पसरविणाऱ्या शिवण्याचा प्रतिकार करतो. दलितांमधील अंतर्गत ताणतणाव, दलित सुशिक्षित तरुणांची आपल्या समाजापासून तुटत जाण्याची प्रवृत्ती, ग्रामीण भागात उदयास येत असलेले ढोंगी, स्वार्थी नेतृत्व ग्रामीण भागातील राजकारण इ.चे वास्तव चित्रण 'भरान्त' सारख्या कथेतून घडते. जमीनीच्या वाटपात नाना डोंगऱ्या व दाजी कोकित यांचा परस्परात वाढता संघर्ष आणि भ्रष्ट न्यायपंचायतीचे दर्शन या कथेत घडते. या भ्रष्टपंचायती विरुध्द संघर्षाला उभा राहणारा संभा याचं धाडसी चित्रण या कथेत आहे.

आज अजूनही सवर्णाकडून दलितांवर होणारे अत्याचार अंधश्रध्देप्रमाणे टिकून राहिले आहेत. 'ढोलक्या' या कथेत आपल्या वृध्दावस्थेमुळे आपला मुलगा रामज्याला ढोलक्या बनवितो, परंतु रामज्या हे काम नीटपणे करु शकत नाही. चुका करतो, तर त्याला शिक्षा म्हणून सवर्ण गावकरी त्याच्या चाऱ्याच्या गंजीला आग लावतात. गावकऱ्यांच्या या कृत्याविरुध्द पेटून उठलेला तरुण रामज्याच्या धुसमटीचे सुरेख प्रतिकात्मक चित्रणही कांबळेनी केले आहे. अन्यायाविरुध्द पेटून उठणाऱ्या दलित तरुणाची छबी त्यात पहायला मिळते. 'वैरण' मधील गोजीच्या मनाची घालमेल अत्यंत समर्थपणे लेखकाने मांडली आहे. सुबाऱ्याच्या कामवासनेला आवरुन धरणारी 'गोजी' सात्विक मनाची आहे. म्हणून ती मन:स्थिती धुसमटून लपविते. कदाचित नवरा सुकदेव आपल्याला समजूनही घेणार नाही म्हणून धुसमटणारी परंतु पातिव्रत्याची प्रामाणिकता मांडणारी सरळ मनाची गोजी नवऱ्याच्या कुशीत मुक्तपणे रडते. ते चित्रण अत्यंत भावस्पर्शी आहे. 'पाटलाचा रेडा मेला' या कथेतही क्रांतिकारी विचार आहे. मेलेल्या ढोराचे मास खाणे हे पूर्वी दलितांचे जीवित होते. परंतु मेलेल्या विषारी ढोराचे मास महारा-मांगानी खाऊ नये म्हणून नवविचारी काशव्वा म्हतारी

अनामिक सामर्थ्याने बेधडकपणे प्रत्यक्ष ढोरच पेटवून देते. तेव्हा ती वाचकांसाठी अविस्मरणीय व क्रांतीकारी ठरते. 'इसोर' मध्येही आईवडिलांना शहरात आल्यानंतर आपण विसरून गेलो ही भावना कथानायकाला खूप त्रास देते. ही व्यथा अत्यंत मनोवेधक होते. धनाच्या अधिकतेने मनुष्य संशयी बनतो. बायकोच्या पावित्र्याचेही विडंबन करून स्वतः भ्रमीतावस्थेतच जीवन संपविणाऱ्या अमानुषतेचे चित्रण 'भडंग' मध्ये येते. तर स्त्री मुक्तीचा स्वर बुलंद करणारी घटना 'इंगा' मध्ये घडते. वेश्यांची कोठी चालवणाऱ्या बहिणीशी संघर्ष करून स्त्रीला मुक्त करणारा बंडखोर चंदू मनाला चटकन भावतो. तर 'इंगोड' मधील नवऱ्याच्या व्यभिचाराने हतबल झालेली 'आकनी' या स्त्रिची कथा आगळी-वेगळी आहे. एकीकडे नवऱ्याच्या बाईलवेडाला कंटाळलेली व दुसरीकडे त्यातच वेड लागून धुसमटणारी आकनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. परंतु 'गोंदण' ही कथा या संग्रहात थोडी निराळीच वाटते. प्राचीन कथांची आठवण करून देणारी ही कथा आहे. आपल्या अस्सल जीवनानुभूतीने अहंकारी धनिकालाही त्याच्या दृष्कृत्याबद्दल शिक्षा देणारा संन्यासी 'मिथक कथांची' आठवण करून देणारा आहे. कथेचे वातावरणही असंच चैतन्याने भारलेलं औत्सुक्य निर्माण करणारं आहे. अशा विविधांगी समृध्द अनुभवाने नटलेली 'गावकळा' सर्वांना आवडेल यात शंका नाही.

▲▲▲▲

# ‘गावकी’च्या जाणिवेत चळवळीचे भान

गावकी
रुस्तुम अचलखांब
श्रीविद्या प्रकाशन, पुणे- ३०
रु. २०/-



औरगांबादच्या मराठवाडा विद्यापीठात नाट्यशास्त्राने प्राध्यापक म्हणून काम करणाऱ्या प्रा. रुस्तुम अचलखांब यांचे ‘गावकी’ हे आत्मकथन म्हणजे गावातील दलितांच्या जीवनाचा वस्तुनिष्ठ आढावा आहे. भयंकर जातीय विषमतेचे चटके सोसलेल्या डॉ. आंबेडकरांनी आपल्या निद्रिस्त समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. त्यांनी भगवान बुध्द, महात्मा फुले आणि मार्क्स यांच्या विचारसरणीतून अशी एक विचारधारा निर्माण केली जी भारतीय समाज व्यवस्थेला पचणारी, पेलवणारी होती. जिला आपण ‘आंबेडकर वाद’ म्हणतो. या प्रेरणेने अंधाराच्या खोल गर्तेत आपल्या जीवनाची धन्यता मानणारा हा समाज खडबडून जागा झाला आणि तो आपली व्यथा-कथा अतिशय उत्कटतेने जसजशी समाजासमोर

येऊ लागली तसतशी भारतीय विषम समाजरचनेचे वास्तविकरुप प्रकट होऊ लागले. या संपूर्ण पार्श्वभूमीवर प्रा. अचलखांब यांचे 'गावकी' म्हणजे गावातील दलितांच्या जीवनाचे चलचित्रच होय. स्वतः नाट्यशास्त्राचे व्याख्याते असल्यामुळे आपल्या गत जीवनातील नाट्य मात्र त्यांनी अतिशय ठसठशीतपणे 'गावकी'त मांडले आहे.

'गावकी'त जवळपास पंचवीस वर्षाच्या आयुष्याची मांडणी आहे. ही मांडणी केवळ 'मी हे जीवन जगलो' म्हणून मांडलं आहे. असे नसून बाबासाहेबांनी दलितांच्या मुक्तीसाठी जो व्यापक उद्देष डोळ्यासमोर ठेवला होता त्याचे भान ठेवून केली आहे. आपला समाज हा बाबासाहेबांच्या जाती-वर्ण व्यवस्थेच्या लढ्याला समजून घेण्यास असमर्थ ठरतो आहे. याची खंत लेखकाला लागून राहिलेली आहे. सवर्णाप्रमाणे श्रेष्ठ कनिष्ठत्वाची विषवल्ली अस्पृश्यांमध्येही आहे. महारामध्ये साडेबारा जाती आहेत. त्या अशा सोमवंशी, लाडवण, आंधवण, तिळपण, बावने, झाडण्या, कोऱ्या, बलई, बनकर, आडकुळ्या, कटई, व्हलर आणि ढेऱ्या ही अर्धी जात. संख्येने कमी म्हणून ती अर्धी जात. या जातीत विवाह संबंधावरून आम्ही उच्च, तुम्ही कनिष्ठ ही भावना जोपासलेली दिसते. यातल्या कुठल्याही जातीतील माणसे एक दुसऱ्याशी बेटी व्यवहार करीत नाही. त्यांच्यात रोटी व्यवहार होतो. लेखकाला या गोष्टीची अतिशय चीड आलेली आहे. या प्रसंगाचे वर्णन करताना तो म्हणतो, 'या समद्यायच्या रोटी येवहार व्हतुया पर बेटी येवहार न्हाई व्हत. थोडी उदाहरणं सोडली तर आजबी हीच अवस्था पाह्यला मिळेल.'

'असं म्हणतात की बाबाच्या म्हागं त्यांच्या पक्षाचे जे तुकडे झाले ते या पोटजातीवरूनच. परत्येकानी आपापल्या जातीची माणसं जमा केली अन् आपला सवता सुभा उभा केला. येगयेगळ्या चुली मांडल्या. बाबानं या समद्यायला उकिरड्यावरून उचलून आणलं व्हतं. ह्ये परत तिथंच उकिरड्यावर गेले. बाबाच्या चळवळीचे या लोकांनी पार तीन तेरा वाजविले. समदे बाबाशी बेईमान झाले. [पृ. २९] आपल्या जातीचा अहंकार जोवर आपण टाकणार नाही तोवर खऱ्या अर्थाने मुक्ती या समाजाला मिळणार नाही.'

'गावकी'तलं सामाजिक जीवन अतिशय महत्वाचे आहे. ज्याप्रमाणे

व्यर्थ जात्याभिमान बाळगून अस्पृश्य आपलं नुकसान करून घेताहेत त्याप्रमाणे त्यांची व्यसनाधीनताही लेखकाला त्याच्या विकासातील अडथळा वाटतो. रोजच्या भूकेचा प्रश्न महाविकराल असूनही व्यसनाला प्राधान्य हा समाज देतो. या समाजाला दारिद्र्याशी सतत सामना करावा लागल्यामुळे मांस, ढोरांची सागुती हे त्यांच्या आवडीचे पदार्थ ठरले. ह्या पदार्थांना पचविण्यासाठी आणि त्याची लज्जत चाखण्यासाठी दारू गाळण्याच्या व्यवसायात ते अधिक खर्च करू लागले आणि अन्य जीवनातील महत्वपूर्ण बार्बीकडे दुर्लक्ष करू लागले, ह्या व्यसनाधीनतेमुळे हा समाज पार रसातळाला गेला, आपलं सत्व हरवून बसला.

'गावकी'त लेखकाने ग्रामीण जीवनाचे त्यातील बलुतेदारीचे व प्रामुख्याने महारांच्या येसकरकीचे चित्रण केलेले आहे. बलुतं मागणाऱ्या प्रमुख जाती, त्यांचे हिस्से, वाटप, गावकीची काठी बदलणे, त्याबद्दलची पध्दत, हाडकी, हाडवळा, महारांची कामे, त्यांच्या जाती, त्यांचे परस्पर संबंधाची तपशिलवार चित्रण केलेले आहे. 'गावकी'ची काठी दरवर्षी बदलायचा सोहळा होत असे. या गावकीत अनेक कामे असत. त्यात कामाला बोलावणे करणे, मयताच्या नातेवाईकांना निरोप पोहचवणे, सामान वाहणे, प्रेतासाठी लाकडे फोडणे, इ. अनेक कामे असत. गावाची सारी व्यवस्था ही बलुतेदारीवर आधारित होती. या पध्दतीमुळे खळ्यातील धान्य सर्वात शेवटी मिळे व वर्षभर पुरेल इतकेही मिळत नसे. त्यामुळे शेवटी या समाजावर गावात रोज घरोघरी फिरून शिळे अन्न-भाकऱ्या गोळा करून उदरनिर्वाह करावा लागे. आश्चर्य म्हणजे शिळ्या भाकरीच्या कुटक्यांची त्यांच्याच साडेबारा जातीतील श्रेष्ठ-कनिष्ठतेवर विभागणी होई. या गावकीत वेगवेगळ्या तक्षम्यांचे वर्णन आहे. तक्षम्या म्हणजे वेगवेगळ्या आडनावांची भावकी होय. लेखकाने वर्णिलेल्या तक्षिम्या महारवाड्यात चार होत्या. त्यात अचलखांब, खंदळे, लहाने, जाधव याच प्रमाणे अनेक सामाजिक चालीरितीचेही चित्रण 'गावकी'त आहे. उदा. 'गंधराव' पध्दत यात स्त्रीचे पहिले लग्न झाले असेल व पती निधनानंतर किंवा पतीने सोडल्यानंतर तिने लग्न केले असेल तर ह्या लग्नाला 'गंधराव' म्हणायचे. या संबंधीचे अत्यंत सूक्ष्म वर्णन लेखकाने केले आहे. [पृ. ७] याच प्रमाणे 'गावकी'तली पंचायत ही महत्वपूवर्ण आहे. महारांवया जात

पंचायतीत मेहेतरे, चौगुले, पाडेवार, येसकर हे घटक असतात. या पंचायतीमध्ये एकमेकांच्या उखळ्या-पाखळ्या काढायचे. खूप भांडणे व्हायची. मेहतर हे परगन्याचे प्रमुख व पंचायतीत त्यांचा शब्द शेवटचा. गावा-गणिक चौगुल्यांची नियुक्ती मेहतर करतात. आणि असली कोण व कडूचा कोण याची माहिती ठेवण्याचे कार्य त्यांना करावे लागते. चौगुल्यांच्या हाताखाली गावगणिक पाडीवार असतात व ते पाटलास मदत करतात. येसकर हा गावातलाच असतो. ज्याच्याकडे गावकीची काठी असते तो 'येसकर' असतो व त्याला गावात भिक्षेचा अधिकार असतो. [पृ. २०]

या प्रमाणे 'गावकी'त अस्पृश्य समाजाचे गावातील जीवन विविधांगाने चित्रित झाले आहे. या आत्मकथनाचे वैशिष्ट्य म्हणजे यातल्या चित्रित झालेल्या व्यक्तिरेखा ह्या खूप पुसट आहेत. पण घटनांचे चित्रण ठळक आहे. अतिशय निर्भिडपणे लिहिलेल्या आत्मकथनात स्वतःच्या समाजावर होणाऱ्या अन्यायाची खंत तर आहेच, परंतु हाच समाज जेव्हा सवर्णाप्रमाणे आपापल्या जातीयता मानतांना दिसतो तेव्हा लेखकाला मनस्वी दुःख होते. त्यांच्या दुःखाचा भाव व जाण ही केवळ आपल्या समाजापुरतीच नाही तर ती संपूर्ण शोषित, अन्यायगस्त असणाऱ्या मानवाच्या मुक्तीची आणि आंबेडकरी चळवळीची आहे.

▲▲▲▲

# अधांतरी जीवन– व्यथेचा खोल सुरूंग

निबंध ३५६६
प्रा. क्र. २७७०६
८।११०४

मुस्लीम महार इब्राहीमखान
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
मूल्य रु. २८/-.



श्री. इब्राहिम खान यांचे 'मुस्लीम महार' हे पुस्तक म्हणजे त्यांची आत्मकथा आहे. या आत्मकथेचा मुख्य उद्देश म्हणजे धर्मबदलाने त्यांच्या व त्यांच्या परिवाराच्या जीवनाची झालेली परवड दाखविणे हा आहे. धर्मबदलाने त्यांची झालेली अधांतरी अवस्था पुन्हा एकदा धर्मपरिवर्तनाच्या संदर्भात विचार करायला पवृत्त करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या वेळी हिंदू धर्म सोडून बौध्द धर्म स्वीकारायचा निर्णय घेतला त्यावेळी त्यांचा उद्देश पस्थापित समाज व्यवस्थेवर घाव घालण्याचा होता. एके ठिकाणी ते म्हणतात की, ''जगातील सर्व भागात द्ररिद्री माणसे शोषणाविरूध्द बंड करून उठतात, पस्थापिताविरूध्द विद्रोहाची भूमिका घेतात. असे घडणे इतिहासाचा सहजधर्म आहे.'' देव कल्पना प्रभावी असलेल्या युगात

दीनदुबळ्यांना वाटते देव अवतार घेईल व सारे ठीक होईल. आधुनिक निधर्मी युगात रंजल्या गांजलेल्यांना वाटते की ऐतिहासिक भौतिहासिक वादानुसार शोषकांची ताकद संपेल व शोषितांचे राज्य उदयाला येईल. मला वाटते की या दोन्ही गोष्टी घडून येणार नाहीत म्हणून येथील प्रस्थापित समाजव्यस्था नव्या मूल्यांवर अधिष्ठित करायची असेल तर या व्यवस्थेवर सतत घाव घालीत राहिले पाहिजे आणि हिंदू मानसिकतेपासून मुक्त होऊन स्वतंत्र विवेकबुध्दीची कास धरली पाहिजे. अर्थात् स्वतंत्र विवेकबुध्दीची कास ही तेव्हाच स्वीकारली जाऊ शकेल जेव्हा आपण वैज्ञानिक सत्याला गहण करतो. बाबासाहेबांना वैज्ञानिक सत्याला गहण करणारा, स्वतंत्र विवेकबुध्दीची कास धरणारा बुध्दीप्रामाण्यवादी धर्मच स्वीकारायचा होता. परंतु हे करत असतांना त्यांना प्रस्थापित समाज व्यवस्थेला शह द्यायचा होता तद्नंतर विज्ञानवादी, समतावादी धर्माची मुहूर्तमेढ करायची होती. त्यांच्या मनातील कल्पनेला साकार करण्यासाठी फक्त बौध्दधर्म उरला होता. म्हणून त्यांनी प्रथम बौध्द धर्म स्वीकारला. परंतु त्यांच्या दूरदृष्टीला समजावून न घेता अनेक निष्फळ वाद मात्र होत राहिलेत. मार्क्स्‌चीही धारणा हीच होती त्यांच्या मते धर्माने घेतलेली दुर्दशा ही त्याच वेळी खऱ्या जीवनातील दुर्दशेचा आविष्कार असतो आणि तो खऱ्या दुर्दशेविरूध्द व्यक्त झालेला निषेधही असतो. धर्म ही लोकांची अफू असते. त्याने सांगितलेली ही वस्तूस्थिती फार महत्वाची आहे. धर्म आणि देवाच्या निर्मितीनंतरही माणसाला सुख मिळाले नाही कारण त्यांचे दुःख इथल्या सामाजिक व आर्थिक आणि राजकीय परिस्थितीतून जन्माला आलेले आहे. धर्माने माणसांना या परिस्थितीची विस्मृती होण्याइतपत गुंगी आणलेली आहे. माणसाला काल्पनिक सुख देण्याचे जे सामर्थ्य धर्माजवळ आहे त्याकडे मार्क्सने कधीच दुर्लक्ष केलेले नाही. म्हणून तर तो म्हणतो, 'जो धर्म माणसाला काल्पनिक सुख देतो तो नष्ट करणे म्हणजे माणसाच्या खऱ्या सुखाची मागणी करणे होय.'' ज्या समाज परिस्थितीत या काल्पनिक सुखाची दुःखी मानवप्राण्यांना गरज वाटते ती समाज परिस्थितीच नाकारण्यास सिध्द होणे होय. म्हणून धर्मचिकित्सा ही धर्म ज्या दुःखीतांच्या जगाचे आकर्षण असते अशा जगाच्या चिकित्सेचाच आरंभ बिंदू असते. थोडक्यात काल्पनिक सुख देणाऱ्या, गुंगी आणणाऱ्या धर्माला त्यातून

समतावादी आणि वैज्ञानिक सत्य स्वीकारणाऱ्या मानवधर्माचा स्वीकार करण्यास तो सांगतो या प्रमाणे मार्क्स आणि आंबेडकर या दोन्ही महापुरूषांना विज्ञाननिष्ठ सत्य अतिशय जवळचे होते. किंबहुना हे सत्य स्वीकारल्याशिवाय खऱ्या अर्थाने समानता निर्माण हो्ऊ शकणार नाही असे त्यांना वाटत होते. या कल्पनेने भारलेल्या डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरामागील हेतू नीट समजावून घेणे आवश्यक आहे.

श्री. इब्राहीम खान यांच्या आजोबांनी १९३५ ची डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा ऐकून थोड्या दिवसात लगेचच धर्मांतर केले. त्यावेळी डॉ. आंबेडकर मुस्लीम धर्म स्वीकारण्याच्या मन:स्थितीत होते. परंतु त्यांनी निश्चित कोणता धर्म स्वीकारावयाचा या बाबतीत निर्णय दिलेला नव्हता. परंतु धर्मांतर केल्याने आपल्याला शोषित आणि अन्यायगस्त जीवन जगावे लागणार नाही असे समजून श्री. इब्राहीम खान यांच्या आजोबांनी मुस्लीम धर्मात प्रवेश केला. परंतु संपूर्ण हयात उलटून गेल्यावरही त्यांना न्याय मात्र मिळाला नाही. ते मेल्यानंतर त्यांच्या मयतीला बोलावूनही एक मुसलमान आला नाही. आयुष्यभर ज्या माणसाने मुस्लीम धर्मग्रंथ वाचले, जो जीवनभर मुस्लिमांमध्ये मिळून-मिसळून राहिला त्याला मुस्लीम खांदा का देऊ शकले नाहीत हा लेखकाला पडलेला प्रश्न आहे. त्यांना वाटते की, धर्मांतरीत झाल्याने आपले कुठलेही प्रश्न सुटलेले नाहीत. उलट आपली अवस्था अधांतरी झाली आहे. तो म्हणतो की, 'महार म्हणून जगलो असतो तर अस्पृश्यतेचा जाच वाट्याला आला असता. बौध्द झालो असतो तर तरी दलितच राहिलो असतो, म्हणून मुस्लीम झालो.' पण मुसलमानांनी पूर्ण स्वीकारलेले नाही. एका विशिष्ट मानसिकतेने आमचा छळ केला. हे जगणं म्हणजे 'धोबी का कुत्ता न घर का, ना घाट का.' लेखकाला या जगण्याची मनस्वी चीड आली आणि ते हे आत्मकथन लिहायला प्रवृत्त झाले. आत्मकथन लिहितांना दलित साहित्यिकांच्या आत्मकथनांची प्रेरणा निश्चितच मार्गदर्शक ठरली आहे.

हरिभाऊ खाकसे हे लेखकाचे आजोबा पेशाने शिक्षक हिंदू धर्मात सारे ग्रंथ वाचलेले. वेदांचाही अभ्यास केलेला इतकेच नाही तर ज्योतिष पंचागांचेही अध्ययन केलेलं. आपल्या बुध्दीच्या बळावर बरेच प्रश्न त्यांनी धसास लावले. पण जातीयतेची दरी त्यांना दूर करता आली नाही. त्याला

तडा द्यावा म्हणून डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणमार्गाने त्यांनी 'मुस्लीम धर्म' स्वीकारला. जातीयतेचा प्रश्न धसास लागलाच नाही. कारण प्रश्न निर्माण झालेत. मुलाच्या लग्नात कुणीही मुसलमानाने मुलगी दिली नाही तेव्हा महाराचीच मुलगी करावी लागली. अब्दुल रहेमानचा मुलगा इलाहिबक्षलाही हा अनुभव सातत्याने येत राहिला. गावकरी त्यांना म्हणत, "मास्तर कोळसा कितीही उगळला तरी काळाच राहतो." तुम्ही महार आहात हे आम्हाला माहित झाले तेव्हा ही खोली सोडा. इतकेच नाही तर बौध्द धर्म स्वीकारलेले रंगारी मास्तरांना ते महार आहेत म्हणून इतरांपेक्षा वेगळीच वागणूक दिली गेली. दिवाकर मोहोडलाही महार म्हणून प्रार्थनास्थळी प्रवेश नव्हता. लेखकाला सातत्याने हे जाणवत राहिले की धर्मांतराने जातियतेचे, अस्पृश्यतेचे प्रश्न सुटत नाही. आपले अस्तित्व या धर्माच्या झुंडशाहीत काय आहे? "दिवसभर खोपा सोडून चरायला गेलेल्या पाखरास तरी खोपा माहित असतो. पण आपले घरटे कोणते?" अशा अनेक प्रश्नांची मालिका तयार होत राहिली. शेवटी आपण आपले नाव बदलावे या निर्णयाप्रत ते आले. परंतु नाव बदलून इतिहास पुसला जात नाही. त्यासाठी कृतीशीलतेची कसोटीच खरी ठरते. या विचारांची प्रेरणाही डॉ. आंबेडकर होते. आंबेडकर म्हणतात, हा जळजळीत इतिहास नाव बदलवून पुसला जावू शकत नाही. इथल्या भयानक समाजरचनेतून, जातिभेदातून, विषमतेतून तुमच्या पूर्वजनांना आणि त्यान्वये तुम्हालाही जे आजवर धगधगीत जीवन कंठावयास लावले ते जगाळच्या अक्षरांनी लिहिलेले पेटते सत्य आहे. ते अजूनही विझलेले नाही. ती विषमता, ती जातिव्यवस्था, तो अत्याचार, तो अन्याय अजूनही समाजात पावलोपावली प्रत्ययास येत आहे. म्हणून आजच्या समाजरचनेविरुध्द दंड थोपटणे ही आजच्या काळाची गरज आहे. आणि नंतर कधी तरी समानतेची पताका फडकलेली आढळल्यावर माणसामाणसातील भेद मिटल्यावर तिथे आज तुम्ही करीत असलेला विचार चौकसपणे करावा. ती वेळ आपल्या आयुष्याच्या कालमर्यादेमध्ये आली तर आपण खरोखरच भाग्यवान असू. नाहीतर आपल्या पिढ्यातील वंशज कधीतरी ती वेळ भोगतीलच भोगतील असा माझा आत्मविश्वास आहे. म्हणून तुम्ही कृतिशीलतेतून प्रतिक्षेत असण्यास काय हरकत आहे? हे विचार वाचून लेखकाच्या भूमिकेत बदल

झाला. 'पेटलेल्या निखाऱ्यां'चे संदर्भ असलेले 'इब्राहिम खा' हे नाव आहे. याला निष्कारण संकुचित करू नये. नाव बदलण्याचा विचार लेखकाने सोडला. प्रत्यक्ष कृतीशीलतेचा मंत्र घेऊन लेखक नोकरीसाठी भटकू लागला. जातीवादामुळे नोकरीसाठी अडवतात याचेही अनुभव त्यांना येऊ लागले. तेव्हा लेखकाचा सात्विक क्रोध उफाळून आला. एकेठिकाणी तो म्हणतो, 'बाबासाहेब आंबेडकरांनी मिळवून दिलेल्या सवलतीवर मोठे होऊन हे अधिकारी कसे माजलेत याचा मला भयानक संताप आला.' [पृ. ४७] हा संताप जागोजागी आढळतो. 'शेतकरी संघटनेचे नेतृत्व करणारे कसाई जवळून पाहता आले. व्यवसाय करून लीडरकी शौक म्हणून करणाऱ्या चोदाक समजसेविका पाहिल्या.' [पृ ५९] स्वतःच्या लीडरशीपसाठी गरिबांची इज्जत घेणारे दलितातले चित्तेही पाहिले. [पृ. ५९]

पुस्तकाच्या आशयाचा संबंध पाहता हे पुस्तक धर्मांतराच्या प्रश्नावर निश्चित विचार करायला लावणारे आहे. मानवी जीवनात धर्माची आवश्यकता आहे काय? या संबंधीही विचार करायला प्रवृत्त करते: हा आशय या पुस्तकाचे बलस्थान आहे, तर अनेक त्रुटीही आहेत. अनेक प्रसंग वर्णन लेखकाने टाळलेली आहेत. घटनांचा व्यवस्थित क्रमही लावलेला नाही. भाषेकडे दुर्लक्ष झाल्यामुळे हे आत्मकथन वाचनीय ठरण्यास असमर्थ आहे. कदाचित् विचारांच्या घाईगर्दीमुळे अभिव्यक्तीस मर्यादा पडलेल्या आहेत. तरीही आशय संपन्नतेमुळे विचार प्रवण करण्याच्यादृष्टीने हे आत्मकथन सामाजिक विषमतेच्या लढाईत महत्वाचे ठरणार आहे.

▲▲▲▲

# दलित स्वकथनांचे पाथेय

दलित स्वकथने : साहित्यरुप
डॉ. आरती कुसरे- कुलकर्णी
विजय प्रकाशन, नागपूर.



डॉ. आंबेडकरांची विचार प्रणाली हा दलित साहित्यामागील मुख्य प्रेरणास्त्रोत आहे. दलितांना त्यांच्या जीवनातील प्रखर वास्तवाची जाणीव करून देणाऱ्या व दलित जातीत जन्माला आलेल्या डॉ. आंबेडकरांसारख्या विद्वान महापुरुषाने आपल्या विचार आणि प्रचाराने स्वसमाजाचे आत्ममान जागृत केले. केवळ डॉ. आंबेडकरांच्या नव्हे तर भगवान् बुध्द यांचे बौध्द तत्वज्ञान, मार्क्सवादी विचारप्रणाली, महात्मा ज्योतिबा फुले यांची विचारप्रणाली या दलित साहित्यामागील प्रेरणास्त्रोत आहेत, बौध्द विचार हा सामाजिक क्रांतीचा आणि परिवर्तनाचा विचार असल्यामुळे दलितांमध्ये क्रांतीची जाणीव फार मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. किंबहुना तो एक जीवनमार्ग ठरला. कारण त्यात व्यक्तीचे स्वातंत्र्य, शांती, अहिंसा आणि सत्य या तत्वांचा पुरस्कार केला गेलेला

आहे. मार्क्सवादी विचार प्रणालीने सुध्दा दलित साहित्यिक प्रभावित झालेत. कारण आर्थिक शोषणाला बळी पडणाऱ्या दलित वर्गाला तो मुक्तीचा मार्ग वाटला. म्हणून दलित साहित्यातून आढळून येणारा नकार आणि विद्रोह म्हणजे मार्क्सच्या आदर्श समाज व्यवस्थेच्या कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी चालविलेल्या संघर्षाची प्रधान सूत्रे होती. महात्मा फुल्यांना डॉ. आंबेडकर गुरुस्थानी मानतात. आंबेडकरांच्या विचारसरणीमध्ये महात्मा फुल्यांची विचारसरणी अनुस्यूत असल्यामुळे म. फुले यांच्या विचारांचे स्वतंत्र अस्तित्व दलित साहित्यातून स्पष्टपणे जाणवत नसले तरी म. फुल्यांच्या विचारांना व कार्याला पुढे नेण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी केले आहे.

या सर्वांच्या विचार प्रणालीतून दलित साहित्य जन्माला आले. परंतु आंबेडकरवाद त्यांचा खरा पथ प्रदर्शक ठरला. समाजातील अन्याय, विषमता, मूळ परिस्थिती पोसणाऱ्या प्रवृत्तीवर प्रहार करून माणसाला माणूसपणाची प्रतिष्ठा व हक्क मिळवून देऊ इच्छिणाऱ्या वर्णजातीय समाजव्यवस्थेला तोडून नवी समाजरचना आणि मानवतेची प्रस्थापना करू पाहणाऱ्या आजच्या दलित चळवळीला बंड, विद्रोह नकारादी लाभलेली प्रेरक तत्वे प्रसृत करणारे एकूण आंबेडकरी विचारदर्शन म्हणजे आंबेडकर वाद होय. डॉ. योगेंद्र मेश्राम म्हणतात की, आंबेडकरपूर्व दलित समाज आणि आंबेडकरकालीन व आंबेडकरोत्तर आजच्या दलित समाज, समाजाच्या ह्या दोन अवस्थांतराला कारण ठरलेले जे संपूर्ण कार्यतत्व, तत्वज्ञान किंवा विचार प्रणाली म्हणजे आंबेडकरवाद होय. ही आंबेडकरवादी प्रेरणा स्वीकारून आजचे दलित साहित्य निर्माण झाले. जे मुख्यतः जीवनवादी आहे. ही जीवनवादी भूमिका जशी प्रभावी होत जाईल त्या त्या प्रमाणात दलित साहित्याला अधिकाधिक बहर येत जाईत यात शंका नाही.

या पार्श्वभूमीवर डॉ. आरती कुसरे कुलकर्णी यांचे 'दलित स्वकथने : साहित्य रुप' हे पूस्तक मराठी वाड.मय विश्वात वेगळी वाट शोधणारे वैशिष्ट्यपूवर्ण पुस्तक आहे. दलित लेखकांनी त्यांच्या जीवनकथा सांगताना कुणी आत्मकथन म्हणतो कुणी कादंबरी म्हणतो पण दलितांची ही गाजलेली आत्मकथने 'आत्मकथा' या वाड.मयीन रूपात बसू शकत

नाहीत. तर त्यांचा म्हणून एक खास असा वेगळाच साहित्य प्रकार आहे आणि तो म्हणजे स्वकथनांचा डॉ. आरती कुळकर्णी यांनी आपल्या पुस्तकात तो पुराव्यानिशी सिध्द केला आहे. वाङ्.मयीन व्यवहारातील सिध्दांत व वाङ्.मयीन रूप कधीही स्थिर राहू शकत नाही. एखादा अनुभव विशिष्ट वाङ्.मयीन रूपात अभिव्यक्त होऊ शकत नाही तेव्हा वाङ.मय प्रकाराची संकेत व्यवस्था झुगारून तो अनुभव एक नवे वाङ्.मय रुप सिध्द करतो आणि लेखकाच्या अनुभवाच्या या पडझडीवरच वाङ्.मय रुपाचे अस्तित्व अवलंबून असते. या पार्श्वभूमीवर लेखिकेने शोधलेले नवे वाङ्.मयरूप आत्मकथनाची प्रतिक्रिया नसून आठवणी आणि आत्मचरित्र या साहित्य रुपाचे नवे उत्क्रांत रुप आहे.

आत्मकथेपासून वेगळेपण सिध्द करणारे दलित स्वकथनांचे खास वैशिष्ट्ये आहेत. सर्व प्रथम दलित स्वकथनकारांची भूमिकाच 'आत्मकथन' कारापेक्षा वेगळी आहे. त्यांना आत्मचरित्राप्रमाणे आपल्या व्यक्तिमत्वाचा आलेख स्वकथनात मांडायचा नव्हता तर त्यांच्या जातीची समाजाची वस्तुस्थिती डोळसपणे आपल्या साहित्य कृतीत साकार करायची आहेत. दुसरे म्हणजे आत्मचरित्रकारांचा हेतू वाचकांना भारावून टाकण्याचा व आत्मसुख घेण्याचा असतो किंबहुना स्वतःची स्मृती सजीव करण्याचाही असतो. पण स्वकथन लिहिणाऱ्यांचा हेतू मूख्यतः अस्मितेच्या शोधासह समाज व्यवस्थेत स्थान निर्माण करून मानव मुक्तीच्या दिशेने समाज परिवर्तन करण्याचा असतो. तिसरी गोष्ट म्हणजे स्वकथनात स्वतःच्या जीवन कहाणीला अधिक प्राधान्य असते. तसेच आत्मकथनात विशिष्ठ व्यक्तीचे चरित्र असते. पण स्वकथनात व्यक्तीचे आत्मचरित्र अधिक त्याच्या जातीचे चरित्र असते. चौथी गोष्ट म्हणजे आत्मकथनात 'मी' चा साक्षी 'मी'च असतो. त्यामुळे आत्मचरित्रातील सत्य संशयास्पद ठरु शकते. पण 'स्वकथना' मध्ये 'मी'च्या कथनाचा साक्षी समाज असतो. समाज वास्तवाचा शोध घेऊन 'मी' च्या कथनातील सत्य पडताळता येते. म्हणून आत्मचरित्रातील सत्यापेक्षा स्वकथनातील सत्य वस्तुनिष्ठ असते. कारण ते समाजलक्षी असते. त्याचपमाणे पांजळ निवेदनासह सामाजिकता, विदोही पवृत्ती व आत्मनिष्ठेसह वस्तुनिष्ठता असते.

या पुस्तकाचे वैशिष्ट म्हणजे शोध कार्याची सर्व शिस्त पाळून, दलित

साहित्याच्या क्रांतिकारकत्वाला कुठेही तडा न जाऊ देता नवीन साहित्यरूपाच्या प्रकटीकरणाची आवश्यकता समजावून सांगितली गेली आहे. समतोल विवेचन, सप्रमाण मांडणी, तर्कशुध्द भूमिका या वैशिष्ट्यांसह नवा वाङ्.मयीन पकार शोधणारा कांतीकारी निष्कर्ष हे या गंथाचे मुख्य भूषण आहे. दलितांच्या संपूर्ण मुक्तीचे ध्येय समोर ठेऊन त्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करणारे अनेक दलित साहित्यिक उदयास येताहेत म्हणून दलित स्वकथनांना फार मोठे भवितव्य आहे. दलित स्वकथनांचे हे पाथेय दलित मुक्तीच्या प्रदीर्घ यात्रेत सर्वांना उपयोगी पडणार आहे.

▲▲▲▲

# अभावग्रस्त समाजाची सामाजिकता

गवाळ
दादासाहेब मल्हारी मोरे
श्रीविद्या प्रकाशन, पुणे- ३०
मूल्य रु. ३५/-



साहित्य हा समाजाचा आरसा असतो. दलित साहित्यांच्या उदयाने समाजाचं खरंखुर चित्र आपल्यापुढे उभे राहिले आहे. तरीही दलित साहित्याने मराठी साहित्याला काय दिले? असा प्रश्न विचारणारे अनेक महाभाग आहेत. याला उत्तर देतांना एके ठिकाणी भालचंद्र नेमाडे असे म्हणाले होते की, 'दलित साहित्यानं मराठीला भाषिक समृध्दी प्राप्त करून दिली. आपल्या परंपरेत दबलेला एक शुद्रत्वाचा अविष्कार करणारा पदर स्पष्ट केला. आविष्काराचं स्वातंत्र्य ही राजकीय समाजाची बाब आहे हे सिध्द केलं. प्रत्येक समुहाला, घटकाला साहित्यात मानाचं स्थान असावं हे दाखविलं. मराठीत तुंबलेल्या अतिरिक्त व्यक्तिवादाला हा उत्तम उतारा ठरला.' त्यांच्या या कथनाची पचिती वारंवार साहित्याचे अध्ययन करताना आपल्याला होते. समाजातील मनुष्याचे जीवनाचे

इतके विविध आणि इतके आश्चर्यकारक विभाजन बघतांना वाचतांना नाविन्य भलेहि वाटत असेल परंतु मनुष्य विचारपवृत मात्र निश्चितच होतो. याचं श्रेय त्या महापुरुषांना आहे. ज्यांनी या विषमतेच्या तटबंदिला सुरुंग लावून समानतेची चळवळ सुरु केली. या महापुरुषात डॉ. आंबेडकरांचे स्थान अत्यंत उच्च आहे. त्यांच्या विचार व कार्याने प्रभावित केवळ फक्त दलित समाजाच झाला नाही, तर तो समाजही झाला जो अन्यायाच्या गर्तेत खिचपत पडलेला होता.

या प्रेरणेनेच पुढे आलेले 'गबाळ' या आत्मकथनाचे लेखक श्री. दादासाहेब मल्हारी मोरे त्यांच्या या आत्मकथनांत पिंगळा जोशी या भटक्या जमातीचं चित्रण आहे. या भटक्या जमातीतील दुःख जेव्हा लेखकाला कळायला लागलं तेव्हा त्याने हे आत्मकथन लिहायलं घेतलं. या आत्मकथनाच्या सुरुवातीलाच लेखक म्हणतो की, मला जेव्हापासून समजायला लागलं तेव्हापासूनच मी ज्या जमातीत जन्माला आलो त्या भटक्या जातीचे दुःख, त्यांची समाजात होत असलेली उपेक्षा, त्यांचं जीवन मी आपल्या समोर उभे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. [पृ. १]

भटक्यांमध्ये सुध्दा अनेक जमाती आहेत ज्या गावागावावर अवलंबून असतात. यामध्ये फासे पारधी, गधेकरी, नंदीबैलवाले, माकडवाले, कुडमुडे जोशी, इ. जमाती आहेत. छोटे-मोठे काम करून, भिक्षा मागून भविष्य सांगून ह्या जमाती आपलं पोट भरत असतात. पिंगळा जोशी ही अन्य भटक्या जाती प्रमाणेच खोटे नाटे भविष्य सांगून त्यावर पोट भरणारी आणि त्यासाठी घोडयावर संसार लादून गावोगावी भीक मागत फिरणारी जमात आहे. लेखक स्वतः या जमातीतला असून शिक्षण घेण्याचा प्रयत्न संयमपूर्वक करतांना दिसतो. आपल्या शैक्षणिक प्रगतीच्या प्रवासाबरोबरच लेखक आपला जीवन प्रवास व आपल्या जमातीच्या जडण घडणीचा प्रवास वर्णन करतो. या जमातीतील लोक ज्या ज्या गावी जातात त्या त्या गावी माळरानावर काठ्यांवर पोती टाकून आपलं घर तयार करतात. ज्याला 'पाल' म्हणतात. यांच्या जवळच्या घोड्यांवर आपली बिऱ्हाड बांधून ज्याला लेखकाने 'गबाळ' म्हटलं आहे. मजल दरमजल करीत ज्या गावात पोट भरण्याची व्यवस्था होईल तेथे मुक्काम करतात व त्यालाच आपलं गाव मानतात. उपजिविकेची यांची दोन प्रमुख साधनं म्हणजे भीक्षेची

हाडप म्हणजे झोळी. दुसरे म्हणजे पंचांग एक तर भिक्षा मागायची नाही तर जग चालगया....... लक्ष्मी पावतीया...... द्वंद्ववाढतंया...... मिळेतया.......... अशा भूलथापा ठोकून म्हणजे भविष्य सांगून दिवस कंठणे ती यांची उपतीविका. कधी हे मासे पकडतात, यांच्या स्त्रिया लीद, शेण गोळा करून चुल्हा पेटवतात. फावल्या वेळेत सुई, दोरा, फण्या, कुंकू, मणी असे जुजबी सामान विकून दोन पैसे कमवतात. माणसातील काही 'नराधम' यांच्या अडचणींचा फायदाही घेतात. परंतु प्रतिष्ठित जीवन जगण्याचीही इच्छाशक्ती या समाजा जवळ नाही.

एवढं दरिद्री जीवन असूनही ही मंडळी सण मात्र अत्यंत उत्साहाने साजरा करतात. अगदी भल्या पहाटे उठून डोक्याला चिंध्यांचा पटका बांधून हातात 'भांबा' म्हणजे कुडमुड्यांचे वाद्य घेतात. सोबत पंचांग असते. भांबा वाजवत गावातून हिंडायचे. कोणाच्या दारी उभे राहून तोंडाला येईल ते बडबडायचे. इतर समाज जो अंधश्रध्देच्या आहारी नेहमीच गेलेला असतो त्यास वाटते की पिगळा पक्षी पहाटे बोलतो व त्यांची भाषा या समाजाला कळते. लेखक आपलं मत मांडताना म्हणतो की, 'तो पिंगळा पक्षी कशाला जगाच्या दुःखाची काळजी करीत बसेल?' हे देखील. सत्य आहे की, आमच्या जमातीमधील प्रत्येक माणसाला माहित आहे की, पिंगळा आपल्याशी बोलत नाही, की आपल्याला त्याची भाषा समजत नाही. भिकाऱ्या भिकाऱ्यांनी ते पाखरु कोठे दिसत देखील नाही. पहाटे कोठे दिसणार तो पक्षी! [पृष्ठ १६] थोडक्यात पिंगळा पक्षी त्यांच्या जगण्याचे एक साधन आहे.

पोट हातावर घेऊन फिरणारी जमात असूनही तिची स्वतंत्र न्यायव्यवस्था आहे. आधुनिक जगातले कायदे त्यांना लागू नाहीत. विवाहसुध्दा त्यांच्या पंचायतीने आखून दिलेल्या पध्दतीप्रमाणेच होतात. त्याप्रमाणे जर झाले नाहीत तर 'दांडी' किंवा 'मांडी' ही जमातीची कायदे कलम लागू होतात. दांडी कलमानुसार शंभर रुपये, तर मांडी कलमानुसार एकशे पन्नास रुपये दंड केला जातो. या आत्मकथनात एक घटना या संदर्भात महत्वाची आहे. कृष्णा शिंदेचा मुलगा केशव आणि राजाराम कोडराव यांची मुलगी बकुळ यांच्या प्रेमाचे रुपांतर विवाहात होतांना कृष्णा शिंदेला जातीत घ्यायचे की वाळीत टाकायचे की दंड करायचा हे समाजाचे

न्यायाधीश बाबुराव मोरे ज्यांचे शिक्षण फक्त सातवीपर्यंत झालेले आहे ते ठरवतात. याशिवाय मंगळवेढा तालुक्यातील नराळ आणि बावची ह्या गावचे न्यायाधीश ही यात सामील होतात. बाबू मास्तर कायद्याच्या बाजूने हा विवाह योग्य असल्याचे सांगतात. पण गोंधळवाडीचे सुर्वे सांगतात, 'कायद्यानं आजपातून आपली जमात आल्याची न्हाय.... कायद्याचा आदार घ्यायचा अशील तर आमची जरुरत नाय.... त्येचा आणि आमचा काय सुदीक समद न्हाय........ आमल्या जातीच्या नियमाप्रमाणे हुयाला पायजी.' [पृष्ठ १६६]

सर्व पंचांच्या या निर्णयानुसार बहिष्काराच्या गोष्टी होतात. शेवटी मांडी कलम लावून कृष्णा शिंदे यांना जातीत घेतले जाते अशा या जमातीत परिवर्तन कधी होणार.

सर्व प्रगत, अप्रगत जाती-जमातीप्रमाणे धर्मासंबंधी कर्मकांडाचा प्रादुर्भाव यांच्यातही आहे. या धर्म उत्सवात वाजवीपेक्षा, कुवतीपेक्षा अधिक धन खर्च करून ते बकरे, कोंबडे मारणे आदी कर्मकांडही करतातच. आषाढात बावचीला मरगमा मायीची होणारी जत्रा व त्यानंतरही पाल जत्रा हा त्यांच्या धार्मिक जीवनातील महत्वाचा भाग आहे. अशा तऱ्हेने 'गबाळ' या आत्मकथनातील समाजाच्या विकासाच्या दृष्टीने काही प्रयत्न अद्याप झालेले नाहीत. शिक्षणाची गंगा यांच्या हृदयापर्यंत पोचल्याशिवाय परिवर्तन अशक्य आहे. केवळ आर्थिक पाठबळ देऊन यांना पारंपारिक मानसिकतेतून आधुनिक मानसिकतेत आणण्यासाठी आमूलाग्र परिवर्तनवादी चळवळीची आवश्यकता आहे. 'गबाळ' द्वारा लेखकाला निव्वळ या समाजाचे वेगळे सामाजिक स्थान काय आहे हेच दाखवायचे असावे. कारण त्या व्यतिरिक्त कुठलेही भाष्य करतांना लेखक दिसत नाहीत. केवळ या समाजाच्या भटकंतीचा आढावा मांडताना ते दिसतात.

▲▲▲▲

# सरळ रेषेतील आकर्षक जीवन प्रवास

माऱ्हुडा
पा. उ. जाधव
मिलींद प्रकाशन, वसारी
पो. तिवळा, ता. मालेगाव, जि. अकोला
मूल्य रु. ३०/-



माणूस जोपर्यंत मोठा होत नाही तोपर्यंत तो स्वत:पेक्षाही जगालाच अधिक महत्व देतो. या जगाकडे त्यातील व्यकर्तींकडे आणि व्यवहाराकडे कुतुहलाने पाहतो. प्रा. वा. ल. कुलकर्णींनी दलित लेखकांसबंधीचे काढलेले हे उद्गार केव्हातरी वाचनात येऊन गेलेत. दलित लेखकांच्या आत्मकथनांचा विचार करताना त्यांचे हे विचार अतिशय समर्पक वाटतात. भारतीय समाज जीवनातील विषमतेचे चटके सहन करीपर्यंत डॉ. आंबेडकरांची हीच स्थिती होती. परंतु जेव्हा विज्ञान आणि बुध्दीच्या जोरावर भारतीय विषम समाज रचनेचे त्यांनी गहन अध्ययन केले आणि या निष्कर्षाला आले की ही सर्व व्यवस्थाच अन्यायकारक आहे. आणि मग तेथून त्यांनी या विरुध्द एक स्वतंत्र विचारप्रणाली जी बुध्दिप्रामाण्यावर

आधारित होती ती निर्माण केली. परिणामी बघता बघता एक व्यापक चळवळ उभी राहिली आणि 'आंबेडकरी चळवळ' म्हणून मान्यताही प्राप्त झाली. अठरा वीस वर्षापूर्वी औरंगाबादहून आज तागायत निघणाऱ्या 'अस्मितादर्श' या नियतकालिकाने ही चळवळ अगदी निष्ठेने चालविली आहे. केवळ दलित समाजच नव्हे तर सवर्णीयांनाही विचार प्रवृत्त करायला लावणारी ही चळवळ अस्मितादर्शचा प्राणबिंदू आहे. परिणामी अनेक उदयोन्मुख दलित लेखक आपली व्यथा कथा या व्यासपीठाच्या माध्यमातून मांडू लागले. अस्मितादर्शचे संपादक डॉ. गंगाधर पानतावणे यांचे योगदानही या संदर्भात अतिशय मोलाचे आहे. आज जरी रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर होतांना दिसते तरी प्रारंभी ज्या अडी-अडचणी आणि मानसिक तणाव प्रसंगी ज्या धीरोदात्तपणे त्यांनी ही ज्योती तेवत ठेवली त्याबद्दल संपूर्ण उपेक्षित समाज त्यांच्याबद्दल आदरभाव बाळगतील यात शंका नाही.

'माऱ्हुडा' या आत्मकथनाचे लेखक श्री. पी. उ. जाधव अस्मितादर्शकाचे अत्यंत ऋणी आहेत. ते आपल्या मनोगतात म्हणतात की, 'अस्मितादर्शच्या वाचनानं एक दलित साहित्यिकाचं आत्मकथनाचं दालन माझ्या समोर उघडं झालं आणि मी दलित आत्मकथनानं झपाटला गेलो. माझही जीवन मला पुन्हा एकदा मागं वळून पाहाण्याची आणि आत्मपरीक्षण करण्याची संधी मिळाली.' आणि म्हणूनच 'माऱ्हुडा' या आत्मकथनाची निर्मिती झाली.

'माऱ्हुडा'ची सुरुवात करतांना लेखकाने सुरुवातीला दलितांच्या नशिबी येणारे अपमानास्पद जीवन चित्रित केले आहे. पराकोटीच्या गरीबी आणि लाचारी मुळे असं अपमानास्पद जीवन जगण्याचीही दलितांना सवय झालेली असते असे ते सांगत राहतात. उदाहरणार्थ सर्वांना उष्ट पाणी पाजायचे आणि कोणी प्रतिवाद केला तर म्हणायचं ''लय निरमळाच्या पोटचा हायेस'' अशा परिस्थितीत जगणाऱ्या श्री. जाधवांनी अत्यंत गरिबी आणि हलाखीच्या प्रसंगांना तोंड देत एम. ए. पर्यंत शिक्षण घेतलं तेही इंग्रजी विषय घेऊन. खरं म्हणजे लेखक ज्या माऱ्हुड्यात राहायचे ते सर्व वातावरण शिक्षणासाठी अनुकूल नव्हते. तरीही लेखक शिक्षण घेत राहिले ते कधी पळसाची पाने विकून तर कधी आई बरोबर शेतावरील लहानमोठी

कामे करीत. विशेष म्हणजे त्यांच्या संपूर्ण कुळामध्ये कुणीही शिक्षण घेत नव्हते आणि अशात नदीवरच्या फरशीवरून सडकेने शाळेत जाताना पाहून कपडे धुणाऱ्या बाया म्हणायच्या ''माय! ह्ये महाराचं पोरगं लई गरीब हाये वं! पळसाचे पानं इकून श्याळा शिकतं बरं.'' [पृ. ६५] असे कौतुकास्पद उद्‌गार काढायच्या.

आजच्या युगात शिक्षणाबद्दलची अनास्था सर्वांना सदासर्वकाळ सारखीच वाटत राहिली आहे. आणि त्याचे कारण म्हणजे शिकूनही बेकार राहाण्याची पाळी आल्यामुळे. म्हणून जेव्हा लेखक वडिलांना आपल्या शेळ्या विकून टाकायला सांगतो तेव्हा बाप कातावतो, म्हणतो तुझ्या शाळेसाठी मी काही मुलाबाळांच्या तोंडातला घास काढणार नाही. तेव्हा लेखक रडू लागले. तेव्हा त्यांचे वडील उमाजी त्यांना समजावून सांगू लागले की, माझे मालक माधवराव ढवळे म्हणतात की, ''कुठं सिकून नौकऱ्या लागायल्यात? लय सिकलेले तं गल्लो गल्ली फिरायलेत. कुठं तुव्हं पोरगंच नोकरीवर लागणार हाये?'' येव्हढ्यावरच काही पाह्येता आलं तं पाहु आरे पहेले, जुने चवथी सातवी पास झालेलेच ते मास्तर हायेत. आता काही सिक्सेनाला किंमत न्हायेली नाही. [पृ. ७५] परिणामी लेखकाच्या शिक्षणात खंड पडला ते 'स्याळकऱ्याचे शेळकरी झाले.' म्हणजे पुन्हा शेळ्या चारु लागले. परंतु हरिमामाच्या आग्रहामुळे उमाजी जाधवांनी पांडुरंगाला शिक्षण घेऊ दिले. जमेल तेवढी हातमजुरीची कामे करीत त्यांचे शिक्षण पुढे सुरु राहिले.

डॉ. आंबेडकरांनी १९५६ मध्ये हिंदू धर्म सोडून बौध्द धर्मात प्रवेश केला. त्यांच्या धर्मांतरामळे काय साधणार हा प्रश्न सवर्णांप्रमाणे दलितांनाही पडलेला होता. परंतु डॉ. आंबेडकरांच्या विचार आणि कार्याचा एवढा प्रभाव होता की सर्व दलित समाज धर्मांतरित झाला. परंतु बौध्द होऊनही हिंदू संस्कृतीच्या संस्काराची जडता ते पूर्णपणे टाळू शकले नाहीत म्हणून बौध्द होऊनही पारंपारिक कर्मकांडे ते करीतच राहिले. आंबेडकरी चळवळीत गतिमान झालेले लेखक आपल्या समाजाच्या ह्या स्थितीकडे अंतर्मुख होऊन पाहतात की जोपर्यंत संस्काराची जडता नष्ट होणार नाही, विकासाची नवी दालने उघडी होणार नाहीत, बौध्द झाल्यानंतर पूर्वी असलेले रामकृष्णांची गीते किंवा पाळणे, जे मुलांच्या जन्मानंतर नामकरण

विधीच्या वेळी म्हणतात ते बौध्द व भीमाची गीते किंवा पाळणे झालेत. परंतु पारंपारिकेत जगणाऱ्या जीवांना या गोष्टी नामंजुर होत्या. म्हाताऱ्या स्त्रिया म्हणत "आमाला न्हाई माय येत तुमच्या बुधाचे न फुदाचे पाळणे. आमालं जुने सिरकिसनाचेच येतात." [पृ. ४४] बहुदा अस्मिता सोडून धर्मपरिवर्तनाने आम्ही साधले हाच प्रश्न लेखकाला पडलेला असावा असे वाटते. परंतु त्यांचे स्पष्ट प्रतिपादन या संदर्भात होत नाही.

दलितांच्या या धर्मांतरामुळे सवर्णांची, हिंदुंची मानसिकता ढासळलेली दिसते. ते छोट्या मोठ्या कारणावरून अजून अधिक प्रमाणात त्यांचा विरोध करु लागले. त्यांच्यावर सूड उगवण्याचे साधन शोधू लागले असे दिसते. लेखकाने एक प्रसंग मोठा गंमतीदार दिला आहे की, एकदा रानात शेळ्या चरावयास गेल्या असता यादवराव नावाच्या सवर्णाने त्या शेळ्या कोंडवाड्यात कोंडून दिल्या. कारण याच यादवरावाच्या शेळ्या राखण्याचे काम यापूर्वी लेखकाने नाकारलेले होते. एवढं करुनही शेवटी यादवराव वर म्हणतो, "तुम्ही महाराचे काट्टे लय माजल्यावानी करायला नाही का? रानातले कन्सं, कापसं काहीना काही चोरता, नदीतले खेकडे, मासुळ्या आन् मटन बी खाता न मंता आम्हाला बुध्द मनत जा बुध्द. आता आमी महार नाही बुध्द झालो, वारे वा बुध्द!" [पृ. ८२]

धर्म आणि त्याच्या आचरणासंबंधी असलेला गोंधळ दिवसेंदिवस वाढत चालला आहे. आपल्याला सोयीस्कर अर्थ धर्माचा घेतला जातो आहे. लेखक स्वभावाने खूप आक्रस्ताळे नसल्यामुळे स्वभावधर्मानुसार सौम्य निषेद नोंदवतांना दिसतात. परंतु धर्माच्या संबंधावर गोंधळ त्यांच्या मनात मात्र कायम उरलेला असावा असे मात्र सारखे जाणवत राहते. धर्म परिवर्तनानंतर जर पारंपारिक मानसिकता कुणाचीच बदलणार नसेल तर ते धर्म काय कामाचे असा धर्मनिरपेक्ष प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकलेला वाटतो.

अत्यंत सरढोबळपणे आपल्या जीवनाचा आलेख मांडतांना सर्व सामाजिक संदर्भांची नोंद घेतांना लेखक दिसतात. अकोला जिल्ह्यातील वऱ्हाडी बोलीचा उपयोग आत्मकथनानुसार आवश्यक असला तरी तिच्या अतिरेकी उपयोगामुळे भाषेच्या मांडणीत आणि निवेदनाच्या शैलीत खूप तफावत जाणवते. त्यामुळे आत्मकथनाच्या थाटाचा पूर्ण उपयोग करता

आलेला नाही. शिवाय अन्य दलित आत्मकथनासारखा एकदम आक्रमक स्वरही अपवादानेच आढळतो. काही सामाजिक संदर्भातील जाणिवेविषयी लेखक मौनी बनून त्यावर काहीही भाष्य करीत नाहीत व आत्मकथन पुढे रेटल्यासारखे वाटत राहाते. तरीही आकर्षक असणारा हा एका सरळ रेषेतील जीवन प्रवास आहे. आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीने त्याचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे.

▲▲▲▲

# नव– आंबेडकरवादाची भूमिका मांडणारा धाडसी ग्रंथ

भारतीय प्रबोधन आणि नवआंबेडकर वाद
प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस
दिलीपराज प्रकाशन, पुणे.
मूल्य रु. ९५/–

भारतीय प्रबोधनाचा प्रश्न हा अत्यंत जटिल बनला असून परिवर्तनवादी तत्वज्ञानांचा व चळवळींचा आपसातील संघर्ष हा चिंतेचा विषय बनला आहे. जागतिक स्तरावर मार्क्सवादाची पिछेहाट होऊन सोविएत युनियन कोलमोडून पडलेल्या पार्श्वभूमीवर भारतीय समाजक्रांती कोणत्या तत्वज्ञानाद्वारे होईल ही चर्चा वेगाने सुरु झाली. भारतीय क्रांतीच्या प्रवाहात आंबेडकरवादाला मध्यवर्ती स्थान आहे. परंतु गांधी–आंबेडकर, सावरकर–आंबेडकर, मार्क्स–आंबेडकर असे अनेक वादग्रस्त प्रश्न पुरेशा गांभीर्याने न सोडविल्यामुळे क्रांतीवादी आंबेडकरवाद सिध्द होण्यात अडचणी निर्माण झाल्या. दलितातील फक्त महार जातीपुरता आंबेडकरवाद बंदिस्त झाल्याने आंबेडकरवादाचा आणि दलित चळवळीचा विकासच



खुंटून गेला. ही वास्तवता लक्षात घेऊन डॉ. श्रीपाल सबनीस यांनी नव-आंबेडकर वादाची नवी संकल्पना भारतीय प्रबोधन आणि नव-आंबेडकरवाद या दिलीपराज प्रकाशन संस्थेने नुकत्याच प्रसिध्द केलेल्या ग्रंथामध्ये महाराष्ट्र स्तरावर आणि कदाचित भारतीय स्तरावर प्रथमतः मांडली.

या ग्रंथात नव-आंबेडकरवादाची दिशा स्पष्ट करणारे एकूण १० लेख समाविष्ट आहेत, यातील बरेच लेख हे समाज-प्रबोधन पत्रिका, परामर्श, साधना, अस्मितादर्श इ. मासिकात पूर्व प्रकाशित झालेले आहेत. या ग्रंथामध्ये डॉ. श्रीपाल सबनीस यांनी डॉ. आंबेडकर आगरकरांचे बुध्दीप्रामाण्यवादी समृध्द वारसदार ठरविले आहे. गांधी आणि आंबेडकरातील प्रचंड विरोध विसंवाद लक्षात घेऊनही या दोघांचे कार्य परस्परांना पूरक ठरल्याचं पुराव्यासह निष्कर्ष मांडला आहे. गोळवलकर आणि आंबेडकर तसेच बॅ. जिनांचा इस्लाम आणि आंबेडकर यांचा सांधा तत्वतः इतिहासातच तुटल्यामुळे यापुढे त्यांचा सहप्रवास मुळीच शक्य नसल्याचा निष्कर्षही अनेक पुरावे देऊन लेखकाने मांडला आहे. फुले आणि आंबेडकरामधील छुपे विसंवाद उदाहरणासह दाखवून 'फुले-आंबेडकर-शाहू' या शब्दत्रयीतील पोकळपणा साभार नोंदला आहे. या ग्रंथातील सत्यशोधन, ब्राम्हणेतर आणि आंबेडकर या प्रकरणाबद्दल सर्वसामान्य अंधश्रध्दाळू माणसाच्या मनात राग निर्माण होण्यासारखी परिस्थिती आहे. आगरकर-गांधीमार्क्स यांच्या मर्यादा जेवढ्या स्पष्टपणे या ग्रंथात दिसतात तेवढ्याच परखडपणे फुले आणि शाहू महाराजांच्या उणिवा लेखकाने दाखविल्या आहेत. कोणत्याही महापुरुषाच्या भक्तांना त्यांच्या दैवताच्या उणिवा मान्य होत नसतात. हा व्यवहार डॉ. श्रीपाल सबनीस यांनी लक्षात घेतलेला दिसत नाही. एखादे सत्य हे परखड असले तरी ते समाजाला पचत नसेल तर लेखकाने ते मांडावे का? असा प्रश्न हे पुस्तक वाचतांना निर्माण होतो. ईश्वर आणि धर्म या प्रश्नाच्या निमित्ताने प्रा. ग. प्र. प्रधान यांनी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत श्रीपाल सबनीस यांचे विषयी मतभेद नोंदले आहेत. ते सार्थ म्हटले पाहिजेत. सत्य हे सत्य असले तरी ते समाजाच्या संदर्भात उपयुक्त ठरले पाहिजे. याची जबाबदारी झटकून लेखनाचे मूल्य कोणते हाही प्रश्न यानिमित्ताने उभा राहतो.

तरीही ब्राम्हणेतर चळवळीतील विविध प्रवाहांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करून आवश्यक तेवढे पुरावे आणि उदाहरणे देऊन हे सर्वात मोठे प्रकरण सबनीस यांनी लिहिलेले आहे. त्यांचे निष्कर्ष सत्य असले तरी पटत नाहीत ही वास्तवता लक्षात घेणे जरुरीचे आहे.

आंबेडकरवादाचा विकास करण्याची गरज लेखकाने या ग्रंथामध्ये आवश्यक मांडली आहे. त्यासाठी रुळलेल्या आंबेडकरवादाचा बराच मोठा भाग सबनीस यांनी मोडीत काढला आहे. जुन्या आंबेडकरवादाचा घटनात्मक मार्गावरील विश्वासपूर्ण आग्रह डॉ. सबनीसांच्या मते नव्या संदर्भात बाद ठरविला पाहिजे. तसेच भारतीय राज्य घटनेत फक्त ५-१० टक्यांचा आंबेडकरवाद शिल्लक असल्यामुळे घटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर ही गौरवात्मक उक्ती आंबेडकरवादाची प्रचंड फसवणूक असल्याचे डॉ. सबनीस यांनी अनेक युक्तीवादाने सिध्द केले आहे. सेक्यूलॅरिझमचा मुक्त गौरव आणि नव-आंबेडकर वादाशी या संकल्पनेशी असणारे अतूट नाते श्रीपाल सबनीस यांच्या श्रध्देचा विषय दिसतो. याबद्दल दुमत नसले तरी सेक्यूलॅरिझमचा लेखकाने स्वीकारलेला अर्थ प्रतिगाम्यांच्यासह पुरोगाम्यांनीही स्वीकारलेल्या अर्थाशी जुळणारा नाही. कारण कळत नकळत धर्म संकल्पनेची मोहिनी प्रतिगामी पुरोगामी या दोघांनाही पडलेलीच आहे. धर्म विरोधी भूमिका घेऊनच धर्म संकल्पनेच्या विरोधात सेक्युलॅरिझमचा अर्थ उभा करण्याची डॉ. सबनीस यांची मांडणी कुणाला पचो अथवा न पचो, ती नवी आहे. बौध्दधर्म धम्माच्या आग्रहातूनही धर्मच उरतो-ठरतो. म्हणून आंबेडकरवादाच्या विकासासाठी बौध्दधर्म त्यातून वजा केला पाहिजे ही धाडसी भूमिका लेखकाने मांडली आहे. जी आजच्या दलित समाजाला मुळीच आवडणार नाही. असे अनेक नवे निष्कर्ष मांडून हे पुस्तक अनेकांच्या श्रध्देविरोधी भूमिका घेते म्हणून आजच्या ऐवजी उद्याच्या संदर्भात हे पुस्तक अतिशय महत्वाचे ठरू शकेल.

हा वैचारिक ग्रंथ लेखकाच्या अभ्यासाचा निदर्शक असला त्यांचे निष्कर्ष विविध प्रवाहातील वाचकांना पटणारे नाहीत. दलित, ब्राम्हण, मराठा आणि मुस्लीम या प्रवाहातील मंडळी या ग्रंथातील मांडणी आणि निष्कर्षामुळे दुखावण्याची अधिक शक्यता आहे. लेखकाचा हेतू तसा नसला तरी हा परिणाम मात्र अटळ दिसतो. स्पष्ट सांगायचे म्हणजे आजच्या

समाजात सुध्दा सर्व स्तरावर छुप्या जातीय जाणिवेला या ग्रंथातील भूमिका मुळीच मानवणारी नाही. कारण गोळवलकर गुरुजी, फुले, शाहू महाराज, गांधी, बॅ. जीना यांच्याकडे समाजमनाचे कप्पे संकुचित जात जाणिवेच्या श्रध्देनेच पाहतात. सगळ्याच जाती डॉ. सबनीस यांच्या विरुध्द आवाज उठविण्याची शक्यता आहे. तेव्हा एका वेगळ्या अर्थाने हेच या पुस्तकाचे यशही ठरु शकते. पण विरोधाचा आवाज वाढला तर मात्र या ग्रंथातील सत्य दडपले जाईल हाही धोका विसरता येईल. तेव्हा ते पुस्तक वाचतांना त्यातील मजकूर पचणारा की न पचणारा असा प्रश्न उपस्थित न करता हे विवेचन आणि त्यातील निष्कर्ष चूक आहे की बरोबर आहे, काल्पनिक आहे की वास्तव आहे असा प्रश्न उपस्थित करून वाचला पाहिजे. तरच या पुस्तकाचे मोल शिल्लक राहू शकेल. अन्यथा एक वादग्रस्त पुस्तक म्हणून हे पुस्तक ठोकरले जाण्याची शक्यता आहे.

▲▲▲▲

# जीवनानुभूतीचे विदारक वास्तव

उपरा
लक्ष्मण माने
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
मूल्य रु. १८/-



महाराष्ट्रात अशा कितीतरी जमाती आहेत ज्या भटक्या आहेत. त्या भटक्या असण्याचे कारण म्हणजे त्यांच्या वाटेला आलेले दलितत्व. हे दलितत्व दोन कारणांमुळे आलेले आपल्याला दिसून येते आणि ते म्हणजे आर्थिक विपन्नता व जातीय विषमता. जन्माच्या दारिद्र्यामुळे आणि विषमतेमुळे काही विशिष्ट समाज हे होरपळून निघाले आहेत. आपल्या समाजामध्ये अशा अनेक जाती आहेत ज्या निम्न वर्गातल्या असूनही त्यांना जगण्यासाठी एक निश्चित स्थान आहे, गाव आहे, उपजीविकेचे वतन ठरलेले आहे. परंतु ज्यांना स्थानही नाही, गावही नाही आणि उपजीविकेचे वतनही नाही अशांनी काय करावे? त्यांनी गावोगाव भटकावे, जमेल ते काम करावे, मिळेल ते अन्न खाऊन भूक भागवावी. किंबहुना आपला सर्व संसार आपल्या खांद्यावर घेऊन

रानोमाळ, गावोगाव भटकत रहावे. हेच त्यांचे जीवन. शिक्षण म्हणजे काय? ते का करावे? हा विचार या भटक्या समाजाला कधी कळलाच नाही. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा या मूक समाजाला हा मंत्र दिला की जो पर्यंत ते शिकणार नाहीत, आपल्याला न्याय्य हक्कासाठी कधीही झगडू शकणार नाहीत. त्यांच्या ह्या प्रेरणेने हे भटके समाज आपले उपरे जीवन सोडून शिक्षणाची कास धरु लागले. परिणामी या उपऱ्यांमध्ये शिक्षणाची आस निर्माण झाली. त्यात 'उपरा' कार श्री. लक्ष्मण मानेंच्या आत्मकथनाचा सिंहाचा वाटा आहे.

'उपरा' या आत्मकथनातून कैकाडी या भटक्या समाजाचे जीवनदर्शन आपल्याला घडते. आणि त्याचबरोबर लेखकाच्या जीवनाचे अंतरंगही स्पष्ट होत राहते. आपल्याला वाचतांना सतत हे जाणवत राहतं की या समाजाच्या जीवनानुभवाच्या विविध रंगाच्या विदारक वास्तवाचे भेदक चित्रण झालेले आहे. याचं कारण म्हणजे जीवन परिवर्तन घडवून आणण्यासाठी लेखकाने केलेला संघर्षच याचा गाभा आहे. वाऱ्यावर जीवन जगणाऱ्या या जमातीचे दु:ख दलितांपेक्षाही हीन दर्जाचे आहे हे जाणवत राहतं.

या भटक्या जमातीत अन्य जमातीप्रमाणेच त्या समाजाची दरिद्रता, अंधविश्वास, धार्मिकता, श्रेष्ठ कनिष्ठता आणि शिक्षणाचा अभाव चित्रित झालेला आहे. लेखकाने या सर्वांविरुध्द संघर्ष करण्याचा जणू विडाच उचललेला आहे. आपल्या चक्षुतून सुधारित जग आणि आपला समाज ते न्याहाळताहेत. ही दृष्टी लेखकाला 'जानव्याच्या भानगडीत नसलेला' त्यांचे समाजवादी मित्र श्री. नरेंद्र दाभोळकर भेटल्यामुळे जातीयतेचा अन्याय आणि घोर अज्ञानाविरुध्द संघर्ष त्यांना शक्य झालेला आहे. म्हणून लेखक समाजवादाच्या आणि अंधश्रध्दा निर्मूलनाच्या चळवळीमध्ये गतीमान झालेला आपल्याला दिसतो. या चळवळीतूनच त्यांना जीवन संघर्षाची उभारी प्राप्त झालेली आहे. ही वाटचाल करतांना अनेक प्रकारची दु:खे त्यांच्या वाट्याला आलीत. परंतु निराश न होता लेखकाची ध्येयाप्रती वाटचाल सुरु राहिलेली आपल्याला दिसते.

या समाजाच्या जीवनाचे वास्तव स्वरुप मांडतांना लेखक म्हणतो की हे जे काही मी लिहितो आहे ते सुध्दा आमच्या समाजाच्या दृष्टीने किंवा

पंचायतीच्या दृष्टीने मोठा गुन्हा आहे. तरी सुध्दा ते मी लिहिणारच आहे. परिणामांना तोंड देण्याची तयारी ठेवून लेखक म्हणतो की या अतिशय मागासलेल्या समाजामध्ये ही श्रेष्ठ कनिष्ठत्वाची भावना आढळते. गावोगाव भटकणारा, सूर्योदयापूर्वी गाव सोडणारा हा समाज यासाठी सूर्योदयापूर्वी निघतो कारण उजाडल्यावर एखादा 'महार' त्याला आडवा येईल. महार आपल्याला आडवा येणे म्हणजे वाईट ही भावना आपण त्यापेक्षा श्रेष्ठ असल्याची खूण आहे. ही अतिशय आश्चर्याची खूण आहे की ज्याला घर काय किंवा गाव काय किंवा गावकुसाबाहेरची वस्ती काय हे माहित नसतांनाही तो गावकुसाबाहेरच्या समाजापासून दुरावलेला आहे. केवळ कैकाडीच नव्हे तर अशाच भटक्या जातींमध्येही स्पृश्यास्पृश्यतेचा आणि श्रेष्ठकनिष्ठत्वाचा प्रश्न प्रकर्षाने आढळतो. अशा ह्या जमातीत सुध्दा जातीचा अहंकार शिरलेला आहे. लेखक म्हणतो, 'वैदांच्या पालावर कैकाडी जायचा न्हाय, कशाला शिवायचा न्हाय.' कां तर उत्तर ठरलेले 'वैद कायबी खात्यात, माकडवालं कायबी खात्यात.' [पृ. ६१] असा हा समाज अत्यंत दरिद्री. या समाजाची उपजीविका म्हणजे ज्या गावात ते जातील त्या गावातील गावकऱ्यांना टोपल्या, कंड्या, झाप, कूड, डफऱ्या इत्यादी साहित्य द्यायचे आणि त्या बदल्यात त्यांच्या उष्ट्या-खरकट्या शिळ्या-पाक्या अन्नांची याचना करायची. यांची संपत्ती म्हणजे यांच्याजवळ असलेलं गाढव. पावसाळ्यानंतर गाढव घेऊन गावोगाव फिरायचे. फोक कापून आणायचे, त्याच्या कणग्या-टोपल्या तयार करायच्या. त्या विकून जे पैसे मिळतील त्यावर आपला उदरनिर्वाह चालवायचा. कधीकधी सुगीचे दिवस असले आणि गावकऱ्यांनी काही थोडेफार धान्य दिले तेवढेच दिवस अजून पुढे ढकलले जायचे आणि अशाही जमातीने जातिभिमान बाळगावा ही या देशाच्या समाज व्यवस्थेची शोकांतिका आहे.

माणसाची जात शेवटी त्यावर कशी मात करते याचं एक गंमतीदार उदाहरण लेखकाने दिलेले आहे. ते म्हणजे लेखकाने मराठा समाजाच्या 'शशी' नावाच्या मुलीशी लग्न केले. त्यामुळे लेखकाच्या जात पंचायतीने जात बुडाल्याची ओरड सुरु केली. प्रचंड विरोध सुरु झाला. लेखक निराश होत म्हणतो की, 'जातीसाठी माती खावी, जातीशिवाय सत ना गत' या

तत्वावर तडजोड करून शेवटी असं ठरतं की या मुलीला आपल्या जातीत दत्तक घ्यावे. त्याला एक विशिष्ट शब्द त्यांनी दिला आहे. 'उरसांड' या 'उरसांडा' नंतर त्यांचा विवाह होईल. परंतु दत्तक घेतेवेळी पंचायतीला कळाले की ही मुलगी गर्भार आहे. मग आता लग्न कसे करायचे. 'उरसांड होण्याआधीचं पोर हाय, ते जातीत कसं यील? त्येला आई बाज हाय, पण जात कुटं हाय.' [पृ. १५३] तेव्हा लेखक वैतागतो व म्हणतो की लग्नाची मला गरज नाही. तेव्हा ही मंडळी चपापली आणि 'तुला काय? जातचं ना गोतीचं, आना सख्या म्हारणीचं' म्हणून त्यांच्या कमरेला सुपारी बांधून लग्नविधी पार पाडले. लेखक हा प्रकार वर्णन करतांना म्हणतो की, 'ज्या जातीचा ठिपका पुशीन म्हणत होतो तो गडद झाला होता.' [पृ. १५४]

जेथे जात्याभिमान इतका तीव्र असेल त्या समाजातील अंध विश्वासांवर विश्वास ठेवण्याच्या स्थितीवर जे अंधविश्वास आहेत ते तर या समाजात आहेतच. परंतु साधा मनुष्य आजारी जरी पडला तरी त्याला भुताने पछाडले असेल असे त्याला वाटत राहते आणि मग त्यासाठी विविध प्रकारच्या देव-देवतांना पुजणे किंवा मांडवडची खंडोबाची यात्रा, जेजुरीची कार्तीकातील यात्रा, चैत्र अमावस्येची काळुबाईची यात्रा हा समाज निष्ठेने तर करतोच परंतु त्यासाठी तो कर्जबाजारीही होत राहतो. अशा या समाजाची कैकाडी ही अशुध्द आणि ग्रामीण भाषा आहे. त्याद्वारे लेखकाने कैकाडी समाजाचा जीवनालेख मांडायचा अत्यंत स्तुत्य प्रयत्न वाङ्.मयीन स्वरुपाच्या सर्व आघाड्या सांभाळीत केला आहे. श्रेष्ठ समीक्षक श्री. रा. ग. जाधवांनी 'निळी क्षितिजे' या ग्रंथात उपराकाराचे वस्तुनिष्ठ चित्रण केले आहे. ते म्हणतात, 'उपरामधून लेखकाच्या समाजशील, सुजाण, सुसंस्कार संपन्न पण स्वतःशी अहोरात्र अंतःसंघर्ष करणाऱ्या अग्निशिखेसारख्या व्यक्तित्वाचा सतत प्रत्यय येतो आणि ही दुःकहाणी सांगणारा लेखक हा विजिगोषुवृत्तीचा आहे हे ही जाणवते. 'बलुतं' वाचतांना कुरुक्षेत्रावरील हताश अर्जुनाची आठवण होते तर 'उपरा' वाचतांना भूमीत गेलेले रथचक्र उध्दरणारा कर्ण डोळ्यासमोर येतो. या दृष्टीने जीवनाशी संघर्ष करणाऱ्या सर्वच व्यक्तींना भावणारं हे आत्मचरित्र आहे यात शंका नाही.

▲▲▲▲

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध ३५६६
२७७०६

REFBK-0027106



. कृष्णा पोतदार

हे हिंदी विषयातील डॉक्टर. हिंदी साहित्याचा
ल्लेखनीय आहेच. तथापि मराठी साहित्यक्षेत्रात
लेत मराठी साहित्य हा त्यांच्या आवडीचा आणि
आपला महाराष्ट्र' या दैनिकाची साहित्य पुरवणी
स्वागतार्ह आणि रसिकमान्य करण्यात त्यांचा

त्याने त्यांनी अलीकडील लक्षवेधी अशा
मराठी वाचकांना करुन देताना आपल्या चोखंदळ
लाच आहे, पण एका मोठ्या कालपटावरील
परामर्षही खूप महत्वाचा आणि उपयुक्त ठरणारा

पुनः पुन्हा नव-नव्या 'बहरा'त सतत सळसळत

डॉ. भा. ज. कविमंडन